23-12-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SMT/ 09:45

23-12-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SMT/ MMP/ KGS/ 09:45

<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>

पृ.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष.

मु.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.केशवराव मानकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, समोरच्या बाकावर कोणीही सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी याठिकाणी उपस्थित आहे. एका चांगल्या प्रस्तावावर या ठिकाणी आपल्याला चर्चा करावयाची आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी. या ठिकाणी ते रेकॉर्ड होईल शिवाय मी त्यासंबंधीचे मुद्दे लिहून घेईन.

श्री. दीवाकर रावते : सभापती महोदय, रेकॉर्ड बद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी आम्हाला सांगू नये. मी आपल्याला दोष देत नाही. पण या सभागृहाचे नेते काय करतात? प्रतोद काय करतात? सभागृहातील उपस्थितीबाबत आम्ही दर अधिवेशनामध्ये मुद्दा उपस्थित करतो परंतु अधिवेशन निभाऊन नेणे हेच शासनाचे काम चाललेले आहे. सभापती महोदय, सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नसल्यामुळे सभागृहाची बैठक तहकूब करण्यात यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. सभागृहाची बैठक 10.00 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(यानंतर सभागृहाची बैठक सकाळी 9.46 ते 10.00 वाजेपर्यंत तहकूब झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष.

मु.शी. : महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर आजपर्यंत विदर्भाच्या विकासाकडे राज्य सरकारचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.केशवराव मानकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला)

उपसभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल. या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह सकाळी 11.30 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरासाठी अर्धा तास तरी वेळ द्यावा लागेल. सकाळी 11.00 वाजता माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपल्या भाषणास सुरुवात करतील.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या प्रस्तावावर दोन तीन सन्माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतील. मला 12.00 वाजता विधानसभा सभागृहात जावयाचे आहे.

उपसभापती : सकाळी 11.30 वाजता ही चर्चा संपेल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, फक्त विदर्भ आणि विदर्भातील समस्या या विषयावर विरोधी पक्षाच्या वतीने नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनेक बाजूंवर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आपल्या भाषणामध्ये विदर्भाच्या संदर्भात विविध मुद्दे मांडले तसेच विदर्भाबाबतच्या उदासीनतेवर, विदर्भात निर्माण झालेल्या समस्यांवर आणि हे सर्व मुळात अनुशेषामुळे निर्माण होते यासंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी विस्तृत आकडेवारीसह आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, 'कोडग्या कोडग्या लाज नाही ' अशा प्रकारची एक मराठी म्हण आहे. गेली अनेक वर्षे या विषयावर आपल्याकडून चर्चा उपस्थित केली जाते. अनभिज्ञ माणूस किंवा ढ मुलगा सुध्दा एखादी गोष्ट शिकावा इतक्या वेळा आपण या विषयावर तात्विक, तंत्रशुध्द आणि घटनात्मक चर्चा उपस्थित करुनही सरकारला याची जाणच नाही. आपण सन्माननीय सदस्य या सदनामध्ये उभे राहतो तेव्हा आपल्यावर घटनेचे बंधन आहे आणि म्हणून या ठिकाणी आपल्याला शपथ घ्यावी लागते. शपथ कोणत्या भाषेतून घ्यावयाची यापेक्षा शपथ कशासाठी घेतो हे ज्यावेळी कळेल त्यावेळी या सदनाला आणि आपल्या या पदाला समाजामध्ये सन्मान मिळेल आणि समाजाचे भले करता येईल, हा एक भाग आहे. वारंवार आपण सविस्तर आकडेवारी दिली. भौतिक अनुशेष म्हणजे काय याची व्याख्या काल आपण सांगितली. भौतिक अनुशेष कित्येक पटीने कसा वाढला आहे हे आपण सांगितले. प्रगत भागात एक पट अनुशेष वाढला तर त्याच्या आठ पटीने अनुशेष अप्रगत भागात वाढतो आणि यातून अनुशेषाची निर्मिती होते. या ठिकाणी असे सांगितले जाते की, आम्ही आता 1995 चा अनुशेष पूर्ण केला. वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भात दुपारी जेव्हा चर्चा होईल त्यावेळी यासंदर्भात बोलता येईल.

सभापती महोदय, आमच्या या ठरावामध्ये जे विषय दिलेले आहेत त्यामध्ये पॅकेजमधील निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार होणे, शेतकऱ्यांना शेतीसाठी देण्यात येणारी खते व बियाणांच्या पुरवठ्यात शेतकऱ्यांची फसवणूक होणे, कर्जमाफी एवढ्या मर्यादेपुरतेच मी बोलणार आहे. हे करीत असताना 'जय विदर्भ' म्हणणाऱ्यांना मला प्रश्न विचारावयाचा आहे की, कर्तृत्ववान राज्यकर्ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते .....

आल्यानंतर आपल्या भागात विकास करीत असतात. आपल्याकडे करु नका असे कोणी सांगितले होते, हा प्रश्न आपण स्वत:ला विचारावा. मी लातूरला गेलो असताना माझे कार्यकर्ते बोलत होते की, हे बघा, हे केले, हे केले. मी त्यांना वेगळ्या भाषेत सांगितले की, या राज्याचे मुख्यमंत्रीपद श्री. विलासराव देशमुख यांना मिळाले असेल आणि ते जर हे करु शकत नसतील तर त्यांना मी वेगळ्या पध्दतीने बोलीन.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मला अभिमान वाटतो की, ते लातूरचा विकास करीत आहेत. आपल्या मुख्यमंत्रीपदाचा, मंत्रीपदाचा लाभ आपल्या लातूरकरांना देत असतील तर ती स्वाभिमानाची गोष्ट असली पाहिजे. विरोधाची असता कामा नये, त्यांनी तेथे स्टेडियम बांधले, मैदान बांधले सगळे घेऊ देत. त्यांनी जे काही केले आहे ते लातूरसाठी केले आहे, रस्ते प्रचंड रुंद केले आहेत. त्यामुळे संभाजीनगर मागे पडेल असा लातूरचा विकास केला आहे. संभाजीनगर येथे एक पूल बांधण्यासाठी शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे काय करावयाचे यावर विचार करण्यासाठी आमची सहा वर्षे गेली. दु:ख एवढेच शिवाजी महाराज मला रोज दिसतात. मी यासंदर्भात थोडक्यात सांगेन. मी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.राजेंद्र दर्डा यांना सांगेन की, आपण ते काम करावे. मला खूप दु:ख होते. शिवाजी महाराजांच्या सभोवती सर्व वीर पुरुष उभे राहिलेले असतात. पण त्यांना उभे करण्यासाठी कोणाकडून तरी हप्ता घेऊन ते तयार केलेले असते. छत्रपतींचे पावन स्मारक तेथे कोठे तरी बाजूला करावे. मी आयुक्तांना, पोलीस आयुक्तांना फोन केला. मला सगळेच नकारात्मक बोलणारे भेटले, त्यामुळे मला खूप राग आला. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या भोवती बांबू बांधून स्वत:चा प्रचार करणारी यंत्रणा उभी राहिली आहे. त्यामुळे एक दिवशी दारु पिणारा दारुडया त्या बांबूवरुनच शिवाजी महाराजांच्या खांद्यावर जऊन बाटली घेऊन बसला. त्यामुळे संपूर्ण शहरात धावपळ झाली. त्यानंतर पोलीस आयुक्त आले. हे सत्य आहे. शिवाजी महाराजांच्या खांद्यावर तो दारुडया जाऊन बसला, मग त्याला फायर ब्रिगेड आणून उतरविले. त्याला नंतर 4 महिन्यांची कैद झाली. काय चालले आहे ? मला नागपूर महानगरपालिकेचा अभिमान वाटतो. येथील आयुक्तांचा अभिमान वाटतो. मुख्यमंत्री असोत, कोणी असोत, त्यांचे होर्डिंग्ज लावायचे नाहीत म्हणजे नाही. लावावयाचे असतील तर कायदेशीर परवानगी घेऊन लावावेत. सन्माननीय राज्यमंत्री श्री.विजय वडेट्टीवार यांना होर्डिंग्ज लावावयाची होती त्यासाठी त्यांनी पैसा खर्च केला, त्याचे कंत्राट देऊन ती व्यवस्थित लावण्यात आली, त्यासाठी त्यांनी वीजही मोफत घेतलेली नाही. याबाबत मी काल माहिती घेतली आहे. ही एक शिस्त आहे. या शहरामध्ये होर्डिंग्ज लावण्यासंबंधी, प्रचार करण्यासंबंधी शिस्त आली त्याचा अभिमान बाळगला पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, आता मी मूळ मुद्यावर येतो. संत्र्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प आमच्या मराठवाडयातील मुख्यमंत्र्यांनी नांदेड येथे नेला. कशाला आक्रोश करता ? तो प्रकल्प विदर्भात धूळ खात पडला होता. 10 वर्षे संत्र्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प मंजूर होऊन झाली होती, परंतु या कालावधीत एकाही संत्र्याचा रस निघाला नाही. विदर्भातील त्या प्रकल्पाला 4 वेळा भेट दिली होती. त्या प्रकल्पाच्या बाजूला जंगल वाढले होते. तुम्हाला तुमच्या शासनाने कर्जाने दिले होते, पण तो प्रकल्प तुम्हाला सुरु करता आला नाही. ही वस्तुस्थिती असताना कशासाठी तुम्ही रडता ? मला अभिमान वाटला की, मराठवाडयातील मुख्यमंत्र्यांनी तुम्हाला जे जमत नाही ते तेथे करण्याचा संकल्प केला. मी तोही प्रकल्प जाऊन बघितला आहे. कसली रडगाणी गात आहात ? विदर्भातील कै.कन्नमवार मुख्यमंत्री होते तो जमाना वेगळा होता. त्यानंतर कै.वसंतराव नाईक, कै.सुधाकरराव नाईक यांना मुख्यमंत्रीपद मिळाले होते. त्यावेळी विदर्भाचा विकास का केला नाही ? तुम्हाला कोणी अडविले होते ? सन्माननीय मंत्री महोदय श्री.राजेंद्र दर्डा हे मराठवाडयाचे आहेत, पण त्यांचे खासदार विदर्भाचे आहेत. त्यामुळे त्या सन्माननीय खासदारांनी विदर्भातील समस्यांच्या संदर्भात केंद्र सरकारला लिहिलेली पत्रे काढून वाचावीत. आपण ज्यावेळी बोलतो, ओरडतो तेव्हा काय करतो याचा विचार केला पाहिजे. विदर्भाला मुख्यमंत्री मिळाले, मंत्री मिळाले असे असताना तुम्ही विदर्भाचा विकास का करीत नाही ? सन्माननीय राज्यमंत्री श्री.वडेट्टीवार हे पहिल्यांदाच मंत्री झाले, ते आमच्या पक्षातून तिकडे गेलेले आहेत. आमचेच लोक तुमच्याकडे गेले आहेत आणि तेच काम करीत आहेत. दुसरे कोणी करीत नाही. खरे तर मला त्यांचे कौतुक वाटले. सिंचनाच्या प्रश्नाला उत्तर देत असताना त्यांनी कोठेही न अडखळता उत्तर दिले होते. विदर्भातील एक तरुण मंत्री या सभागृहात अभ्यास करुन येत आहेत. ते येथे कमिटेड बोलत आहेत. विदर्भाचे अभितव्य अशा या तरुण मंत्र्यांमध्ये बघावे. वेगळया विदर्भाचे स्वप्न बघू नका. कोणालाही दोष देऊ नका. आम्ही विदर्भाच्या संदर्भात प्रस्ताव आणला आहे त्यावर बोलत असताना मी सांगेन की तुमच्या मनगटात ताकद असेल तर हात पकडण्याची हिंमत ठेवावी. ज्या अधिका-यांचे हात भ्रष्टाचाराने माखले आहेत, त्यांनी कमविलेल्या तुकडयांपैकी दोन तुकडे पुढे टाकल्यानंतर तोंड मिटण्याचे काम करणारे विदर्भातील कोणीही प्रतिनिधी विदर्भाला मोठे करु शकत नाहीत.

यानंतर श्री.शिगम

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

(श्री. दिवाकर रावते....)

विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरिता राज्य शासनाने नागपूरमध्ये मिनिमंत्रालय स्थापन केले होते. हे समोरच्या सन्माननीय सदस्यांना मान्य आहे ना ? हे मिनिमंत्रालय शासनाने केले होते ना ? आता विदर्भावर झालेला अन्याय विसरुन विकासाची फळे चाखा असे स्वप्न वैदर्भीयांना दाखविण्यात आले होते. मात्र लगाम मुंबईमध्ये ठेवण्यात आला होता. आढावा घेणे आणि शिफारस करणे एवढेच अधिकार आयुक्तांना बहाल केले होते. विदर्भात वेगळे मिनीमंत्रालय काढले, सगळे काही केले. अमरावतीचे वेगळे आयुक्त केले, नागपूरचे वेगळे आयुक्त केले. हे मिनिमंत्रालय कुचकामी ठरले. त्या मिनिमंत्रालय स्टाफ दिला नाही, काही दिले नाही. ते बंद पडले. याबाबत समोरच्या सन्माननीय सदस्यांनी सरकारला जाब विचारला काय ? मी नागपूरमधील गेली तीन अधिवेशने पहात आहे. विदर्भातील एका तरी आमदाराने या मिनिमंत्रालयाबाबत सरकारला विचारले आहे काय ? हिंमत असेल तर विदर्भातील आमदरांनी राजीनामे फेकून याबाबत सरकारला जाब विचारला पाहिजे. तशी हिंमत असेल तर ती दाखवा. फेव्हिकॉल सारखे चिकटून बसायचे आणि माझी खुर्ची कशी टिकते हे पहायचे एवढेच काम झालेले आहे. संयुक्त महाराष्ट्राने सत्ता सोडून मरणारी माणसे पाहिलेली आहेत. सी.डी. देशमुखांनी संयुक्त महाराष्ट्राकरिता मंत्रिपद सोडले. असा हा देदिप्यमान महाराष्ट्र आहे. मग तुम्ही सरकारला या मिनिमंत्रालयाबाबत जाब का विचारला नाही ?

सभापती महोदय, मी आत्महत्या या विषयावर बोलणार आहे. विदर्भातील खासदार श्री.दत्ता मेघे यांनी 7 हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्याचे लोकसभेमध्ये सांगितले. पॅकेज येण्यापूर्वी 2567 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. खरे तर पॅकेज आल्यानंतर आत्महत्या कमी व्हायला पाहिजे होत्या. पॅकेज आल्यानंतर 3345 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. गेल्या 9 वर्षामध्ये तुमचे सरकार आल्यापासून 5912 म्हणजे 6 हजार आत्महत्या झाल्या. रेकॉर्ड झालेली ही आकडेवारी आहे. या आत्महत्या झालेल्या शेतक-यांपैकी फक्त 2117 शेतक-यांना पॅकेजची मदत मिळाली. 3601 प्रकरणे अपात्र ठरली आणि काही शे-सव्वाशे प्रकरणांची स्क्रुटीनी चालू आहे. सभापती महोदय, मी अगदी काकुळतीने बोललो होतो की हा विषय शासनाने समजून घ्यावा. सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी याच विषयाच्या एका प्रश्नावर बोलताना सांगितले की शेतक-याची शेती उद्ध्वस्त होते, तो कर्जबाजारी होतो आणि मग दारु पितो...(अडथळा)..सभापती महोदय,मी सांगू

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

इच्छितो की, विदर्भामध्ये एकाही गावामध्ये बाटली आडवी करण्यासंबंधीचे महिलांचे आंदोलन कुठे झालेले नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रामध्ये ते आंदोलन होत आहे. म्हणजे पश्चिम महाराष्ट्रामध्ये दारु किती फोफावली आहे हे कळते. मला वाटते या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब होते. मी सांगितले होते की, आत्महत्या करणा-या शेतक-याच्या कुटुंबाला एक-एक लाख रुपये मदत द्या. त्यामुळे त्या माऊलीला थोडासा जगण्यासाठी आधार मिळेल. एक-एक लाख दिल्याने फार तर एक कोटी जातील. नको त्या गोष्टीवर शासन किती तरी कोटी रुपये खर्च करीत असते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औषध खरेदीमध्ये हजारो कोटींचा भ्रष्टाचार कसा होतोय हे या ठिकाणी सांगितले. मदत देताना अधिकारी अनेक कारणे काढत असतात. शेतकरी दारु पितो का, अमूक करतो का, तमूक करतो का वगैरे. सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी ही चर्चा निर्माण झाली होती.

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मेलेल्या माणसाची निंदा नालस्ती आपण करीत नाही, ती आपली संस्कृती नाही. पण नरेंद्र जाधवांनी जे अनेक अहवाल दिले आहेत त्यातील शेवटच्या अहवालात ते म्हणतात की, साईनाथ यांचा अहवाल किती मुर्खपणाचा आहे. आपण म्हणतो की राजकारणातच राजकीय खुन्नस असते परंतु तज्ज्ञांमध्ये सुध्दा अशा प्रकारे खुन्नस असल्याचे येथे दिसून येते. पि. स्वामिनाथन कसे चुकीचे आहे हे सांगणे त्यांना जास्त महत्वाचे वाटते. तसेच पुढे ते असेही म्हणतात की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही केवळ मिडियाने निर्माण केलेली समस्या आहे आणि अशा बातम्या छापण्यात लोकमत हे वृत्तपत्र पुढे आहे, कारण त्याचा खप जास्त होतो. त्यांनी आपल्या अहवालात असेही म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या पूर्वी होत होत्या, आताही होत आहेत आणि पुढेही होत राहणार असे त्यांचे संशोधन आहे. अशा प्रकारे ज्या बातम्या मिळतात त्या मिळालेल्या बातम्या अवाजवी प्रसिध्दी देऊन छापल्या जातात. तसेच सरकारकडून नुकसान भरपाई मिळण्यासाठी नैसर्गिक मृत्यू देखील आत्महत्त्या म्हणून भासविले गेले अशा प्रकारचा आरोप त्यांनी आपल्या अहवालात केलेला आहे. मृत झालेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत नरेंद्र जाधव यांनी हे मत नोंदलेले आहे. यापूर्वी मी नरेंद्र जाधव ऐवजी नरेंद्र दाभोळकर यांचे नाव नेहमी नेहमी उच्चारले त्याचे कारण म्हणजे नरेंद्र दाभोळकर हे माझ्या पक्के लक्षात बसलेले आहेत. कारण त्यांच्याविरुध्द मी दोन वर्षापूर्वी एक हक्कभंग दाखल केला होता तो अद्यापही सभागृहासमोर येत नाही. हक्कभंग दाखल करण्याचे कारण असे की, ते सभागृहाच्या गॅलरीत सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत बसले होते व त्यांनी सभागृहात सरकारची मिलीजुली भगत आहे असे एका लेखाद्वारे छापले होते, त्यासंदर्भात मी हक्कभंग दिलेला आहे म्हणूनच ते माझ्या चांगलेच स्मरणात आहेत. एवढा मोठा लेखात्मा त्यांनी केला असताना देखील त्यांच्याविरुध्द दिलेला हक्कभंग सभागृहात मान्यतेसाठी आणण्याची मात्र गरज वाटली नाही. म्हणजे आम्ही केला तो अपमान आणि त्यांनी केला तो मात्र सन्मान. आम्ही फक्त एक शब्द बोललो तर आम्हाला सभागृहातून निलंबित करण्यात आले होते परंतु नरेंद्र जाधव हे अशा प्रकारे "मिलीजुली भगत" असल्याचे लेखात छापतात त्यामुळे अपमान होत नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. काल मी सभागृहात जो हरकतीचा मुददा उपस्थित केला होता त्यासंदर्भात माननीय सभापतींना वाईट वाटले परंतु अशा प्रकारे मिलीजुली भगत सरकार करते त्याचा मात्र येथे अपमान वाटत नाही हेच माझे दु:ख आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, पि. साईनाथ यांनी टोकाला जाऊन शेतकरी म्हणून जगण्यासाठी विदर्भ हा आपल्या देशातील सर्वात वाईट भूभाग आहे अशा प्रकारे महाराष्ट्राची अवहेलना या नरेंद्र जाधवांनी आपल्या अहवालात केली आहे. पि. साईनाथ यांच्या अहवालाबद्दल नरेंद्र जाधवांना वाईट वाटले हे त्यांचे फाइंडिंग त्यांनी अहवालात म्हटले आहे. त्यानंतर त्यांनी टक्केवारीने जी आकडेवारी दिली आहे त्यानुसार आत्महत्त्या कशा झालेल्या आहेत हे सांगितले. महाराष्ट्राची लोकसंख्या यासाठी गृहित धरण्यात आली. परंतु माझा प्रश्न असा आहे की, राज्याची संपूर्ण लोकसंख्या गृहित धरण्याचे कारण काय ? कारण त्यात शहरी भाग, ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर वगैरे सर्वच समाविष्ट असतात. अशा प्रकारे विचार केला शहरात राहणारी लोकसंख्या 42 टक्के आहे. ती एकूण लोकसंख्येतून वजा केली तर बाकीचे जे लोक ग्रामीण भागात राहतात त्यात देखील 15-20 टक्के लोक भूमिहीन आहेत, त्यांच्याकडे शेतीच नाही तेही आत्महत्त्यांचे प्रमाण काढताना वजा करावे लागतील. हे सर्व वजा केल्यानंतर जे शिल्लक राहतात ते शेतकरी आणि अशा निव्वळ शेतकऱ्यांचीच टक्केवारी काढून आत्महत्त्या मोजण्याची गरज आहे. त्याप्रमाणे विचार केला तर हे प्रमाण योग्य प्रकारे मिळू शकते. परंतु सरसकट विचार केला यामध्ये म्हटल्यानुसार राज्यात 29 टक्के आत्महत्त्यांचे प्रमाण असल्याचे सांगण्यात आले परंतु मी सुचविल्याप्रमाणे हे 29 टक्के प्रमाण त्यातून बिगर शेतकरी व शहरी भाग वगळला तर 50 टक्क्याच्या वर गेल्याशिवाय राहणार नाही. शहरी भागात ही आकडेवारी नमूद केली असल्याने हे प्रमाण कमी वाटते. म्हणून पि. साईनाथ यांच्याबद्दल लिहितांना रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार सन 1997 ते 2005 या कालावधीत एकट्या महाराष्ट्र राज्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांची संख्या इतर सर्व राज्यांच्या तुलनेमध्ये जास्तीत जास्त म्हणजे 28911 किंवा देशभर आत्महत्त्यांच्या 19.04 टक्के एवढी होती. त्यांच्या अहवालात त्यांनी असे का म्हटले आहे तर एनसीआरबीच्या आकडेवारीवरुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या सन 2006 साली कमी झाल्याचे दिसून येत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आणि म्हणून ही आकडेवारी जवळ जवळ 4453 वर जाऊन पोहचली आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येची संख्या व देशातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे हे नाकारता येत नाही असे श्री. पी.साईनाथ यांनी म्हटलेले आहे. याला छेद देण्यासाठी असेही म्हटले आहे की, "महाराष्ट्रातील 33 जिल्हयांमध्ये झालेल्या आत्महत्येंपैकी बहुतेक आत्महत्या पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम आणि वर्धा या सहा जिल्हयांमध्ये प्रामुख्याने झाल्या म्हणून महाराष्ट्र शासनाने पश्चिम विदर्भाला पंतप्रधान पॅकेज दिले. श्री. नरेंद्र जाधव साहेब पुढे असे म्हणतात की, "2007 व त्यानंतरच्या वर्षात शेतक-यांच्या आत्महत्येची संख्या 1271 होती. म्हणजे शासनाच्या आकडेवारीवरुन शेतक-यांच्या आत्महत्यांची संख्या दिसते. 2006 साली 1,448 तर 2007 साली अंदाजे 1,241 आत्महत्या झालेल्या आहेत. याचाच अर्थ राज्यशासनाचे पॅकेज जवळजवळ दोन वर्षे आणि मा.पंतप्रधान यांचे पॅकेज जवळजवळ दीड वर्षे अंमलात आल्यानंतर (महाराष्ट्र शासनाच्या आकडेवारीवरुन देखील) विदर्भातील शेतकरी आत्महत्यांच्या संख्येत लक्षणीय घट झालेली दिसून येत नाही. किंबहुना आत्महत्यांचे लोण विदर्भातील इतर जिल्हयांमध्ये देखील पसरत असल्याची माहिती पुढे येत आहे.

सभापती महोदय, 75 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या या दोन एकर ते 12.5 एकर जमीनधारणा करणा-या शेतक-यांमध्ये घडलेल्या आहेत. शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतो असा साक्षात्कार या शासनाच्या एका मंत्र्यांना झालेला आहे. श्री. नरेंद्र जाधव यांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील जी कारणे दिलेली आहेत त्यामध्ये "कर्जबाजारीपणामुळे 93 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, आर्थिक दुरावस्थेमुळे 74 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, नापिकीमुळे 41 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, मुली अथवा बहिणींचे लग्न न करु शकल्यामुळे 34 टक्के शेतकरी आत्महत्या करतात, आरोग्यामुळे 21 टक्के शेतकरी आत्महत्या करतात, ". खरे म्हणजे शेती पिकत नसल्यामुळे आर्थिक परिस्थिती बिघडल्यामुळे 34 टक्के शेतक-यांच्या आत्महत्या होतात असे मला वाटते. खरे म्हणजे दारुच्या व्यसनामुळे शेतकरी आत्महत्या करतो असे नाही तर व्यसन पुष्कळ प्रकारची असतात. व्यसनाधिनतेमुळे 28 टक्के

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

शेतकरी आत्महत्या करतात असे नरेंद्र जाधव म्हणतात. या 28 टक्क्यामुळे एखादा टक्का दारुमुळे असू शकते. जर विदर्भातील शेतकरी कर्जबाजारीपणामुळे 93 टक्के आत्महत्या करीत असतील आणि आर्थिक दुरावस्थेमुळे 74 टक्के शेतकरी आत्महत्या करीत असतील तर हा विषय अजून गंभीर आहे असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, विदर्भातील सिंचन सुविधांकडे 15-20 वर्षे पुरेसे लक्ष दिले गेले नाही ते दाखवण्यासाठी ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. खरे म्हणजे हा विषय सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांचा आहे. विदर्भाच्या सिंचनाकडे शासनाने गेल्या 15-20 वर्षापासून दुर्लक्ष केलेले आहे असे शासनाने नमूद केलेले आहे. विदर्भातील सिंचन क्षमता विकासाच्या बॅकलॉगसोबतच विद्युत पंपसेट जोडणीचा बॅकलॉगही मोठया प्रमाणावर झालेला आहे असे नरेद्र जाधव सांगतात.

सभापती महोदय, एकंदरीत काय गेली सुमारे 15 ते 20 वर्षे विदर्भातील शेतक-यांना शासन आणि बँका यांचा इतरत्र मिळणारा पाठिंबा हळुहळू कमी होत गेला. त्यामुळे शेतक-यांना महागडया स्त्रोतांवर अवलंबून रहावे लागले. बँकाच्या व्याजदराच्या कर्जाऐवजी सावकारांचे भरमसाठी व्याजाने कर्ज घ्यावे लागेले. स्वत:च्या बियाण्यांऐवजी कंपन्यांची महागडी बी-बियाणे वापरावी लागली त्यामुळे शेतीचा उत्पादनखर्च भरमसाठ वाढला आणि दुसरीकडे अपु-या सिंचनव्यवस्थेमुळे निसर्गाच्या लहरीवर अवलंबून रहावे लागले. त्यामुळे शेतीतून मिळणा-या उत्पादनावर विपरित परिणाम झाला. कमी बाजारभावामुळे अनेकदा शेतीचे उत्पादन वाढले तरीही शेतक-यांचे उत्पन्न मात्र वाढले नाही. नैसर्गिक आपदेच्या वेळी पूरक जोडधंद्यातून मिळणा-या उत्पन्नाचा आधार नव्हता, याचा एकत्रित परिणाम म्हणून कर्जबाजारीपण वाढला, सामाजिक स्थानाला धक्का बसला. बँकाचा तगादा आणि त्याहूनही जास्त अनाधिकृत सावकारांचा तगादा यामुळे शेतक-यांची मानसिक कोंडी झाली. स्वाभिमानी शेतक-यांना मान ताठ ठेऊन जगणे अशक्यप्राय झाले आणि त्यातूनच वैफल्यग्रस्त शेतक-यांवर आत्महत्या करण्याची पाळी आली.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

सभापती महोदय, मला अत्यंत खेदाने असे नमूद करावेसे वाटते की, गेल्या अधिवेशनामध्ये शेवटच्या दिवशी अधिवेंशन संपायला पंधरा मिनिटे शिल्लक असतांना संसदीय कार्य मंत्री श्री हर्षवर्धन पाटील यांनी असे सांगितले की, पुढच्या अधिवेशनामध्ये सावकारी प्रतिबंधक विधेयक आणले जाईल. परंतु हे विधेयक आणले गेले नाही. आमच्या उरावर बसणारी अनेक विधेयके तुम्ही आणता परंतु शेतक-यांच्या उरावर बसणा-या सावकाराच्या संदर्भात मात्र सावकारी प्रतिबंधक विधेयक अजूनही शासनाने आणलेले नाही.हा शासनाचा दोष आहे. काल या ठिकाणी जे विधेयक आले होते ते बनवाबनवीचे होते.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येमध्ये खंड पडत नाही.विदर्भाच्या विकासाच्या बाबतीत हे शासन संपूर्णपणे उदासीन राहिलेले आहे अनेकांनी सांगितल्याप्रमाणे मदतीसाठी पात्र ठरलेल्या शेतक-यांना हे शासन पैसे देत नाही. त्याना बी बियाणे मिळत नाही. शेतक-याकडील दुभती जनावरे खेचून नेली. शेतक-यांना जे पॅकेज जाहीर करण्यात आले होते त्यामध्येसुध्दा भ्रष्टाचार झाला आहे. शेतक-याना पुरेशी आणि योग्य मदत मिळावी याबाबत शासनाकडे प्रामाणिकपणा नाही.सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दिन जव्हेरी यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्याकडे जर खरोखर प्रामाणिकपणा असेल तर विदर्भातील सर्व आमदारांनी एकत्र यावे आणि सरकारकडे राजीनामे द्यावेत. अशा प्रकारची आज परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतक-यांना द्यावयाची जनावरे सरकारने पळवली असून ती आमदारांना व खासदारांना दिली तसेच नको त्या लोकांना दिली. शेतक-यांकडे जी काही जनावरे होती ती कसायाकडे गेली आहेत. श्री.नरेंद्र दाभोळकर यांनी जे लिहिलेले आहे ते वास्तव असून ते अत्यंत महत्वाचे आहे. जनावरांच्या बाबतीत त्यांनी असे लिहिलेले आहे की," बी बियाणे, दुधाळ जनावरे , शेतीची अवजारे देत असतांना संबंधित अधिका-यांनी शेतक-यांकडे पैसे मागितले होते .अवजारांचे वाटप करीत असतांना अधिका-यांनी शेतक-यांकडे पैसे मागितले व त्यानंतरच त्यांना मदत देण्यात आली " शासनाकडे जर हिंमत असेल तर अशा प्रकारे वागणा-या अधिका-यांचे मनगट पकडावे आणि त्यांना फरफटत बाहेर आणावे परंतु तसे करण्यासाठी शासनामध्ये हिंमतच नाही. या अहवालामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की," अधिका-यांनी शेतक-यांकडे पैसे मागितले असून अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आल्या आहेत,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जनावरे, शेती अवजारे ,वॉटर पंप,बैलगाडी इत्यादी मालाच्या किंमती बाजारापेक्षा जास्त लावल्या . व निकृष्ट दर्जाचे साहित्य घेण्यात आले होते."शासनाने नेमलेल्या अहवालात अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आलेला आहे. तेव्हा या बाबतीत शासनाने पुढे काय कार्यवाही केली यांसंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, त्या अहवालात असे म्हटलेले आहे की,"या साहित्याच्या खरेदीमुळे प्रत्यक्षात फायदा व्यापा-यांना, कंत्राटदाराना पोहोचला अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत." शासनाने नेमलेल्या समितीचा अहवाल आम्हाला दिलेला असून त्यात काय म्हटलेले आहे हे मी आताच येथे मांडलेले आहे त्यासंदर्भात कारवाई करण्याची मानसिकता शासन दाखवत नाही, शेतक-यांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजमध्ये जो भ्रष्टाचार झाला त्याबाबतीत शसन कोणावरही कारवाई करीत नाही,या सदनामध्ये मी यापूर्वी बोललो होतो हे मला आठवते.तो तळतळाट होता माझा उत्स्फूर्त राग होता तसेच संताप होता. तेव्हा शासनामध्ये जर हिंमत असेल तर या सगळया अधिका-यांच्या घरादारावर नांगर फिरवावा. हे अधिकारी शेंतक-यांच्या घरावर नांगर फिरवत असतात त्याप्रमाणे शासनानेसुध्दा तसे करावे परंतु यातील एक टक्कासुध्दा शासन करीत नाही.हे माझे दुर्देव आहे. विदर्भ हा वेगळा होणार की नाही हा विषय नसून या राज्यातील शेतक-यांना मदत देणे ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे परंतु विदर्भातील शेंतक-याला उपाशी मारण्याचे काम हे शासन करीत असून या शेतक-यांना तडफडायला लावत आहे. या शासनाला कधी कसा फटका मारावयाचा हा आमच्या समोर प्रश्न आहे . हे शासन लोकशाही विकत घेत आहे परंतु तडफडणारे आत्मे मात्र त्यांना सांभाळता येत नाही हे दुर्देव निवडणुकीच्या निमित्ताने पहावयास मिळाले .माननीय मंत्रिमहोदयंनी असे सांगितले की,यवतमाळमध्ये सर्वात जास्त आत्महत्या झालेल्या असल्या तरी तेथे एक सोडून सगळे कॉग्रेसचे आमदार निवडून आले आहेत. अशा प्रकारे मिशीला तूप लावून बोलले जाते.टाळूवरचे लोणी खाणा-यांनासुध्दा लाजवेल इतकी शासनाची मस्ती वाढलेली आहे.म्हणून मी या शासनाचा निषेध करतो ,खेंद व्यकत करतो त्या पेक्षा मी दुसरे शब्द वापरु शकत नाही. या शेतक-यांना शासन तडफडून मारत आहे याचे मला दु:ख होत आहे कधी तरी या यातनेतून शेतक-यांना सोडवणार आहात काय असा प्रश्न विचारुन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे तर या विषयावर वारंवार बोलणे म्हणजे जसा वर्षाला सण येतो आणि तो साजरा करावा लागतो तसे झाले. आम्ही बोलत राहायचे आणि तुम्ही केवळ ऐकायचे, त्यातून निष्पन्न काही होत नाही. सभापती महोदय, मी बोलण्याच्या आधी आपल्या माध्यमातून मला एक विनंती करायची आहे. खरोखरी तुम्ही शेतकरी आणि त्यांच्या आत्महत्या हा विषय गंभीर करणार आहात का ? हा विषय गंभीर करायचा असेल तर काही शब्दांची आठवण मी या प्रसंगी आपल्याला करून देऊ इच्छितो. 30 जून 2006 ला वर्धा जिल्ह्यातील वायफड गावामध्ये आले असताना देशाच्या पंतप्रधानांनी, माननीय श्री.मनमोहनसिंग यांनी एक शब्दउ वापरला होता की, एक जरी आत्महत्या होत असेल तरी ती आमच्यासाठी शरमेची गोष्ट आहे. सभापती महोदय, दुर्दैवाने या वर्षी 946 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. देशाच्या माननीय पंतप्रधानांच्या म्हणण्याप्रमाणे एक आत्महत्या होणे ही शरमेची गोष्ट असेल तर 946 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्याबाबत आपले काय म्हणणे आहे ? त्याबद्दलची आपली प्रतिक्रिया काय आहे ? या गोष्टीचा आपण गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, देशाचे पंतप्रधान जेव्हा ही गोष्ट बोलले तेव्हा त्या ठिकाणी या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख उपस्थित होते तसेच आताचे आणि तेव्हाचेही राज्याचे गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हेही त्या सभेला उपस्थित होते. देशाच्या पंतप्रधानांनी 'शरमेची गोष्ट' हे शब्द वापरले आहेत तेव्हा त्यावर तुम्ही सगळ्यांनीच गंभीर होणे गरजेचे आहे की नाही ?

सभापती महोदय, या वर्षाच्या बाबतीत मला आपल्याला काही सांगावयाचे आहे, दाखवून द्यायचे आहे. विदर्भातील मुख्य पीक हे सोयाबीनचे आणि कापसाचे आहे. मी आपल्याला या निमित्ताने या वर्षीची विदर्भातील सोयाबीनच्या पिकाची अवस्था काय आहे ते दाखविणार आहे. मी माझ्याबरोबर सोयाबीनचे रोपटे आणले आहे. (सन्माननीय सदस्य त्यांच्याजवळील सोयाबीनचे रोपटे सगळ्यांना दाखवितात..) सभापती महोदय, मी आणलेले हे सोयाबीनचे रोपटे या वर्षीचे आहे आणि त्याला पाणी दिलेले आहे. वरून पाहिले तर त्याला शेंगाही लागल्याचे आपल्याला दिसेल. या रोपाची वाढदेखील भरपूर झालेली आहे आणि याला दोन वेळ खत दिलेले असून दोन वेळा त्याची निंदणी झालेली आहे आणि एका निंदणीसाठी एका वेळेस अडीच हजार रूपये खर्च झालेले आहेत. परंतु शेंगेमध्ये दाणा भरण्याच्या काळात पाऊस पडला नाही त्यामुळे त्यात दाणा भरू शकलेला

..... एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

नाही, नुसती शेंग आहे, त्यात काहीच नाही. सभापती महोदय, विदर्भामध्ये आपण या अधिवेशनाच्या निमित्ताने आला तेव्हा येथील शेतकऱ्याला वाटले की, हे सरकार आता आमची दखल घेण्यासाठी आले आहे, आमचे दु:ख जाणून घेऊन त्यावर फुंकर मारण्यासाठी आले आहे. सरकार अनुशेषाच्या संदर्भात विचार करील अथवा न करील, विदर्भातील कारखानदारीबद्दल विचार करील वा न करील, परंतु या वर्षी आम्हा शेतकऱ्यांवर, कास्तकारांवर जे संकट आले आहे त्यावर हे सरकार विचार करणार आहे की नाही ? सभापती महोदय, या शेतकऱ्यांना त्याबाबत दम धरवेना म्हणून त्यांच्यापैकी काहींनी काही गोष्टी केल्या. त्यातील एक मी आपल्याला सांगतो. बुलढाणा जिल्ह्यातील सावला गावातील दोन तरूणांनी स्वत:ला नरड्यापर्यंत जमिनीत पुरून घेतले. त्यासाठी स्वत:च खड्डा खणला आणि त्यात ते पाच तास होते. 12 डिसेंबरचा तो दिवस होता. या दिवशी देशाचे कृषीमंत्री माननीय श्री.शरद पवार यांचा वाढदिवस असतो आणि त्याच दिवशी या देशातील, या राज्यातील शेतकऱ्याच्या मुलांनी स्वत:ला जमिनीत गळ्यापर्यंत पुरून घेतले. पण त्यांच्यावर खटला दाखल केला गेला. आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणून हा खटला दाखल करण्यात आला. सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते. आपण विदर्भातील सोयाबीन पहा, कापूस पहा, आणि भाताच्या बाबतीत मला बोलायला लाज वाटते की, या सदनाचे एक सदस्य श्री.मानकर यांनी ज्या दिवशी या सभागृहात भाताची प्रत आणून दाखविली. मी काही भाताचा शेतकरी नाही पण मी भात खाणारा आहे. माझी स्वत:ची 15 एकर कोरडवाहू जमीन आहे आणि त्यात मी हायब्रीड पेरला होता. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.शंकरराव चव्हाण हे होते. पण त्यावेळी निसर्गाच्या अवकृपेमुळे हायब्रीड चांगला येऊनही पांढरी ज्वारी काळी झाली आणि शेतकऱ्यावर आभाळ कोसळले. तेव्हा सरकारने ती काळी ज्वारी घेणार म्हणून सांगितले.... मग आम्ही जगायचे कसे ?

(यानंतर श्री.सरफरे ... आय 1 ..

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्र नाही

श्री. पाशा पटेल...

हे एकच पीक रानामध्ये सात ते आठ क्विंटल येते. ते पीक सुध्दा आपण घेणार नसाल आणि ते काळे पीक म्हणून आमच्या नशिबावर खापर फोडणार असाल आणि निसर्गाचा दोष आमच्यावर लादणार असाल तर आम्ही जगायचे कसे? सभापती महोदय, दुर्दैवाने या धानाच्या प्रदेशातील परिस्थिती पाहिली तर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांना स्वत:ची इमारत नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची तीन ते चार मजल्यांची काचेची इमारत आहे. परंतु या धानाच्या भागातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांमध्ये मी जाऊन फिरुन आलो, त्या सोसायटयांना स्वत:ची जागा नाही, इमारत नाही. याचे कारण येथील धान पिकविणारा शेतकरी कर्ज घेत नाही, कर्ज घेतले तर ते फेडत नाही. कारण टर्नओव्हर होत नाही. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटयांना व्याज मिळत नाही, त्यामुळे त्यांची इमारत होत नाही. परंतु पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाण्यातून, कर्जातून, ऊसातून पैसे आले, टर्नओव्हर झाल्यामुळे तीन-चार मजल्यांची इमारत झाली. माझा सरकारला सवाल आहे की, एकाच आईच्या कुशीतून जन्मलेली दोन मुले आहेत. त्यामध्ये ऊस पिकविणारा शेतकरी चांगला आहे तर धान पिकविणारा शेतकरी ओरडून सांगतो की माझे धान काळे आहे. अशावेळी या सरकारचे कर्तव्य होते की, धान उत्पादकांनो तुमचे वर्षातून एकच धानाचे पीक येते, त्याशिवाय दुसरे पीक येत नाही. अशावेळी तुमच्यावर जर संकट येत असेल तर त्याबाबत विचार करु. अशी भाषा आपल्या तोंडातून यायला नको. सभापती महोदय, हा दोन-तीन जिल्हयांचा प्रश्न आहे. यावर किती खर्च होणार आहे. सहावा वेतन आयोग लागू करतांना तुमचे हात थरथर कापले नाहीत. कुणालाही मदत देतांना तुमचे हात थरथर कापत नाही. परंतु आपल्या काळया आईची सेवा करणाऱ्या आणि शहरात राहणाऱ्या माणसाचे पोट भरणाऱ्या माणसाचा आक्रोश बघत नसाल तर आपण विदर्भात येता कशाला? येण्याचे नाटक कशासाठी करता? यायचे असेल तर थोडी तरी संवेदना तुमच्यामध्ये राहू द्या. या आक्रोशाला आपण साद घाला आणि या दोन तीन पिकांच्या बाबतीत गंभीरपणे बघण्याचा प्रयत्न करा. सभापती महोदय, सोयाबीन किती पिकले? कापूस किती पिकले? याबाबतीत वाद घालण्याची गरज काय? मी सरकारला विनंती करतो की, गेल्या तीन वर्षात मार्केट कमिटीमध्ये किती क्विंटल धान आले? त्यावरुन त्या भागात दुष्काळ पडला की नाही हे कळते. त्यासाठी चौकशी करण्याची गरज काय? बाकीच्या भानगडी करण्याची गरज काय? हे जर खरे असेल तर हे विदर्भ सोडण्यापूर्वी आपण विदर्भातील कापूसवाल्या, सोयाबीनवाल्या, धान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. पाशा पटेल...

पिकविणाऱ्याचे किमान मत जाणून घ्या, आणि काहीतरी देऊन जा. लोकांच्या मतांवर तुम्ही निवडून आलात. लोकांची आपल्याला कशीही मते मिळतील परंतु त्यांचा तळतळात फार वाईट असतो, तो दिसत नाही. आणि मग ते भूत म्हणून मागे लागेल. सर्व मरणारे आत्मे तुमच्या मागे लागल्याशिवाय राहणार नाहीत. आणि म्हणून मी सर्वांत महत्वाची गोष्ट शासनाला विचारणार आहे की, नामदार कृषी मंत्री महोदय मी दोन-तीन वेळा उत्पादन खर्चासंबंधी बोललो आहे. तुम्ही एकदा ॲग्रो वनच्या निवडणुकीमध्ये सांगितले की, 14 पिकांचे उत्पादन खर्च मी काढणार. शेतकऱ्यांनी सहकार्य करुन उत्पादन खर्चाची माहिती द्यावी. लोकांना वाटले की, या देशामध्ये एकमेव गबरु कृषी मंत्री मिळाला. त्यांनी असे सांगितल्यामुळे मला आनंद वाटला. आपण 35 वर्षे शेतकऱ्यांसबंधी बोलतो. हे सरकार नालायक असे म्हणतो, परंतु या सरकारमध्ये एक लायक माणूस निघाला त्यांनी आमचा विचार केला. उत्पादन खर्च काढायला माझ्याकडे कोण येत आहे याची मी वाट पहात आहे. आपला माणूस माझ्याकडे येईल आणि मला विचारील की, तुझा उत्पादन खर्च काय?आपण उत्पादन खर्च काढाल तेव्हा काढाल, उत्पादन खर्चावर आधारीत भाव देऊ नका. परंतु तेवढा खर्च येत आहे काय हे तरी आपण पहा. सभापती महोदय, माझ्याजवळ कागद आहेत त्या कागदाची मला लाज वाटत आहे.त्यामध्ये म्हटले आहे की, "हंगामनिहाय आधारभूत किंमत प्रति क्विंटल 2007-08, 2008-09, 2009-10 आणि 2010-11" या चार वर्षाच्या आधारभूत किंमतीचा तक्ता माझ्यासमोर आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

त्यापैकी एक तक्ता हा राज्य शासनाने केंद्र शासनाला जे भाव सुचविलेले आहेत, त्यासंबंधी असून दुसरा तक्ता हा केंद्र शासनाने जे भाव जाहीर केले आहेत, त्याबाबत आहे. याबाबतीत राज्य शासनाला काय वाटते? केंद्र शासनाला काय वाटते? या संदर्भातील शासनाचे आकडे आहेत, माझे नाही.

सभापती महोदय, 2007-2008 मध्ये भाताच्या, धानाच्या पिकासंदर्भात राज्य शासनाकडून 951 रुपये देण्यात यावेत असा केंद्र शासनाकडे प्रस्ताव गेला. परंतु केंद्र शासनाने 645 रुपये इतका भाव दिला. मी जास्त बोलत नाही. कारण मलाही वाईट वाटते की, जेथे काही उपयोग नाही, तेथे बोलावयाचे कशासाठी ? आंदोलन कोणासमोर करावे ? तर ज्याला आंदोलनाची किंमत कळते. अहिंसेच्या बाबतीत बोलावयाचे तर ज्याला अहिंसाच कळत नाही तर त्याच्यासमोर बोलून काही उपयोग आहे काय ? त्यामुळे केवळ तोंडाची हवा खराब करण्यामध्ये काही मतलब नाही. एवढे हे सरकार निगरगट्ट आहे. मला त्यासंदर्भात देखील काही बोलावयाचे नाही. पण हे जे नाटक सुरु आहे, ते तरी बंद करु शकता काय ? केंद्र शासनाचे म्हणणे खरे आहे की राज्य शासनाचे म्हणणे खरे आहे ? केंद्र शासनाने सुचविलेला दर खरा आहे की राज्य शासनाने सुचविलेला दर खरा आहे ? एवढे तरी कळले पाहिजे. तसेच केंद्र शासनाला असे का वाटते आणि राज्य शासनाला असे का वाटते हे देखील समजले पाहिजे.

सभापती महोदय, माझ्यासमोर 2007-2008 मधील धानाची आकडेवारी आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे धानाच्या पिकाच्या बाबतीत राज्य शासनाने 951 रुपयांची केंद्र शासनाला शिफारस केली, त्याप्रमाणे तेवढा भाव मिळावयास पाहिजे. परंतु केंद्र शासनाने शेतकऱ्याला धानासाठी 645 रुपये इतका भाव दिला. शेतकऱ्यांना धानाच्या पिकासाठी 951 रुपये मिळालेले नाहीत, कारण उत्पादन खर्च काढत असताना बैलाची मजूरी फक्त 13 दिवसांची पकडण्यात आलेली आहे. उत्पादन खर्चावरील भाव वेगळे आहेत, ते सरकारला कसे वाटले ? हे मला माहिती नाही. प्रत्यक्षात राज्य शासनाला जे वाटले, तेच केंद्र शासनाने जाहीर केले. सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. मी धान पिकाच्या बाबतीत सांगितले. आता बाजारी, सोयाबीन या दोन पिकांबद्दल सांगतो, त्यानंतर विषय संपला. त्यानंतर मी काहीही बोलणार नाही. आपण खाली बसा म्हटले तर बसतो. कारण मला माहिती आहे की, कितीही, काहीही बोलले तरी काही मिळणार नाही. वांझ ...

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल . . . .

गाईचे दूध काढण्यामध्ये काही मतलब नाही.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.पाशाभाई पटेल यांना एक आठवण करुन देऊ इच्छितो की, मघाशी आपण 12 डिसेंबरची घटना सांगितली आणि त्यादिवशी माननीय कृषी मंत्र्यांचा वाढदिवस असतो आणि त्यादिवशी आपल्या आदरणीय श्री.गोपीनाथजी मुंडे यांचाही त्या दिवशी वाढदिवस असतो.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, आमचे आदरणीय श्री.गोपीनाथजी मुंडे हे कृषी मंत्री असते, तर मी त्यांना सुध्दा असेच बोललो असतो. एवढेच नाही तर जरी बाप शेतकऱ्यांच्या हिताच्या आडवा आला तरी त्याला माफ करणार नाही ही माझी . . . .

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना आठवण करुन देऊ इच्छितो की, सध्या बाजरी आणि सोयाबीनचा विषय सुरु आहे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, यावर्षीच्या म्हणजे 2009-2010 मधील धानाच्या पिकाबाबत सांगावयाचे तर राज्य सरकारने केंद्र सरकारला कळविले की, या राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना 1190 रुपये असा भाव द्यावा. तुमच्याच खात्याने केंद्र शासनाला कळविले. पण केंद्र शासनाकडून 950 रुपये इतका भाव मिळाला. माननीय कृषी मंत्री महोदय तुम्हाला सांगू इच्छितो की, एखाद्या मुलाने बापाकडे बिस्कीटसाठी एक रुपया जरी मागितला तर त्याचा बाप माग सरकून त्या मुलाच्या कानाखाली हाणतो. ही गावातील अवस्था आहे, बाप पोटच्या लेकराला एक रुपया देत नाही आणि तुम्ही आमच्या एवढया मोठमोठया रकमा कापल्या तर लोक न मरुन दिवाळी साजरी करतील काय ? आता आमच्या मरणाचे तुम्ही लईच भांडवल केलेले आहे. दारु पिऊन मरण पावला असे सांगितले जाते. इतर काहीही बोला पण निदान असे तरी म्हणू नका.

सभापती महोदय, एक गोष्ट सांगून मी भाषण संपविणार आहे. दारुमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दुर्धर रोगामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कौटुंबिक कलहामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे गोड-गोड शब्द वापरले जात आहेत. परंतु शेतकरी आत्महत्येच्या विचारापर्यंत का येतो हे अगोदरही सांगितले आहे. मी नशिबाने वाचलेला कार्यकर्ता आहे. मी सुध्दा कॉलेज सोडून शेती करु लागलो. पण जेव्हा मला शेतीमध्ये वाईट अनुभव आले, तेव्हा मी सुध्दा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. पण मी नशिबाने वाचलेला कार्यकर्ता आहे.एखादा शिकलेला मुलगा असेल .....

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्याच्या समोर अस्मानी संकट आले असेल तो वैतागून विष पिण्यापेक्षा दारु पिणे पसंत करतो आणि त्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहेत असे म्हणणार असाल तर देव तुमचे भले करो. तुम्ही आमचे प्रश्न सोडविणार नसाल तर आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचे पाप तुमच्याकडून होऊ नये अशी माझी अपेक्षा आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

आमचे प्रश्न सोडवू नका पण एक गोष्ट लक्षात ठेवा की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आणि मजुरांचा प्रश्न जर सुटला नाही तर एक गोष्ट लक्षात ठेवावी. आज तुम्ही जनतेच्या मतावर निवडून आलात पण उद्या गावागावतील शेतकऱ्याच्या मुलाने आपल्या फासाच्या तलवारी केल्या तर शासनाला ते आटोक्यात आणता येणार नाही, एवढाच मी याठिकाणी या शासनाला धोक्याचा इशारा देऊ इच्छितो.

सभापती महोदय, एक वाक्य सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र सरकारने कबूल केलले आहे. केंद्रात सरकार आपलेच आहे. केंद्र सरकारने काय सांगितले आहे? केंद्र सरकारने असे म्हटले आहे की, "अन्याय आणि नैराश्यातून केवळ अतिरेकाचा जन्म होतो. देशातील शंभरहून अधिक जिल्हयामध्ये नक्षलवाद्याच्या प्रसाराने धोक्याचा इशारा दिलेला आहे." उरलेल्या जिल्यामध्ये जनतेच्या मनातील असंतोष जातीच्या माध्यमातून येऊ लागलेला आहे. असे कां घडले? याचे कारण शेवटच्या माणसापर्यंत विकासाचे लाभ पोहचवण्यात शासन यंत्रणेला अपयश आलेले आहे. सभापती महोदय, आज या देशाला एक परकीय धोका आणि एक आतून धोका निर्माण झालेला आहे.आतून नक्षलवाद आणि बाहेरुन आतंकवाद या दोन गोष्टीमुळे हे शासन त्रस्त झालेले आहे. जसा आंतर्गत धोका आहे तसाच बाहेरचा धोका आहे. बाहेरचा धोका कशा पध्दतीने थोपविण्यात येणार आहे हे मला माहीत नाही. पण अंतर्गत धोका जर थांबवायचा असेल तर मी सांगू इच्छितो की, सहाव्या वेतन आयोगाला माझा विरोध नाही. पण शासकीय कर्मचाऱ्यांना जसा सहावा वेतन आयोग देण्यात आला त्याप्रमाणे गावात काम करणाऱ्या शेतमजुरांची आणि शेतमालकांची मजुरी शेतीमालाच्या उत्पादन खर्चामध्ये समाविष्ट केली तरच हे लोक जगू शकतील अन्यथा हे लोक आंदोलन केल्याशिवाय राहाणार नाहीत. आणि परिस्थिती इतकी हाताबाहेर जाईल की, शासनाने कितीही मिलिटरी आणून उभी केली तरी ते आटोक्यात येणार नाहीत.(वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली) म्हणून मी या शासनाला अशी विनंती करतो की, तीस दिवस हजार गोष्टींची चर्चा करण्यापेक्षा आज काही तरी घोषणा करण्यात यावी तरच आम्हाला न्याय मिळेल. नाही तर ज्या बाकीच्या गोष्टी आहेत, त्यापासून या राज्याला शासन थांबवू शकणार नाही. ते तुम्ही थांबवावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता श्री. पांडुरंग फुंडकर ने विदर्भ के विकास के बारे में नियम 260 के अन्तर्गत जो प्रस्ताव पेश किया है, उसके ऊपर मैं अपने विचार प्रकट करना चाहता हूँ.

सभापति महोदय, नागपुर में जब विधान सभा का सत्र होता है तो विदर्भ में हुए नुकसान के बारे में चर्चा जरुर होती है. प्रति वर्ष नागपुर में सत्र होता है और हम सभी लोग विदर्भ के नुकसान के बारे में, विदर्भ के विकास के बारे में जागृत होकर चर्चा करते हैं तो केवल ऐसा लगता है कि जिस तरह से किसी व्यापारी के लाइसेंस का साल में एक बार नवीनीकरण किया जाता है तो उसी तरह से हम लाइसेंस के नवीनीकरण की बात करते हैं, लेकिन उसका परिणाम कुछ भी नहीं आता है. यह बड़े दुख की बात है.

सभापति महोदय, सरकार ने विदर्भ के लिए कई पॅकेज घोषित किए हैं. हम धान उत्पादक जिले से आते हैं. भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपुर, इन 4 जिलों के लिए तथा नागपुर जिले के किसानों के लिए सरकार के द्वारा किसी भी प्रकार का पॅकेज नहीं दिया गया है. पिछले कुछ दिनों में इन जिलों के धान उत्पादक किसानों ने आत्महत्या की है, लेकिन उनके लिए किसी भी प्रकार का पॅकेज घोषित नहीं किया गया है, उनके लिए किसी भी प्रकार का ध्यान नहीं दिया गया है. यवतमाल और वर्धा जिले में जिस तरह से आत्महत्या बढ़ी हैं, क्या उस तरह से आत्महत्याएं बढ़ने पर सरकार धान उत्पादक किसानों के बारे में सोचेगी ? मैं आपको बताना चाहता हूँ कि अक्टूबर नवम्बर माह में हमारे जिले में बहुत बारिश हुई. हमने सभी संबंधित बड़े अधिकारियों को जिले का दौरा करवाया. हमने एक छोटी सी रिक्वेस्ट की कि किसानों का जो धान काला हो गया है, उस धान को व्यापारी खरीद नहीं रहा है. इससे किसान का बहुत नुकसान हो रहा है तो 1998 में इस प्रकार की परिस्थिति उत्पन्न होने पर सरकार ने काले धान की खरीदी करके किसानों की सहायता की थी. हमने सरकार से यह बात कही है कि सरकार द्वारा काले धान की खरीदी की जाए, लेकिन नागपुर में अधिवेशन होने के बावजूद भी हमारी मामूली सी बात सरकार मंजूर करने को तैयार नहीं है. यह बहुत दुख की बात है. विदर्भ के बारे में सरकार बड़ी बड़ी योजनाओं की घोषणा करती है, इसलिए हमारी एक छोटी सी बात सरकार को माननी चाहिए और किसानों के काले धान की खरीदी होनी चाहिए. 1998 में सरकार ने जिस प्रकार से

. . . L 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. राजेंद्र जैन

धान उत्पादक किसानों की सहायता की थी, उसी प्रकार से आज भी इन किसानों की सहायता करनी चाहिए. इससे भंडारा, गोंदिया, चंद्रपुर और गडचिरोली, इन 4 जिलों के किसानों को लाभ होगा.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील)

सभापति महोदय, मैं भंडारा और गोंदिया जिलों में सिंचाई के प्रकल्पों के बारे में कहना चाहता हूँ कि केन्द्रीय सरकार ने गोसीखुर्द प्रकल्प को तो राष्ट्रीय प्रकल्प घोषित किया है, लेकिन बावनथडी प्रकल्प और धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प (2) अभी तक पूरे नहीं हुए हैं. कई प्रकल्पों का काम झुड़पी जंगल की वजह से रुका हुआ है. लेकिन जिन प्रकल्पों का 90 प्रतिशत काम पूरा हो गया है, उन प्रकल्पों को तुरन्त पूर्ण करना चाहिए. बावनथडी प्रकल्प की वजह से पूरे जिले का नक्शा बदलने वाला है और जिस पर राज्य शासन ने करोड़ों रुपए खर्च किए हैं, लेकिन मालूम नहीं कहां पर काम रुक जाता है. इस बारे में प्रश्न पूछने पर हमें हर साल यह बताया जाता है कि गार्ज फिलिंग का काम बाकी है. हर साल नागपुर सत्र में विदर्भ के विकास पर चर्चा होती है और विदर्भ में किसानों की आत्महत्या पर हम बात करते हैं. गोंदिया और भंडारा जिले के धान उत्पादक किसानों को बचाने के लिए जिन सिंचन प्रकल्पों का 80 प्रतिशत काम पूरा हो चुका है, जिन सिंचन प्रकल्पों का 90 प्रतिशत काम पूरा हो चुका है, इन प्रकल्पों को तुरन्त पूरा करना चाहिए और किसानों के लिए सिंचाई के साधन बढ़ाने चाहिए. इस सत्र के माध्यम से मैं सरकार से यह मांग करता हूँ.

सभापति महोदय, हम आदिवासी जिले से आते हैं. भंडारा, गोंदिया, गडचिरोली और चंद्रपुर जिलों में बहुत से लोग लाख का धंधा करते हैं. जब किसानों का खेती में नुकसान होता है, धान की फसल अच्छी नहीं होती है, उस समय लाख के धंधे से उनके जीवनयापन में मदद होती है. हमारे पड़ोसी राज्य मध्य प्रदेश में सरकार की नीति इतनी अच्छी है कि वहां पर लाख का धंधा अच्छी तरह से चल रहा है. जबकि हमारे 4 जिलों के किसान फोरेस्ट डिपार्टमेंट की अड़चनों की वजह से लाख का व्यापार अच्छी तरह से नहीं कर सकते हैं. इस बारे में हमने कई बार सरकार का ध्यान आकर्षित किया है, लेकिन ऐसा लगता है कि विदर्भ के किसानों के विकास के मुद्दे पर सरकार ध्यान नहीं देती है.

. . . L 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. राजेंद्र जैन

सभापति महोदय, नागपुर सत्र के माध्यम से मैं आपका ध्यान गोंदिया, भंडारा, चंद्रपुर और गडचिरोली की एम.आई.डी.सी. की ओर दिलाना चाहता हूँ. सरकार ने 15-20 साल पहले वहां पर जमीन तो एक्वायर की है, लेकिन वहां पर किसी भी प्रकार का कोई उद्योग नहीं है. वहां पर एम.आई.डी.सी. में उद्योग क्यों नहीं शुरु होते हैं, इसके क्या कारण हैं, सरकार इस बारे में संजीदगी से क्यों नहीं देखती है ? नागपुर सत्र के माध्यम से मैं शासन का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहता हूँ.

सभापति महोदय, गोंदिया, भंडारा, चंद्रपुर और गडचिरोली जिलों में चावल उद्योग की वजह से हजारों लोगों को रोजगार मिलता है. चावल उद्योग के बारे में कभी लेवी के विषय में या किसी अन्य विषय के बारे में राज्य शासन की नीति में परिवर्तन होता रहता है, जिसकी वजह से गोंदिया, भंडारा, चंद्रपुर और गडचिरोली जिले के लोगों का बहुत नुकसान होता है. धान के भाव कम मिलने से लोगों को रोजगार मिलने में अड़चन निर्माण होती है.

सभापति महोदय, भंडारा और गोंदिया जिले के सिंचाई प्रकल्पों के बारे में केन्द्र सरकार या राज्य सरकार की तरफ से कितना खर्च हुआ है, कितना काम पूरा हो गया है और अभी कितनी राशि की आवश्यकता है, इसकी यादी बनाकर सारे प्रमाण और पुरावे राज्य सरकार को दिए हैं, लेकिन प्रोजक्ट पूरे होने में 2-3 साल का समय बढ़ने से प्रोजक्ट की कीमत बढ़ रही है. इससे निधि मिलने में अड़चन आती है और सारी परेशानियां विशेष रुप से विदर्भ के धान उत्पादक जिले के किसानों को भुगतनी पड़ती हैं. इस बारे में शासन का किसी प्रकार का ध्यान नहीं है. इस सत्र के माध्यम से मैं शासन से अनुरोध करना चाहूंगा कि एक तो हमारे सिंचन प्रकल्प पूरे होने चाहिए और दूसरे काले धान की खरीदी के बारे में शासन को अविलम्ब निर्णय लेना चाहिए. अगर ऐसा नहीं होता है तो जैसा कि हमारे माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी ने कहा है कि विदर्भ को अलग कर देना चाहिए.

सभापति महोदय, अन्त में मैं इतना ही कहना चाहूँगा कि नागपुर सत्र में विदर्भ के विकास के बारे में बहुत बड़ी बड़ी बातें होती हैं, जिससे विदर्भ के लोगों के मन में उत्साह पैदा होता है कि सरकार कुछ न कुछ देकर जाएगी. माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख ने हमेशा सिंचन के अनुशेष के बारे में आंकड़ों के हिसाब से बताया है कि 15 साल पहले क्या स्थिति थी, 10 साल

. . . . L 4

. . . . श्री. राजेंद्र जैन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पहले क्या स्थिति थी और आज क्या स्थिति है, लेकिन उसका रिजल्ट जीरो रहा है. हमारे सामने प्रश्न यह है कि आज यह सत्र समाप्त हो जाएगा. अगले साल ठंड के दिनों में फिर से नागपुर में सत्र होगा, इससे हमें ऐसा लगता है कि कोई व्यापारी अपने लाइसेंस का नवीनीकरण कराने के लिए आता है और कोई रिजल्ट हमारे सामने नहीं आता है. इस सत्र के माध्यम से मैं सरकार से यह अनुरोध करना चाहूंगा कि धान उत्पादक जिलों के सिंचन प्रकल्प पूरे किए जांए और काले धान की खरीदी के बारे में शासन कुछ न कुछ निर्णय ले, तभी हम समझेंगे कि नागपुर का यह सत्र सार्थक हुआ. जय हिन्द,जय महाराष्ट्र.

. . . . . .

. . . (भाषण पूर्ण, नंतर श्री. अरविन्द सावंत
यांचे मराठी भाषण. श्री. खंदारे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एका अतिशय महत्वाच्या विषयावर, जिव्हाळयाच्या विषयावर या सदनामध्ये चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी म्हटल्याप्रमाणे मलाही तसेच वाटते. नागपूरला आलो की, विदर्भाबद्दल बोलावयाचे आणि मुंबईला गेलो की पाठ फिरवावयाची असे सरकारचे धोरण आहे. या चर्चेवर बोलत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी अनेक मुद्यांचा वेध घेतला असल्यामुळे मी केवळ 2-3 मुद्दे मांडणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी आता जे विधान केले आहे त्यात दुरुस्ती करु इच्छितो. आतापर्यंत गेल्या 4 वर्षात असे एकही अधिवेशन झाले नाही की, विदर्भाच्या प्रश्नावर, विदर्भातील शेतक-यांच्या प्रश्नावर चर्चा झाली नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे नाही. विदर्भाच्या प्रश्नावर येथे आल्यावर चर्चा करतो पण येथून गेल्यावर त्या प्रश्नांकडे सरकारची पाठ फिरते. आपण नेहमी चर्चा करतो, आपण थांबत नाही. आम्ही संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते आहोत. आमचा जीव बेळगांव, कारवार, भालकी, निपाणी व विदर्भात गुंतलेला आहे. मुंबईला आल्यानंतर विदर्भाचा विषय मांडावयाचा किंवा नाही अशी भूमिका आम्ही घेत नाही. परंतु येथे आल्यानंतर विदर्भासंबंधी काही तरी करण्याचा, दाखविण्याचा प्रयत्न करतात आणि मुंबईला गेल्यावर पाठ फिरली असे शासनाच्या माध्यमातून होत आहे. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

युतीच्या शासनाने कापसाला 2100 रुपये भाव दिला. कापसाला 2100 रुपये भाव देणारे आम्ही आहोत. सभापती महोदय, मी केवळ महत्वाचे दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. शेतक-यांच्या आत्महत्येमुळे अडचणीत आलेल्या राज्य सरकारने या आत्महत्या रोखण्यासाठी 2009च्या हिवाळी अधिवेशनामध्ये महत्वाकांक्षी पाऊल उचलले आणि 1 हजार 75 कोटी रुपयांचे पॅकेज तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी जाहीर केले आणि त्यास त्यांनी स्व. वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन असे नाव दिले. सभापती महोदय, मिशन या शब्दाचा अर्थ कळला असता तर सरकार असे वागले नसते. जेव्हा मिशन हा शब्द वापरला जातो त्यावेळी मिशनचे एक टारगेट असते. ते टारगेट जो पर्यन्त प्राप्त केले जात नाही तोपर्यन्त मिशन तसेच सुरु राहाते. विदर्भातील लोक सुखावले पाहिजेत म्हणून आपण वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन असे नाव दिले. 1075 कोटीचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेज मधून पाणलोट क्षेत्र विकास, राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रम, शेतीपूरक व्यवसाय या तीन गोष्टी नाबार्ड आणि केन्द्राच्या माध्यमातून राबविण्यास सुरुवात केली. यासाठी जेवढे पैसे आले त्यातील ब-यापैकी खर्च झाले. अजून 59 कोटी रुपये खर्च व्हायचे आहेत. या मिशनचे कार्यालय अमरावतीला आहे. या मिशनचा कार्यकाल 31 डिसेंबर 2009ला संपुष्टात येत आहे. मला माननीय मंत्री महोदयांना हे विचारावयाचे आहे की, हे वसंतराव नाईक स्वावलंबन मिशन आपण 31 डिसेंबर 2009ला संपुष्टात आणणार आहात काय ? शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी हे मिशन आले. सभापती महोदय, विदर्भातील धान उत्पादक शेतकरी आणि कोकणातील भात उत्पादक शेतकरी एकाच तराजूत आहेत. विदर्भात तेच पिकते आणि कोकणातही तेच पिकते. आपण धानाला भाव देण्याच्या संदर्भात या ठिकाणी प्रस्ताव मांडता, केन्द्राकडे तो पाठवता आणि केन्द्र सरकार भाव कमी करुन तो प्रस्ताव परत पाठवते. मग केन्द्र सरकार भाव कमी करुन जो प्रस्ताव पाठवते त्यामधील फरक राज्य सरकारने उचलावा आणि राज्य सरकारने दिलेला भाव जाहीर करावा.

सभापती महोदय, मी पीक विमा योजनेच्या संदर्भात आणखी एक मुद्दा मांडू इच्छितो. राज्य शासनाने पीक विमा योजना काढली. या पीक विमा योजनेचे काय झाले ? माझे माननीय मंत्री महोदयांना असे प्रश्न आहेत की, या पीक विमा योजनेंतर्गत राज्य सरकारचा किती हिस्सा आहे ? राज्य सरकारने आपला हिस्सा भरला आहे काय ? माझी अशी माहिती आहे की, राज्य शासनाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

पीक विमा योजनेंतर्गत 250 ते 300 कोटीचा हप्ता विमा कंपन्यांना दिला नाही म्हणून शेतक-यांना विमा मिळाला नाही, त्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही. ही माझी माहिती खरी आहे काय ? या माझ्या प्रश्नांचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, कापूस एकाधिकार योजनेचा कायदा केला. तो कायदा संपुष्टात आला. आज कोणकोणत्या कापूस खरेदी केन्द्रावर किती कापूस खरेदी केला जातोय ? धारणीच्या केन्द्रावर किती कापूस खरेदी केला जातोय ? किती शेतक-यांनी किती क्विंटल आणि कोणत्या प्रतीचा कापूस केन्द्रावर आणला ?याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. युतीचे सरकार असताना कापसाला अमूक एवढा भाव द्या म्हणून केवढा आराडा ओरडा करण्यात येत होता.

सभापती महोदय, आपले जसे आपत्कालीन व्यवस्थापन आहे तसे शेतीच्या बाबतीत दूरदृष्टी ठेवून एक आपत्कालीन व्यवस्थापन निर्माण केले पाहिजे. अवकाळी पाऊस, दुष्काळ, पूर याबाबतीत आपल्याला दूरदृष्टीचा अभाव आहे, नियोजनाचा अभाव आहे. आपत्कालीन व्यवस्थापन हे दूरदृष्टी ठेवून केले पाहिजे. या ठिकाणी भाव देण्याच्या गोष्टी केल्या जातात. आपण धानाला भाव द्याल, पण धान विकायला शिल्लक नाही, आपण सोयाबीनला भाव द्याल पण सोयाबीन विकायला शिल्लक नाही. महाराष्ट्रात एकपिकी जमीन आहे. शेतक-यांच्या अशा जमिनीबद्दल आपण कोणते धोरण अवलंबिणार आहात ? एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. पी.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणलेला आहे त्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ मी बोलणार आहे.

महोदय, प्रस्तावाच्या सुरुवातीलाच "विदर्भ महाराष्ट्र राज्यात सामील झाल्यानंतर विदर्भाच्या विकासाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे" असे आहे. शेवटी "उपरोक्त सर्व परिस्थितीमुळे विदर्भवासियांमध्ये सापत्नभावाची निर्माण झालेली भावना" असे म्हटले आहे. आपण आज राज्याच्या उप राजधानीत असलेल्या इमारतीत बसलेलो आहोत आणि ही इमारत ही आमची राजधानी होती, आमच्या राजधानीची विधानसभा होती. विदर्भाच्या अनुषंगाने असलेल्या संपूर्ण विषयांची वाच्यता वेळेअभावी करता येत नाही परंतु जे महत्वाचे विषय आहेत त्यासंदर्भात सरकारला एक प्रकारे दिशा देत आहेत. पुढील वर्षात नागपूर येथील अधिवेशनातील सर्व मुद्दे जर सरकारने मान्य केले नाही, विदर्भाचा अनुशेष दूर केला नाही तर पुढील वर्षात हिवाळी अधिवेशनाच्या वेळेस पश्चिम महाराष्ट्रातून कॉंग्रेसचे जेवढे आमदार निवडून आले त्यांना राजीनामे द्यावे लागतील तसेच पूर्व विदर्भातील आमदारांनाही राजीनामे द्यावे लागतील आणि स्वतंत्र विदर्भाची मागणी आवेशाने करावी लागेल. अशा प्रकारे आपल्या हातातून हिसकावून घेतल्याशिवाय आम्हाला ते मिळणार नाही. मघाशी बोलत असताना सनमाननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब म्हणले ते खरे आहे. लोकांपर्यंत राजीनामे दिल्याशिवाय काहीच द्यावयाचे नाही. परंतु विदर्भावर अन्याय होत असेल आणि तो दूर होत नसेल तर तेही करणे योग्य होईल. म्हणून विदर्भाच्या विकासाबाबतचा विषय नेमका कोठून सुरु करावा आणि कुठे समाप्त करावा हेच मला समजत नाही. विदर्भात आज

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पाण्याचा प्रश्न फार बिकट आहे. त्यासंबंधीचे नियोजन सरकार करु शकत नाही. विदर्भात प्रामुख्याने जे पुजारीटोला, कानसरी आणि इटियाडोह हे प्रकल्प जेव्हापासून तयार झाले त्या वेळेपासून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नाही. पाण्याला आपण नैसर्गिक संपत्ती म्हणतो परंतु ते पाणी वाया जाते आणि शेतकऱ्यांना मिळत नाही अशा प्रकारे या वाया जाणाऱ्या पाण्याकडे शासनाचे लक्ष नाही एका बाजूला पाटचाऱ्यांची दुरुस्ती झाली नाही त्यामुळेही पाणी वाया जाते याचाही विचार होणे आवश्यक आहे. यासंदर्भात मी एक तारांकित प्रश्नही विचारला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

होता तरी देखील शासनाने कोणतीच उपाययोजना केली नाही. अशा प्रकारे वाया जाणारे पाणी मातीत जात असेल आणि शेतकऱ्यांना मिळत नसेल तर त्याला जबाबदार जे अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. कारण हे अधिकारी कामच करीत नाहीत. आज विदर्भात सर्वत्र अकाल आणि दुष्काळ आहे. यावर्षी तर रब्बीचे पीक सुध्दा नाही त्यामुळे ही दुरुस्तीची कामे ताबडतोब होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सिंचनात वाढ करण्याची गरज आहे याचाही शासनाने विचार करावा. जे प्रोजेक्ट विदर्भात आणलेले आहेत ते अद्यापही पूर्ण न झाले नाहीत म्हणून लाभक्षेत्रातील जेवढी जमीन आहे तेवढ्या जमिनीला खरीप पिकासाठी सुध्दा पाणी देता येत नाही, ही खरी शोकांतिका आहे. तसेच लाभार्थ्यांना शेतीसाठी पाणी घ्यावयाचे असेल तर 1/3 शेतकऱ्यांनाच ते मिळते. रोटेशनने घेण्याचा विचार केला तर चार-चार वर्षे वाट पहावी लागते. त्याचप्रमाणे वन जमिनीमुळे अनेक सिंचन प्रकल्प अडलेले आहेत त्यातून मार्ग काढावा व हे प्रकल्प पूर्ण करावेत अशी माझी मागणी आहे. आमगांव तालुक्यातील टिगांवसारखा जो प्रकल्प आहे तो सुध्दा वन जमिनीमुळे अडलेला आहे तो तात्काळ मार्ग काढून पूर्ण करणे आवश्यक आहे. कारण सिंचनाची सोय झाली तरच शेतकरी सबळ होऊ शकतो म्हणून वन जमिनीचे किंवा वन कायद्यामुळे जे प्रकल्प रखडलेले आहेत ते दूर करुन सिंचनाचे प्रकल्प लवकर मार्गी लावावेत. शासनाने शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली परंतु गोंदिया जिल्ह्यातील पिंपळगांव-कोहळी येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचा गट सचिव श्री. एम.एस.भैसारे याने भ्रष्टाचार केला. त्याने शेतकऱ्यांच्या नावाने कर्ज काढले परंतु प्रत्यक्षात ती रक्कम शेतकऱ्यांना दिलीच नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. अशोक मानकर...

आपल्या नातेवाईकांचे सर्व कर्ज माफ करुन केवळ आपल्याच नातेवाईकांना कर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ख-या शेतक-याला या पॅकेजचा कोणताही लाभ झालेला नाही. त्यामुळे जे खरे शेतकरी आहे, ज्या शेतक-यांनी कर्ज घेतले आहे त्यांचे कर्ज माफ झाले पाहिजे. या पॅकेजमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. ज्यांचे नावे शेतजमीन नाही त्यांना सुध्दा कर्जमाफीला लाभ मिळवून दिल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ज्या शेतक-यांनी इतर बँकेतून कर्ज घेतले त्यांनाही या सहकारी संस्थेतून कर्ज देण्यात आले, अशा प्रकारची अफरातफर कर्ज माफी मध्ये अनेक ठिकाणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अर्जुनी मोरगाव येथील पंचायत समिती मध्ये झिंक फॉस्पेटच्या 400 गोण्या आल्या होत्या. या झिंक फॉस्पेटचा वेळेत उपयोग होऊ न शकल्यामुळे या झिंक फॉस्टेच्या गोण्या सिमेंटच्या दगडासारख्या झालेल्या आहेत. शेतक-यांनी या झिंकच्या बॅगा घेतल्या नाही तर त्यांना कोणत्याही प्रकारचे खत किंवा इतर औजारे मिळत नाही. झिंक फॉस्पेटच्या बॅगा घेतल्या नाही तर युरीया, ब्रिकेट, गटूर पंप किंवा कान्मेट डिझेल पंप मिळणार नाही, अशी आडमुठी भूमिका तालुका कृषी अधिका-यांनी घेतल्यामुळे शेतक-यांची पंचाईत झालेली आहे. ब्रिकेटमधील खताच्या काही पिशव्यांवर कृषी उद्योग व एमआयडीसीचा मार्किंग आहे परंतु काही पिशव्यांवर ते कोणत्या कंपनीचे उत्पादन आहे याचे कुठलेही मार्किंग किंवा त्यावर किंमत लिहिलेली नाही. युरिया ब्रिकेट म्हणून विकली जाणारी थैली प्रती 400 रुपये भावाने विकली जात आहे. दुस-या बाजूला हेच अधिकारी बिना मार्कची कृषी उत्पादनाची थैली खरेदी करण्यास शेतक-यांना बाध्य करतात. दोन वर्षापासून विदर्भात खतांचा तुटवडा आहे. खतांचा तुटवडा दूर करण्याचे काम शासनाने केले तर शेतक-यांना दिलासा मिळू शकेल. खतांमध्ये आज मोठया प्रमाणात काळाबाजार होत आहे. त्यामुळे खतांमधील काळा बाजार थांबण्यासाठी शासनाने कठोर पाऊल उचलण्याची गरज आहे. खरे म्हणजे खतांचा पुरवठा न झाल्यामुळे शेतकरी बळी ठरु शकतो.

सभापती महोदय, शेतक-यांची आर्थिक परिस्थिती फार खालावली आहे. अवयव विकून कर्ज फेडण्याची शेतक-यांची तयारी झालेली आहे. अमरावती जिल्हयातील नांदगाव खंडेश्वर येथील शेतकरी सुनील याने आपले अवयव विक्रीस काढले आहेत. जर शेतक-यांची अशी अवस्था होणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर...

असेल तर शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही काय ? 180 शेतक-यांनी आत्महत्या केल्या असून त्यामध्ये 144 शेतक-यांचीच चौकशी करण्यात आली व त्यामध्ये केवळ 12 शेतकरी पात्रठरले आणि 34 शेतक-यांना अपात्र ठरविण्यात आले.

सभापती महोदय, पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला यवतमाळ,बुलढाणा वाशिम आणि वर्धा या सहा जिल्हयांना पंतप्रधानांचे पॅकेज देण्यात आले असतांना सुध्दा 1 जानेवारी ते 20 नोव्हेंबर पर्यंत 790 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामध्ये 230 आत्महत्या केलेल्या शेतक-यांची चौकशी करण्यात आली आणि त्यामध्ये केवळ 144 शेतकरी पात्र ठरले तर 416 शेतकरी अपात्र ठरले. त्यामुळे शेतक-यांचा हा प्रश्न आपण सोडवला पाहिजे, अशी मी शासनाकडे मागणी करतो.

सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे विदर्भातील शेतक-यांच्या धानाचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्या धानाचे सँपल सुध्दा मी या ठिकाणी चर्चेच्या वेळी आणले होते. यासंदर्भात आम्ही काही सदस्य सहा तास उपोषणाला सुध्दा बसलो होतो. त्यावेळी मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते की, सोमवारी माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक लावून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु अजून सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात काही सुध्दा कार्यवाही झालेली नाही त्यामुळे हे शासन विदर्भातील शेंतक-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात किती जागरुक आहे हे दिसून येते.

सभापती महोदय, आमगाव येथे शेतक-यांचे धान कमी भावात खरेदी करण्यात आलेले आहे. त्यामुळे माझी मागणी आहे की, ज्या शेतक-यांचे धान 600 रु. भावात खरेदी करण्यात आले त्यांना शासन अजून 350 रुपये प्रती क्विंटल देणार आहे काय ? तसेच शेतक-यांचे जे धान काळे पडलेले आहे ते धान शासन हमी भावाने खरेदी करणार आहे काय ? जर शेतक-यांचे काळे धान शासनाने हमी भावाने घेतले नाही तर विदर्भातील शेतकरी आत्महत्या केल्याशिवाय राहणार नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी विदर्भाच्या संदर्भात प्रस्ताव दिलेला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी अधिक वेळ देण्याची आवश्यकता आहे. तसेच या प्रस्तावामध्ये आम्ही ज्या मागण्या मांडलेल्या आहेत त्या मागण्या पुढच्या अधिवेशनापर्यंत पूर्ण कराव्यात, अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री. गायकवाड.....

अशोधित प्रत / अशोधित प्रत

उपसभापती : या प्रस्तावासाठी 11.30 वाजेपर्यंत वेळ ठरविण्यात आला होता परंतु 11.45 पर्यंत मी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवत आहे.तोपर्यंत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर पूर्ण करावे.

श्री.बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सान्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यासंबंधीचे उत्तर देण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतक-याची परिस्थिती सुधारण्या करता करावयाची उपाययोजना यासंबंधी या ठिकाणी काल आणि आज सभागृहामध्ये होत आहे.विदर्भातील शेतक-यांची व्यथा असून ती मांडण्याचे काम सर्व पक्षातील सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे विदर्भातील शेतकरी अडचणीमध्ये आहे आत्महत्याचे प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहे ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात सुधारणा करण्यासाठी शासनाचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी या चर्चेत भाग घेत असतांना असे सांगितले की या ठिकाणी सिंचनाचा अनुशेष आहे तो दूर करणे हे अत्यंत महत्वाचे काम आहे एक गोष्ट मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो की, अनुशेष दूर करण्यासबंधीचा अहवाल लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर व श्री विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतांना त्यावेळच्या मंत्रिमंडळामध्ये हा अहवाल स्वीकारण्यात आला होता आणि माननीय राज्यपालांना अनुशेष दूर करण्यासंबंधीचे अधिकार त्यावेळच्या मंत्रिमंडळाने दिले होते ही बाब मला प्रथम या निमित्ताने सांगावयाची आहे.. त्यानंतर या विषयावर या सभागृहामध्ये सातत्याने चर्चा होत गेली . हा अनुशेष दूर करण्याच्या कामामध्ये या सभागृहाचे योगदान मोठे आहे . अनुशेष दूर करण्याचे काम मोठया प्रमाणावर सुरु झालेले आहे हे मी काल सुध्दा येथे सागितले होते. त्या सबंधीचा विषय या सभागृहामध्ये सातत्याने मांडण्यात आला होता हे मी पुन्हा एकदा नमूद करु इच्छितो. अनेक वर्षे या अहवालाच्या संदर्भात चर्चा होत असतांना 1999 नंतर अनुशेष् दूर करण्याचे काम सुरु झालेले आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

सभापती महोदय, विदर्भातील शेतकरी अडचणीत आहेत त्याची अनेक कारणे आहेत. अमरावती विभागाची जेव्हा चर्चा होत असते त्यावेळी असे सांगण्यात येते की, या भागात तीन चार टक्केसुध्दा सिंचन होत नाही . देशामध्ये सरासरी 40 टक्के सिंचन होत असतांना, राज्यामध्ये 16 टक्के सिंचनाची सरासरी असतांना जर अमरावती भागात 4 टक्के सिंचन होत असेल तर तेथे अशी परिस्थिती निर्माण होईल. अमरावती विभागातील धरणाच्या कामाला गती देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री मानकर यांनी सागितले की, शासनाला पाण्याची व्यवस्था करावीच लागेल. त्या ठिकाणी धरणे जरी झालेली असली तरी त्या ठिकाणी धरणातील पाणी पोहोचू शकणार नाही असे मोठे क्षेत्र राहणार आहे तेव्हा त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था कशी करण्यात येणार आहे.हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे . कापूस आणि सोयाबीन हे या विभागातील महत्वाचे पीक असून पूर्व विदर्भात भाताचे पीक महत्वाचे आहे त्या ठिकाणची अर्थव्यवस्था एक पीकावर अवलंबून आहे. पश्चिम विदर्भात जरी संत्राच्या बागा असल्या तरी त्या ठिकाणी पाण्याचा प्रश्न फार महत्वाचा झालेला आहे.त्या ठिकाणी एक हजार फूट खोल बोअर घेल्स घ्याव्या लागत आहेत.हे सर्व क्षेत्र वाचवावयाचे असेल तर जलसंधारणाची व्यवस्था करावी लागणार आहे. कापूस आणि सोयाबीन या दोन पिकांचे नुकसान होण्याचे कारण असे आहे की, दोन पावसामध्ये अंतर पडत असल्यामुळे शेतकरी या पिकांना पाणी देऊ शकत नाही त्यामुळे या पिकांची उत्पादकता घटते एकरी दोन किंवा तीन क्विंटल कापूस येत असेल तर त्या कापसाला कितीही भाव दिला तरी तो शेतक-याला परवडणार नाही ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल .त्यामुळे या पिकांची उत्पादकता कशी वाढविता येईल हा महत्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी भावाच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित केला होता आधारभूत किंमत चागली असावी यासाठी काय प्रयत्न करण्यात आले होते हे मी नंतर सांगणार आहे परंतु पिकांची उत्पादकता हा भाग सर्वात महत्वाचा आहे. एका एकरामध्ये किती जास्त उत्पादकता घेतली, किती गुणवत्तेचाशेती माल तयार केला आहे यावरसुध्दा अनेक गोष्टी अवलंबून आहेत . गेल्या पाच वर्षामध्ये महाराष्ट्रात आणि विदर्भामध्ये सर्वात जास्त फिरण्याचा व तेथील प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न केला होता जलसंधारण विभागाच्या

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

माध्यमातून विदर्भ पाणलोट मिशन सुरु करण्यात आले होते सुरुवातीच्या काळात मजुराकडून काम करुन घेण्याचा नियम होता त्यात सुधारणा करण्यात आली असून मशिनच्या माध्यमातून स्वस्त दरात काम केले जात आहे त्यामुळे 70 टक्क्यामध्ये हे काम करण्यास सुरुवात केली गेली. मशिनरीव्दारे हे काम करण्यास सुरुवात केली असल्यामुळे हे काम वेगाने झाले तसेच आखीव रेखीव काम झाले आहे. राज्य शासानाचे जे फंडस असतील त्याच्या माध्यमातून मशिनव्दारे काम करण्यास सुरुवात करण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. पंडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख या ठिकाणी उपस्थित आहेत मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही मुद्दाम खारपाणपटटयात जाऊन पहावे. तेथील शेतकरी कौतुकाने असे संगत आहे की आमची बांधबंदीस्ती झालेली असल्याामुळे त्याचा फायदा आम्हाला मिळावयास लागला आहे....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ....

तेथील शेतकरी आता कौतुकाने सांगतो आहे की, आमची बांध-बंदिस्ती झाली आहे आणि त्याचा फायदा आम्हाला मिळू लागला आहे. पाणलोट मिशनचा फायदा आम्हाला मिळायला लागला आहे. खरे तर हे काम खूप वेगाने नेले पाहिजे,त्यासाठी खूप मोठा फंड मिळाला पाहिजे हे मी मान्य करतो. परंतु एका चांगल्या कामाला आम्ही सुरूवात केली हे आपल्यालाही मान्य करावे लागेल. 3 लाख शेततळ्यांचा कार्यक्रम राष्ट्रीय कृषी विकास योजनेत आपण घेतला. याचा उद्देशही असा आहे की, शेततळे केले आणि त्याचे पाणी शेतात आले तर तो शेतकरी जेव्हा पाण्याचा ताण येईल त्यावेळेस एक पाणी दिले तरी त्याचे कपाशीचे पीक असेल वा सोयाबीन असेल ते जगेल आणि त्याची उत्पादकता वाढून जाईल. सभापती महोदय, मुद्दाम म्हणून मी आपल्याला सांगेन की, विदर्भात गेल्या दोन तीन वर्षात आम्ही 40 हजार शेततळी पूर्ण केली आहेत. त्यासाठी तीन लाख शेतकऱ्यांचे लक्ष्य आमचे आहे. आपणही मुद्दाम गावोगावी फिरत असताना तेथील शेतकऱ्याला त्या शेततळ्याचा फायदा झाला आहे की नाही हे पहा. तो शेतकरीही आपल्याला निश्चितपणे सांगेल की, मला या शेततळ्याचा फायदा झाला आहे. त्याच्याच जोडीला आम्ही इंजिन्स देखील शेतकऱ्यांना वाटली. एक इंजिन घेऊन तो शेतकरी अनेक शेततळ्यांवर जाऊन आपल्या शेताला पाणी देऊ शकतो. त्याला त्याद्वारे मदत होईल. म्हणूनच आम्ही इंजिन देण्याचा कार्यक्रम घेतला. पिरणामी तेथील उत्पादकता आता बदलली आहे. तेव्हा ही जी सगळी कामे आहेत, मला असे वाटते की, त्यात काही त्रुटी राहिल्या असतील, नाही असे नाही, त्या आपण जरूर आम्हाला दाखविल्या पाहिजेत परंतु आम्ही जे काम केले आहे ते लक्षात घेऊन आम्ही काम केल्याचे मान्य केले पाहिजे. शेवटी आम्ही काम करीत असताना मंत्री म्हणून वा सरकार म्हणून पुन्हा आम्हाला त्या शेतकऱ्याकडे जावेच लागते, मते मागावी लागत असतात. कोठलेही सरकार आणि त्यातील मंत्री हे जनतेचे शत्रू असतात असे मानण्याचे कारण नाही. शेवटी तो मंत्रीही त्याला जबाबदार असतो. खरे म्हणजे एवढी कामे केल्यानंतर कुणीच काही त्याबद्दल सांगत नाही याबद्दलही कोठे तरी खंत वाटत राहते. काम केल्यानंतर त्यातील त्रुटी आपण जरूर दाखविल्या पाहिजेत. पण त्या बरोबरच आपण हेही सांगितले पाहिजे की, आपण हे हे काम केले आहे त्यातील हे काम चांगले झाले आहे. आणखी चांगले काम करा. असेही कोणी तरी म्हणावे अशी काम करणाऱ्याची देखील अपेक्षा असते हे मी आपल्याला मुद्दामहून येथे सांगू इच्छितो.

.... आर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. थोरात ....

सभापती महोदय, गतिमान पाणलोट मिशनमधून प्रत्येक तालुक्यात कामे चालू असल्याचे आपल्याला दिसून येईल. आता आपण 'वसुंधरा' नावाची एक संस्था स्थापन केली आहे. केंद्र सरकारची एक अतिशय सुंदर अशी योजना आहे. मेगा पाणलोट योजना देखील आपण घेतो आहेत. शेवटी धरणे आणि त्याचे हे एक मर्यादित क्षेत्र होईल. परंतु व्यापक काम करायचे असेल तर त्यात पाणलोट मिशनशिवाय आपल्याला पर्याय नाही. म्हणून विदर्भामध्ये याला जादा गती देण्याचे काम आम्ही केले आहे हे मुद्दाम मला येथे सांगितले पाहिजे. सभापती महोदय, उत्पादकता वाढीसाठी जे निरनिराळे कार्यक्रम घेतले गेले त्यात ग्राम बीजोत्पादनाचा कार्यक्रम आपण हाती घेतला. बियाणे चांगले असले पाहिजे म्हणून कार्यक्रम घेतला. कर्जाचे व्याजाचे दर कमी करण्याचा कार्यक्रम केंद्र आणि राज्य सरकारने घेतला त्याचाही फायदा आपल्याला मिळतो आहे. या सगळ्या गोष्टी करण्याचा सरकारने प्रयत्न केला आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी आधारभू किंमतीबद्दल सांगितले. हे खरे आहे की, शेतकऱ्यांनी हे सारे निर्माण केले पण त्याला जर किंमत नसेल तर तो तोट्यात जाईल ही वस्तुस्थिती मी नाकारत नाही. आपण ज्या काही शिफारशी केल्या त्या शिफारशीपेक्षा काही टक्क्यांनी कमी आपल्याला आधारभूत किंमत मिळते आहे हीही वस्तुस्थिती आहे. याबाबतीत मी सन्माननीय सोनिया गांधी यांचे आणि केंद्रीय कृषीमंत्री माननीय श्री.शरद पवार साहेबांचे आभार मानीन. कापसाला आधारभूत किंमत देण्याच्या बाबतीत 2700 रूपये किंमत देण्याचा आमचा जाहीरनामा होता. पण त्यांनी ही आधारभूत किंमत तीन हजार रूपयांपर्यंत नेऊन ठेवली. यासाठी त्यांचे निश्चितपणे आभार मानले पाहिजेत. कापसासाठी त्यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच इतर बाबतीत देखील त्यांनी काही निर्णय घेतले आहेत. परंतु एक गोष्ट मी प्रकर्षाने सांगतो की, केंद्राकडे देखील आम्ही आता असा आग्रह धरला आहे की, महाराष्ट्रात कमी उत्पादकता खर्च असेल, येथील उत्पादकता कमी असेल आणि तुम्ही त्याची तुलना पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांबरोबर करणार असाल तर आम्ही कायमच अडचणीत राहणार आहे. म्हणून आधारभूत किंमत देत असताना महाराष्ट्राचा हा दुष्काळी भाग आहे, येथील जमीन हलकी आहे, येथील उत्पादकता कमी आहे, तेव्हा येथील पिकांसाठी आधारभूत किंमत देखील वेगळी, जास्त दिली पाहिजे. हा आग्रह आपण मुद्दामहून करतो आहोत हे मी या निमित्ताने आपल्याला सांगेन.

.... आर 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. थोरात ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी पीक विम्याच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. कदाचित विमा योजना कशी आहे हे थोडेसे समजून घेण्याचा भाग आहे. विमा योजना म्हणजे कोणती विमा कंपनी त्यातून मदत देते, भरपाई देते अशातील भाग नाही. विमा योजनेतील जो प्रिमियम आहे त्यात देखील सरकारचा वाटा आहे. जेणे करून शेतकऱ्यावर प्रिमियमचा बोजा कमी करता येऊ शकेल. या शिवाय जो काही प्रिमियम मधील वाटा आपल्याला द्यायचा आहे त्यात 50 टक्के केंद्र शासन आणि 50 टक्के राज्य शासन रक्कम भरते. विमा कंपनी ही केवळ यात एजन्सी आहे हे मी या निमित्ताने सांगेन. तेव्हा एकंदरीत आपण पाहिले तर 1999-2000 या वर्षी ही योजना सुरू झाल्यानंतर आपण एकंदर 480 कोटी रूपये भरले आणि त्यातून आपल्याला 1500 कोटी रूपये पुन्हा मिळाले आहेत. असे प्रत्येक वर्षी त्यातून आपल्याला फायदा मिळालेला आहे हे आपल्याला दिसून येईल. थोडक्यात याबाबतीत देखील राज्याने आपला वाटा उचलला आहे हेही मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मिशनची चर्चा येथे करण्यात आली. पंतप्रधान पॅकेज असेल किंवा मुख्यमंत्र्यांचे पॅकेज असेल पण एकंदर 5 हजार कोटी रूपयांचा खर्च आपल्याला यात झाला. ...

(यानंतर श्री. सरफरे ....एस 1 ...

अशुद्धीत प्रत / प्रशिक्षणासाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

त्याची चर्चा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केली. आपण वसंतराव नाईक साहेबांच्या नावाने स्वावलंबी मिशन सुरु केले. जोपर्यंत परिस्थिती बदलत नाही तोपर्यंत हे मिशन आपल्याला अखंडीतपणे चालवावे लागेल. या मिशनच्या माध्यमातून, पंतप्रधान पॅकेजमधून आणि मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजमधून 5 हजार कोटी रुपयांचा जो खर्च झाला त्या संदर्भात त्यांनी चर्चा केली. ती करीत असतांना त्यांनी काही तक्रारीही केल्या आहेत. या दोन्ही पॅकेजमधील बऱ्याचशा बाबी अशा आहेत की, त्या शेतकऱ्यांना चेकने पोहोचविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये भांडवल ठेव निधी असेल, दिलासा रक्कम असेल, पुनर्गठीत कर्जावरील व्याज असेल, शेती पूरक व्यवसायाकरिता असेल, सामुदायिक विवाहाचे चेक असतील, पीक विमा योजनेचे चेक असतील, पाणलोट मिशनचे चेक असतील हे सर्व पेमेंट आपण चेकने केले आहे. एक गोष्ट स्पष्ट आहे की, 60 हजार कुटुंबांना 25 हजार रुपयेप्रमाणे मदत करण्याबाबत आपले धोरण होते. त्यानुसार आपण निरनिराळया गोष्टींचे वाटप केले. त्यामध्ये जवळ जवळ दीड लाख निरनिराळया वस्तूंचे वाटप केले. त्याबाबतीत काही ठिकाणाहून तक्रारी आल्या आहेत. त्यामध्ये बैलगाडीच्या सुध्दा तक्रारी आल्या आहेत. एवढया मोठया संख्येने वाटप होत असतांना त्यामध्ये तक्रारी येणार. त्या तक्रारी आल्यानंतर सुध्दा आपण कारवाई केली आहे.

सभापती महोदय, सेंद्रीय शेतीमध्ये सुध्दा आपल्याला काही गोष्टी सापडल्या आहेत. त्याठिकाणी अधिकाऱ्यांचे निलंबन सुध्दा करण्यात आले आहे. एके ठिकाणी तर काही अधिकाऱ्यांना काही महिने जेलमध्ये ठेवण्याचे काम आपण केले आहे, हे माननीय विरोधी पक्षनेत्यांना माहीत आहे. त्यामुळे ज्याठिकाणी दोष आढळला आहे त्याठिकाणी कुणालाही पाठीशी घालण्याचा आपण प्रयत्न केलेला नाही, हे मी यानिमित्ताने आपणास सांगतो. त्याचबरोबर खतांच्या टंचाईसंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला. मागील वर्षी राज्य शासनाने 400 कोटींचे कर्ज आपल्याला उपलब्ध करुन दिले. त्याचे आपण निरनिराळया पध्दतीने बफर स्टॉकींग केले. याकरिता मागील वर्षी ज्याप्रमाणे नियोजन केले आहे, त्याप्रमाणे पुढील वर्षी सुध्दा नियोजन केले जाईल याची मी ग्वाही आपणास देतो. माननीय सदस्य श्री. मानकर यांनी मार्कींग नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्याबाबत माननीय सदस्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली तर त्याची चौकशी करुन जे कुणी दोषी असतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

त्यांना शिक्षा केली जाईल याची ग्वाही मी आपणास देतो. सभापती महोदय, हा खूप मोठा व व्यापक विषय असल्यामुळे तो मला याठिकाणी अतिशय कमी वेळेत मांडावा लागत आहे. परंतु याबाबतीत शासनाचे प्रयत्न प्रामाणिक आहेत एवढीच आपणास ग्वाही देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विदर्भातील अनेक भागांच्या संदर्भात किंवा अनुशेषाच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला. त्यावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. खरे म्हणजे ही वस्तुस्थिती आहे की, आपल्या विदर्भातील समस्या सभागृहामध्ये मांडतांना काही गोष्टी आपण आपल्यासमोर ठेवल्या आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे गेल्या अनेक वर्षापासून विदर्भातील सिंचन, रस्ते व इतर बाबींमधील अनुशेषाच्या संदर्भात आणि विदर्भातील मागासलेपण दूर करण्याच्या संदर्भात अत्यंत प्रभावीपणे आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत.

सभापती महोदय, या विषयावर बोलण्यासाठी भरपूर वेळेची आवश्यकता असतांना मला वेळेचे बंधन पाळावे लागणार आहे. अशाप्रकारे विदर्भातील सिंचनापासून अनेक बाबींचा मागासलेपणा दूर करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य बोलले असल्यामुळे ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. सभापती महोदय, या सरकारने विदर्भासाठी काही केले नाही या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत नाही. सन्माननीय कृषी मंत्र्यांनी आता सांगितल्याप्रमाणे राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय आघाडी सरकारने घेतला आहे. त्याप्रमाणे् या भागासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. गेल्या दहा वर्षामध्ये या भागाच्या विकासासाठी आतापर्यंत कधीही निधी मिळाला नव्हता तो देण्याचे काम या सरकारने केले आहे. सन 1997-98 पासून या राज्याला मिळालेल्या एकूण निधीपैकी 41 हजार 473 कोटी रुपये सिंचनावर खर्च केले आहेत. त्यामधील 13 हजार 74 कोटी रुपये विदर्भामध्ये खर्च केले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर म्हणाले की, आपण या विदर्भाचा भौतिक अनुशेष दूर करु शकलो नाही. तरीसुध्दा मोठया प्रमाणात प्रकल्पांची कामे हाती घेण्यात येत आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या व्यवस्था अपुऱ्या राहिलेल्या आहेत, ते प्रकल्प पूर्ण होऊन शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी जाण्यची व्यवस्था करण्यामध्ये शासन कमी पडणार नाही एवढा मी आपल्याला विश्वास देतो आणि त्याची प्रचिती आपल्याला सर्वांना येणाऱ्या बजेटमध्ये दिसून येईल. जे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची आवश्यक आहे. तसेच भौतिक क्षमता किंवा ज्या प्रकल्पांची जी सिंचन क्षमता आहे, ती पूर्ण करण्यासाठी सरकार पॉझिटीव्ह आहे असे मी याठिकाणी सर्वांना आस्वस्थ करु इच्छितो. विदर्भाच्या संदर्भात आपल्या सर्वांची जी भावना आहे, तशीच माझी सुध्दा आहे. मी विदर्भातील मंत्री आहे आणि या भागातील सर्व प्रश्नांची मला जाणीव आहे. येथील लोकांच्या अगदी आदिवासीं पासून शेतकऱ्यांच्या व्यथांची मला जाणीव आहे. म्हणून मी आपल्या सर्वांना निश्चितपणे सांगतो. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी आर्थिक आणि भौतिक बाबत विषय मांडला आहे. आपण जर भौतिक अनुशेष काढला जर त्यासाठी 9000 कोटी रुपये खर्च करावे लागतील. 1994 मधील दर आम्ही दिला. मला काही गोष्टींच्या बाबतीत वस्तुस्थितीची निश्चितपणे जाणीव आहे. पण शासनाकडे साधनसामुग्रीची असलेली उपलब्धता आणि जे रिर्सोसेस तिजोरीमध्ये जमा होतात. पण आम्ही आज माननीय राज्यपालांनी निधीच्या वाटपासाठी जे सूत्र ठरवून दिलेले आहे,जे निदेश दिलेले आहेत,त्या निदेशाच्या पलिकडे जाऊन काही करता येत नाही.परंतु सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी सहमत होत असताना, मी आपल्याला सांगू इच्छितो की,या सगळया बाबी शासन माननीय राज्यपालांसमोर निश्चितपणे मांडेल किंवा या बाबी माननीय राज्यपालांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य शासनाचा विचार राहील. कारण आपण एवढया कोटी रुपयांचा खर्च करुनही त्यातून काही निष्पन्न होत नसेल तर त्याबाबतीत निश्चितपणे उपाययोजना केली पाहिजे या मताचा मी आहे. येथील सर्व प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी अनेक प्रकल्पांच्या बाबतीत माहिती दिली. वर्धा प्रकल्पाच्या बाबतीत सांगितले. याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, या प्रकल्पाची किंमत 1376 कोटी रुपये आहे. आतापर्यंत या शासनाने या प्रकल्पावर 938 कोटी रुपयांचा खर्च केला आहे. परंतु उर्वरित निधीची उपलब्धता झाल्याशिवाय हा प्रकल्प पूर्ण होणार नाही याची आम्हाला जाणीव आहे. आपण हा प्रकल्प पूर्ण होण्याच्या बाबतीत फार कालावधी लागेल असे समजू नये. या प्रकल्पाला आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याची शासनाची तयारी आहे. तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कोथरा प्रकल्पाविषयी उल्लेख

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केला. या भागामध्ये अनेक प्रकल्प आहे आणि ज्या प्रत्येक प्रकल्पाबाबत मला माहिती देता येईल. पण माझ्यावर वेळेचे बंधन आहे. तसेच दुसराही नियम 260 अन्वये प्रस्ताव आहे, त्यावेळेस आपल्याला चर्चा करता येईल. आजच तो विषय ठेवण्यात आला आहे. म्हणून मी एवढेच सांगेन की, विदर्भातील अनुशेष दूर होण्यासाठी, भौतिक अनुशेष दूर करण्यासाठी ज्या-ज्या प्रकल्पांची आवश्यक आहे, त्यासाठी शासन निधीची कमतरता निर्माण होऊ देणार नाही एवढा विश्वास मी याठिकाणी देतो. तसेच या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी विदर्भातील कृषी पंपांच्या प्रश्नाबाबत नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. विदर्भातील अनुशेषाच्या बाबतीत आजची स्थिती सांगावयाची तर आजचा शिल्लक अनुशेष हा 58,796 पंपांचा आहे. याबाबतीत आपल्या सर्वांना मी विश्वास देऊ इच्छितो की, कृषी पंपाचा 58,796 पंपांचा बॅकलॉग हा मार्च अखेरपर्यंत शासन पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाही हे यानिमित्ताने सांगतो आणि त्यादृष्टीने सर्वांना आदेश दिलेले आहेत. कृषी पंपाच्या अनुशेषाच्या बाबतीत सांगावयाचे तर अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदिया या चार जिल्ह्यांना कृषी पंपांच्या अनुशेषातून मुक्त करु शकलो आहोत आणि यवतमाळ, अकोला, वाशिम, चंद्रपूर व गडचिरोली या उर्वरित जिल्ह्यांमध्ये कृषी पंपाच्या बाबतीत जो बॅकलॉग आहे, तोही नजिकच्या काळामध्ये पूर्ण केला जाईल असा मी याठिकाणी सर्वांना विश्वास देतो. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. आकडेवारीमध्ये जाण्यापेक्षा या विषयाच्या बाबतीत सभागृहाच्या भावना अतिशय तीव्र स्वरुपाच्या आहेत. याबाबतीत शासन पुढील पाऊल टाकेल एवढा विश्वास देऊन मी माझे विचार संपवितो.

. . . .टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये सिंचनाच्या बाबतीत एका वाक्याचा उच्चार केलेला आहे आणि त्या वाक्याशी मी सहमत आहे. त्यांनी सांगितले की, माननीय राज्यपालांचे निदेश असल्यामुळे, याबाबतीत माननीय राज्यपालांना ही भावना कळविण्यात येईल. शासनाचे हे मनोगत आहे.मी सिंचनाच्या बाबतीत विना पैशाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. पण एका गोष्टीचे उत्तर मिळाले नाही की, महिन्या-दोन महिन्यांनी मुदत संपणार आहे. आपल्याला इतर अधिकार नाही, पण माननीय राज्यपालांना विनंती करण्याचा अधिकार आहे. हा विना पैशाचा प्रश्न आहे, हा इच्छेचा प्रश्न आहे आणि यासाठी पैसे द्यावे लागणार नाहीत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

तेव्हा केंद्र शासनाला विनती करणार काय? हा एक प्रश्न आणि माननीय राज्यपालांना कळविण्यात येईल असे आपण म्हटले आहे. माननीय राज्यपालांच्या डायरेक्शनच्या विरोधात काही गोष्टी करावयाच्या असतील तर ती गोष्ट वेगळी पण माननीय राज्यपालांच्या डायरेक्शनच्या बाजूने काही गोष्टी करावयाच्या असतील तर माननीय राज्यपालांना विचारण्याची गरज नाही. यावर मी वाद करणार नाही. माझे म्हणणे असे आहे की, भौतिक अनुशेष कॅलक्युलेट केला पाहिजे आणि दर वर्षाला त्याचे अपडेटिंग केले पाहिजे ही विनंती राज्य शासनाच्यावतीने माननीय राज्यपालांना करण्यात येइल काय? हा सुध्दा बिना पैशाचा प्रश्न आहे. माझा तिसरा प्रश्न थोडया पैशाचा आहे. भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्हयावर मालगुजारी तलावांचा अनुशेष धरुन दांडेकरांनी फार मोठा अन्याय केलेला आहे. अनुशेष आणि निर्देशांक समितीने ती गोष्ट मान्य केली आणि 117 कोटीचा अनुशेष काढून दिला. संबंधित मंत्री त्या जिल्हयातील असून सुध्दा कामाला सुरुवात होत नसेल तर ते योग्य नाही. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, 117 कोटी रुपयांचा अनुशेष काढला होता तो आता हजार कोटी रुपयाच्यावर गेलेला आहे. तो भरुन काढण्याची निदान सुरुवात करण्यात येईल काय? मी याबाबतीत आजच उत्तर द्यावे असे म्हणत नाही पण पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर होईल काय? आणि पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात याबाबतचे निवेदन सभागृहाला सादर करण्यात येईल काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, आदरणीय प्रा. बी. टी. देशमुख साहेबांना मी सांगू इच्छितो की, गोसीखुर्द या एका प्रकल्पामुळे 2 लाख 52 हजार हेक्टर इतके इरिगेशन होणार आहे. पुढच्या वर्षापासून प्रत्यक्षात सिंचनाला सुरुवात होणार आहे. सन 2015 पर्यंत 2 लाख 52 हजार हेक्टरवर पूर्ण बारमाही इरिगेशनची व्यवस्था होणार आहे.याला केंद्र सरकारने पैसे उपलब्ध करुन दिलेले आहेत. विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता आहे आणि ती शासन स्तरावर आहे. यासंबंधीची फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे प्रोसेसमध्ये आहे. यावर कॅबिनेटमध्ये चर्चा करण्यात येईल. यासंदर्भात सरकार सकारात्मक आहे एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो. सरकारची भूमिका विदर्भाच्या विकासाच्या संदर्भात अजिबात नकारात्मक नाही. या संदर्भात सरकारची भूमिका सकारात्मक आहे. एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

श्री. राजेंद्र दर्डा (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये आज या सभागृहामध्ये विदर्भाच्या विकासाबद्दल जी चर्चा घडवून आणली आहे या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, दिवाकर रावते, पाशा पटेल, जयंत प्र.पाटील, अरविंद सावंत, केशवराव मानकर या सगळयांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत त्याची शासन निश्चितपणे नोंद घेईल.

सभापती महोदय, मला सुरुवातीलाच सांगितले पाहिजे की,मी आज उद्योग मंत्री म्हणून महाराष्ट्रात काम करीत असलो आणि माझी कर्मभूमी जरी मराठवाडा असली तरी माझा जन्म विदर्भात झाला आहे. आणि याच विदर्भातून माझे वडील उद्योग मंत्री असताना या विदर्भामध्ये अनेक उद्योगधंदे आले आहेत याची मला निश्चितपणे आठवण होते.सभापती महोदय, मुंबई, पुणे आणि नाशिकच्या तुलनेमध्ये औद्योगिकदृष्टया विदर्भ मागे असताना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विदर्भात जे प्रयत्न केले आहेत त्याचा परिणाम म्हणून आज विदर्भात 323 मोठया उद्योगांमध्ये 18515 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे तर लघुउद्योगाच्या क्षेत्रामध्ये 14326 लघूउद्योगाच्या सुरु असून त्यामध्ये 4248 कोटी रुपयाची गुंतवणूक झालेली आहे आणि त्यातून रोजगार निर्माण झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने 1969 ते 2007 पर्यंत विविध सामुहिक प्रोत्साहन योजना राबविल्या. त्यामध्ये विदर्भात एकूण 8715 लघुउद्योगांना आणि 809 मध्यम आणि मोठया उद्योगांना 5931 कोटी रुपयाचे अनुदान आणि 6360 कोटी रुपयाच्या विक्रीकर सवलती दिलेल्या आहेत. यावरुन एक गोष्ट निश्चितपणे सिध्द होते की, महाराष्ट्र सरकार भक्कमपणे विदर्भातील उद्योगधंद्याच्या पाठीमागे आहे. सभापती महोदय, मला याठिकाणी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, सध्या मेघा प्रोजेक्ट्स महाराष्ट्रात मोठया प्रमाणात येत आहेत. 169 मेघा प्रोजेक्ट्स महाराष्ट्रात मंजूर झालेले आहेत. त्याची इफेक्टिव्ह स्टेप घेण्यात आलेली आहे आणि या 169 मेघा प्रोजेक्टस्मध्ये विदर्भातील 56 मेघा प्रस्ताव मंजूर झाले असून त्यासाठी 36149 हजार कोटी रुपयाची गुंतवणूक अपेक्षित आहे.या विदर्भात येत्या काही काळामध्ये आपल्याला दिसेल की, या 56 मेघा उद्योगाच्या माध्यमातून 23 स्टिलचे प्रकल्प, 12 टेक्स्टाईलचे प्रकल्प, 7 सिमेंटचे प्रकल्प हे पुढच्या वर्ष ते दीड वर्षात आपल्याला निश्चितपणे पहावयास मिळतील.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी या ठिकाणी काल खनिज संपत्तीचा उल्लेख केला. तसाच उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी साहेबांनी केला. ही गोष्ट खरी आहे की, विदर्भाची माती सुपीक आहे. या विदर्भामध्ये मिनरल्स आहेत त्याचप्रमाणे कोळसा आहे. त्यामुळे या ठिकाणी उद्योगधंद्यांना विशेष संधी आहे. त्यामुळे या विदर्भामध्ये सिमेंट फॅक्ट्रीज असू द्या, स्टिल फॅक्टरीज असू द्या, वीज प्रकल्प असू द्या हे मोठ्या प्रमाणात येत आहेत. या ठिकाणी संत्र्याच्या प्रकल्पाबद्दलचा उल्लेख करण्यात आलेला आहे. मला सांगितले पाहिजे की, संत्र्याचा जो प्रकल्प सिट्रस इंटरनॅशनल या स्वीस कंपनीचा आहे त्यांनी 30 जानेवारी, 2009 ला अशी एक इच्छा प्रदर्शित केली की, आम्ही महाराष्ट्रामध्ये एक उद्योगधंदा सुरु करु इच्छितो. आम्ही संत्रा आणि मोसंबीवर प्रक्रिया करणारा एक कारखाना या ठिकाणी आणू इच्छितो. त्यानंतर त्यांनी फेब्रुवारीमध्ये मेगा प्रकल्पासाठी अर्ज दाखल केला आणि त्यामध्ये एमआयडीसी अमरावती म्हणजे नांदगावपेठ, जालना आणि कृशनूर (नांदेड) या तिघांचा उल्लेख केला. त्यानंतर 15 फेब्रुवारी, 2009 रोजी पणन संचालक व कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. शेवटी त्यांनी 18 एप्रिल, 2009 ला कळविले की, आम्हाला नांदेड येथील ठिकाण या प्रकल्पासाठी योग्य आहे. शेवटी कारखाना कोठे टाकावयाचा हा त्यांचा प्रश्न आहे. आम्ही त्यांना एमआयडीसीतर्फे तीन जागा दाखविल्या. त्यामध्ये त्यांनी नांदेडला प्राधान्य दिले. आणि नांदेडला प्राधान्य देत असताना त्यांनी पत्रामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, " The reason for this selection was purely economic. Importantly, Nanded is located geographically in the middle....."

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला बोलण्यासाठी फक्त तीन मिनिटांचा वेळ राहिलेला आहे. आपण मला बोलू द्यावे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. यावेळची चर्चा ही सर्वसाधारण चर्चा नाही. फक्त विदर्भाच्या संदर्भात ही चर्चा आहे. माननीय मंत्रिमहोदय कसले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते ....

कोडकौतुक सांगत आहेत ? मेगा प्रोजेक्ट आलेला आहे, त्यांनी इच्छा प्रकट केली आहे आणि त्यांनी नांदेड हे ठिकाणी निवडलेले आहे असे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. आपण विदर्भात येऊन आपण विदर्भात प्रकल्प आणत नाहीत. आपण प्रकल्प नांदेडला नेत आहात असे सांगून या ठिकाणी मीठ चोळण्यासाठी बसलेला आहात काय ? विदर्भामध्ये कोणता प्रकल्प येत आहे त्याबाबत आपण सांगावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी हे एका प्रकल्पाबाबत सांगितले पण मी या ठिकाणी वारंवार सांगत आहे की, स्टिलच्या फॅक्टरीज असू द्या, सिमेंटच्या फॅक्टरीज असू द्या, त्यांची नावे सुध्दा मी देऊ शकतो. आपण या गोष्टीची निश्चितपणे दखल घेतली पाहिजे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : आम्ही विदर्भात तो कारखाना चालवू शकत नाही असे त्यांनी म्हटले आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : होय. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कारखाना कोठे टाकला पाहिजे हा कारखाना टाकणाऱ्याचा प्रश्न आहे. विदर्भामध्ये मिनरल्स आहेत. विदर्भाची प्रगती कोणी रोखू शकणार नाही आणि महत्वाचे म्हणजे विदर्भ हे देशाच्या मध्यभागी आणि हृदयस्थानी आहे. या ठिकाणी इन्फ्रॉस्ट्रक्चर किंवा ज्याला आम्ही लॉजिस्टिक लोकेशन म्हणतो ते अत्यंत महत्वाचे असल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये या ठिकाणी लॉजिस्टिक उद्योग मोठ्या प्रमाणावर येणार आहेत. शेवटी मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, माझा जन्म सुध्दा विदर्भामध्ये झालेला आहे. आपल्या विभागामध्ये उद्योगधंदे आणावयाचे असतील तर आपले जे प्लस पॉइन्ट्स आहेत ते निश्चितपणे आपण मांडले पाहिजेत. आमच्याकडे ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या सुध्दा आम्ही मांडल्या पाहिजेत. जे लोक उद्योगधंदे टाकण्यासाठी येतात त्यांना आम्ही सांगतो की, आम्ही मागासलेले आहोत, आमच्याकडे शिक्षण चांगले नाही, हे योग्य नाही. विदर्भामध्ये सगळे चांगले आहे. विदर्भामध्ये उद्योगधंदे आणत असताना कवी सुधाकर गायधनी यांच्या भाषेत आपण हे सांगितले पाहिजे की, "चिंध्या पांघरुन सोने विकायला बसलो, गिऱ्हाईक या ठिकाणी फिरकेना, सोने पांघरुन चिंध्या विकायला बसलो, गर्दी ती पेलवेना."

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

अशाच पध्दतीने माझ्या भागाचा प्रत्येक ठिकाणचा उल्लेख केला पाहिजे. विदर्भामध्ये उद्योग येणार आहेत. महाराष्ट्र सरकार त्यासाठी जागरुक आहे. त्यामुळे मला मनापासून अशी खात्री आहे की विदर्भाचा विकास होईल, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मोसंबीवर प्रक्रिया करणारा कारखाना जालना येथे होणे आवश्यक होते तो प्रकल्प नांदेडला गेला असे सांगून मंत्रिमहोदय उत्तर देत असताना विदर्भाच्या तोंडाला पाने पुसत आहेत. आम्ही बघू, करु अशा वल्गना ते करीत आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या एकाही मुद्याबाबत मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

उपसभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन दुपारी 12 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.46 ते दुपारी 12.00 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कुटुंबातील एकापेक्षा अधिक शिधापत्रिका अपात्र ठरविण्याबाबत

अल्प सूचना प्रश्न क्रमांक 2540 श्री. दिवाकर रावते, डॉ.नीलम गो-हे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1)कुटुंबील एकापेक्षा अधिक शिधापत्रिका अपात्र ठरविण्याचा निर्णय दिनांक 4 डिसेंबर, 2009 रोजी वा त्या सुमारास शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(3) ज्यांच्याकडे बोगस शिधापत्रिका आहेत ते त्या पत्रिकांच्या निवासाचा पुरावा अथवा अन्य कामासाठी उपयोग करणार असल्यास त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. अब्दुल सत्तार, श्री. अनिल देशमुख यांच्याकरिता (1) नाही.

(2) शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रक्रिया आहे. त्यानुसार तसेच केंद्र शासनाच्या सूचनानुसार राज्यातील सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करुन अपात्र शिधापत्रिकांची शोध मोहीम दिनांक 11 सप्टेंबर 2009 च्या परिपत्रकान्वये राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना शिधापत्रिका तपासणी नमुना अर्ज पुरविण्यात येऊन, त्यामध्ये शिधापत्रिकाधारक रहात असल्याचा पुरावा म्हणून त्यांनी चालू मतदार यादीतील नाव, वीज/ दूरध्वनी देयक, बँक पासबुक, भाडेपावती, ओळखपत्र, गृहनिर्माण संस्थेचे पत्र, निवासाबाबत शासन/सिडको/म्हाडा इत्यादीपैकी एक कागदपत्र एक वर्षापेक्षा जुना नसलेला पुरावा म्हणून अर्जासोबत जोडल्यानंतर संबंधित पुरवठा अधिका-याकडून तपासणी करुन, अर्जाची वर्गवारी करण्यात येईल. पुरावे सादर करणारे शिधापत्रिकाधारकांची "अ" गटात वर्गवारी करावी व जे शिधापत्रिकाधारक अर्ज भरुन देणार नाहीत, अथवा पुराव्याची कागदपत्रे सादर करणार नाहीत, त्यांच्या अर्जाची "ब" गटात वर्गवारी करुन, त्यांच्या शिधापत्रिका निलंबित करुन त्यावरील शिधावस्तूंचा पुरवठा थांबविण्यात यावा व या निलंबित केलेल्या शिधापत्रिकाधारकांना 15 दिवसांच्या मुदतीत पुरावे सादर करण्याच्या सूचना देण्यात येतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा तपासणीअंतर्गत, एका कुटुंबात व एका पत्त्यावर 2 शिधापत्रिका दिल्या जाणार नाहीत, अपवादात्मक परिस्थितीत देणे आवश्यक असल्यास, त्याची खातरजमा तहसीलदार दर्जाच्या अधिका-यांनी करावी. तसेच, विभक्त कुटुंबात शिधापत्रिका देताना, दोन्ही शिधापत्रिका बीपीएल अथवा अंत्योदय योजनेच्या असणार नाहीत. विदेशी नागरिकांना शिधापत्रिका दिली जाणार नाही, त्यांच्या शिधापत्रिका शोधून त्या रद्द कराव्यात. संशयास्पद असणा-या पुराव्याबाबत पोलिसांकडून तपासणी करुन घ्यावी. तपासणीची कार्यपध्दती व इतर बाबींसाठी जिल्हाधिकारी तसेच मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी नियंत्रक शिधावाटप यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन, त्यामध्ये आयुक्त, महानगरपालिका, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अपर जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी "अ" वर्ग नगरपालिका, जिल्हा पुरवठा अधिकारी/उपनियंत्रक, शिधावाटप यांचा सदर समितीत समावेश करण्यात आला असून, शोध मोहिमेअंतर्गत अपात्र आढळून येणा-या शिधापत्रिका रद्द करण्यात येऊन, रास्तभाव दुकानदाराकडील कोटा कमी करण्यात येतो.

(3) शिधापत्रिका ही जीवनावश्यक वस्तू कायद्याखालील सांविधिक आदेशातील तरतुदीनुसार संबंधित कुटुंबाला किंवा व्यक्तीला शिधावाटप किंवा रास्त भाव दुकानातून शिधावस्तू उचलण्यासाठी देण्यात येते. या शिधापत्रिकेचा रहिवासाचा पुरावा म्हणून ग्राह्य न धरण्याबाबत सर्व प्राधिकारी/कार्यालयांना शासन पारिपत्रक दिनांक 21.11.1998 अन्वये आवश्यक त्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, शिधापत्रिकेवर देखील पुरावा म्हणून वापर करण्यात येऊ नये, अशा सूचना स्पष्टपणे छापलेल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : या देशामध्ये 15 कोटी बोगस रेशन कार्डे आहेत असे सन्माननीय केन्द्रीय कृषी मंत्र्यांनी लोकसभेमध्ये जाहीर केले. त्यापैकी महाराष्ट्रातील किती बोगस रेशन कार्डे आहेत ? महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे ज्यांनी बोगस रेशन कार्डे दिली त्या अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? ही बोगस रेशन कार्डे किती वर्षातील आहेत ?

..3...

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:00
(अल्प सूचना प्रश्न क्रमांक 2540...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अब्दुल सत्तार : केन्द्र शासनाच्या धोरणानुसार आपण 2001 सालापासून ही मोहीम राबवित आहोत. 29 लाख 45 हजार बोगस शिधापत्रिका होत्या त्या रद्द केल्या. ही मोहीम चालू असून राहिलेली चौकशी पूर्ण करण्यात येईल. शिधापत्रिकाधारकांचे आयडेण्टिफिकेशन, पुरावे पाहिल्यानंतर जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याचे माननीय मंत्री महोदयांनी हेतूपुरस्सर टाळले आहे. माननीय मंत्र्यांनी शोध मोहीम चालू आहे असे उत्तर दिले. मग केन्द्रीय कृषी मंत्री या कन्क्ल्युजन पर्यन्त कसे काय आले ?

श्री. अब्दुल सत्तार : महाराष्ट्रामध्ये ही मोहीम चालू आहे. या मोहिमेंतर्गत 29 लाख 45 हजार शिधापत्रिका रद्द केलेल्या आहेत.

....नंतर श्री. पी. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्र. 2540.....

श्री. दिवाकर रावते : माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी 15 कोटी शिधा पत्रिका देशात बोगस असल्याचे सांगितले. त्यापैकी आपल्या राज्यात असलेल्या बोगस शिधा पत्रिकांची संख्या किती आहे ?

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, आपल्या राज्यात 29.45 लाख एवढ्या बोगस शिधा पत्रिका आढळून आल्या असून त्या शासनाने रद्द केल्याआहेत. तसेच अजुनही ही चौकशी सुरुच आहे व यापुढे अशा बोगस शिधा पत्रिका आढळल्यास त्याही रद्द करण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : अशा बोगस शिधा पत्रिका देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली?

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, यासंबंधीची संपूर्ण चौकशी केल्यानंतर जे अधिकारी जबाबदार आढळून येतील त्यांची तपासणी करुन कारवाई करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, सर्व शिधा पत्रिकांचे संगणकीकरण केलेले आहे त्यामुळे त्या रद्द करण्याचे काम सोपे झालेले आहे. परंतु उत्तरात "विभक्त कुटुंबामध्ये शिधा पत्रिका देताना दोन्ही शिधा पत्रिका बीपीएल अथवा अंत्योदय योजनेच्या असणार नाहीत" असे म्हटले आहे. माझा या अनुषंगाने प्रश्न असा आहे की, एखादे गरीब कुटुंब असेल आणि काही कारणाने ते कुटुंब विभक्त झाले म्हणून त्याला कार्डच देणार नाही तर मग त्यांच्यावर हा अन्याय होईल. दारिद्र्यरेषेखालील एखादे कुटुंब असेल आणि नंतर विभक्त झाले असेल तर त्या दोन्ही कुटुंबांना बीपीएल शिधापत्रिका शासन देणार काय ?

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, संगणकीकरणाचा जो प्रस्ताव आहे त्याला अजून सुरुवात केलेली नाही. शासन स्तरावर त्याचे टेंडर काढले परंतु फायनल झालेले नाही. हे सर्व झाल्यानंतर संगणकीकरण करण्यात येईल. तसेच एका कुटुंबात दारिद्रयरेषेखाली असल्याचे प्रमाणपत्र दिलेले असेल आणि नंतर ते विभक्त झाल्यास सर्व्हेच्या वेळेस जी परिस्थिती असेल त्यानुसारच आपण शिधा पत्रिका देतो. कारण ही केंद्रशासनाची योजना असून केंद्राकडूनच हे धान्याचे वाटप बीपीएल धारकांना करण्यात येते. त्यानुसार एका कुटुंबासाठी एका कार्डावर आपण 35 किलो धान्य देतो. अशा प्रकारे एका कुटुंबाची चार कुटुंबे झाली तरी धान्य मात्र एकाच कुटुंबाला देण्यात येते.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्र. 2540.....

सभापती : माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, एखादे कुटुंब दारिद्रयरेषेखाली आहे आणि त्याला आपण 35 किलो धान्य देतो असे म्हणालात. परंतु कालांतराने ते विभक्त झाले असल्यास यासंबधीचा निर्णय झाला नसेल तर त्यासंदर्भात विचार करणे आवश्यक आहे. कारण कुटुंब विभक्त झाल्यानंतर कुटुंबांची संख्या सुध्दा कमी होईल. मूळ कुटुंब पाच माणसांचे असेल आणि आपण त्याला 35 किलो धान्य देतो तसेच ते विभक्त झाल्यानंतर त्याची सदस्य संख्याही कमी होईल. म्हणून याबाबत सहानुभूतीने पहावे अशी मी सूचना करतो.

श्रीमती अलका देसाई : माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे म्हणून मी उप प्रश्न विचारु इच्छित नाही.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, मुंबई शहरात एका घरात दोन भाऊ राहत असतील आणि नंतर त्या एकाच घरात दोन चुली होतात अशा वेळेस शासन कोणता निर्णय घेणार आहे

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, आपण बीपीएल खालील एका कुटुंबाला 35 किलो धान्य देतो. अेपीएलसाठी कार्ड देण्याची मर्यादा नाही.

ॲड. अनिल परब : महोदय, मुंबईत जे अतिरेकी व बांगला देशी पकडले त्यांच्याकडे शिधा पत्रिका मिळाल्या होत्या....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रतिक्षेत्रीत नाही

अल्पावधी सूचना क्रमांक :2540....

ॲड. अनिल परब....

अतिरेक्यांना मदत करणारा अधिकारी मिळाला तर त्याला मोक्का कायद्याखाली अटक केली जाते. त्यामुळे ज्या अधिका-यांनी अतिरेक्यांना शिधापत्रिका मिळवून देण्यात मदत केलेली आहे अशा अधिका-यांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भातील शिफारस आपल्या विभागाकडून केली जाणार आहे काय ?

श्री. अब्दूल सत्तार : सभापती महोदय, अधिका-यांनी जर अतिरेक्यांना शिधापत्रिका देण्यामध्ये मदत केली असेल व त्यामध्ये अधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे तशी कारवाई करण्यात येईल .

डॉ.एन.पी. हिराणी : सभापती महोदय, सर्व रेशन दुकानावर शिधापत्रिकेनुसार नियमाप्रमाणे जे काही धान्य द्यावयास पाहिजे ते दिले जात नाही. रेशन दुकानाचे अर्ध्यापेक्षा जास्त धान्य अधिका-यांच्या संगनमताने काळया बाजारात विकले जाते. त्यामुळे नियमाप्रमाणे शिधाप्रतिकेवरील धान्य जनतेला मिळत नाही. काळया बाजारात धान्य विकले जाऊ नये तसेच शिधापत्रिका धारकाला नियमानुसार सर्व धान्य मिळण्याच्या संदर्भात शासनाने काही पाऊले उचलली आहेत काय ?

श्री. अब्दूल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी साहेबांनी विचारलेला प्रश्न, हा मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. खरे म्हणजे अल्पसूचना प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेला आहे. आता या ठिकाणी जी काही चर्चा चालली आहे ती रेग्युलर प्रमाणे चालली आहे.

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदय, अल्पसूचना प्रश्न असो, तारांकित प्रश्न असो तो सभागृहात आल्यानंतर ती सदनाची प्रॉपर्टी होते. त्यामुळे त्या प्रॉपर्टीवर जसा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांना प्रश्न विचारण्याचा हक्क आहे तसाच हक्क सभागृहातील अन्य सदस्यांना सुध्दा आहे. आपण प्रश्नाचे चांगल्या प्रकारे उत्तर देत आहात त्यामुळे एखादा दुसरा जास्त प्रश्न विचारल्यावर त्याची तमा तुम्ही कशाला बाळगता?

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पावधी सूचना क्रमांक :2540....

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने रेग्यूलर राशन कार्ड के बारे में जबाब दिया है. केन्द्रीय सरकार ने दारिद्रय रेखा से नीचे के लोगों का इवेल्यूएशन करने के लिए एक कमेटी बनाई है. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या महाराष्ट्र सरकार ने इस कमेटी के पास कोई लिस्ट भेजी है और अगर लिस्ट भेजी है तो उसमें संख्या कितनी है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि दारिद्रय रेखा से नीचे वाले किसी व्यक्ति को राशन कार्ड नहीं मिला है तो उनको कार्ड देने के बारे में क्या आपके पास कोई प्रावधान है ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि क्या फोटो के साथ राशन कार्ड देने की शासन की कोई योजना है ?

श्री. अब्दूल सत्तार : सभापती महोदय, रेशन कार्डच्या संदर्भात आपण नवीन प्रोफार्मा दिलेला आहे. त्या प्रोफार्मामध्ये फोटो, आयडेंटी प्रुफ, रहिवासी प्रमाणपत्र अशा प्रकारे सर्व डिटेल प्रोफार्मामध्ये दिलेले आहेत. बीपीएलचा सर्व्हे 2002 मध्ये झालेला असून आता नवीन सर्व्हे करण्याच्या संदर्भात केंद्रशासनाचे डायरेक्शन आलेले असल्यामुळे आम्ही आता नवीन सर्व्हे करणार आहोत. नवीन सर्व्हेमध्ये ज्या लोकांना दारिद्रय रेषेचे कार्ड मिळाले नाहीत त्या लोकांना जरुर दारिद्रय रेषेचे कार्ड देण्यात येईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बालवाडया बंद केल्यामुळे बेरोजगार होणा-या महिलांच्या रोजगाराबाबत.

विधानपरिषद अल्पावधी सूचना प्रश्न क्रमांक 2544	श्री.सुभाष झनक, मा.मंत्री, महिला व बाल विकास
श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गो-हे, विधानपरिषद सदस्य	
सन्माननीय महिला व बालविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (1) राज्यशासनामार्फत चालविण्यात येणा-या बालवाढया बंद करण्याचा निर्णय शासनाने दिंक 3 डिसेंबर,2009 रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय, (2)असल्यास, याबाबतच्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, (3) असल्यास, बालवाडया बंद केल्यामुळे बेरोजगार होणा-या महिलांच्या रोजगाराबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?	(1),(2),(3) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत ज्या गावी / ठिकाणी नवीन अंगणवाडी केंद्र मंजूर करण्यात आले आहेत, त्या गावी / ठिकाणी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, कॅन्टोनमेंट बोर्ड (कटक मंडळ), समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग, केंद्रीय व राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्ड यांची सुरु असलेली बालवाडी बंद करण्याचा निर्णय 1992 पासून अस्तित्वात आहे. अशा बंद करावयाच्या बालवाडी केंद्रातील बालवाडी शिक्षिका / मदतनीस यांना नव्याने मंजूर करण्यात आलेल्या अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधननी पदांवर शैक्षणिक अर्हतेनुसार थेट नियुक्ती देण्याची उपाययोजना सुध्दा पूर्वीपासून करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पावधी सूचना क्रमांक :2544....

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, 1992 सालापासून बालवाडया बंद करण्याचा निर्णय झालेला आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, "अशा बंद करावयाच्या बालवाडी केंद्रातील बालवाडी खिक्षिका / मदतनीस यांना नव्याने मंजूर करण्यात आलेल्या अंगणवडी केंद्रातील अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी पदांवर शैक्षणिक अर्हतेनुसार थेट नियुक्ती देण्याची उपाययोजना सुध्दा पूर्वीपासून करण्यात येत आहे." त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, बालवाडी शिक्षिका आणि अंगणवाडी शिक्षिकांच्या मानधनात काय फरक पडतो. तसेच सर्व सेविका सामावल्या गेल्या आहेत काय ? आमच्या माहिती प्रमाणे शहर विभागातील ब-याच बालवाडी शिक्षिकांच्या संदर्भात महानगरपालिकेने निर्णय न घेतल्यामुळे त्यांना अंगणवाडी विभागात सामावून घेण्यात आले नाही.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अ.सू.प्र.2544..डॉ.गो-हे..

नवीन मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी त्यांची आंदोलने सुरु आहेत तेव्हा बालवाडी सेविकांना अंगणवाडी सेविका म्हणून सामावून घेतले आहे काय ,जर घेतले नसेल तर सगळयांना सामावून घेण्यात येणार आहे काय ?

श्री.सुभाष झनक : सभापती महोदय, ज्या ठिकाणी जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या बालवाडया होत्या व नंतर त्या बंद पडल्या त्या ठिकाणी बालवाडी शिक्षिका म्हणून ज्या काम करीत होत्या त्यांना अंगणवाडी सेविका म्हणून सामावून घेण्यात आले आहे परंतु कोठे सामावून घ्यावयाचे राहिले असेल तर त्यांनाही सामावून घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे: दोघींच्या मानधनात काही फरक आहे काय?

श्री.सुभाष झनक :मानधन सारखेच आहे.

श्री.चंद्रकांत रघुवशी : काही नगरपालिकेचे अंगणवाडी सुरु करण्याचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. उदाहरणार्थ नंदूरबार नगरपालिकेने शासनाकडे यासंबंधी एक प्रस्ताव दिला असून शासनाच्या चुकीमुळे तो प्रस्ताव प्रलंबित आहे तेव्हा या प्रस्तावाला मान्यता देण्यात येणार आहे काय ?

श्री.सुभाष झनक : ही बाब तपासून त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

सभापती : अल्प सूचना प्रश्न संपले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. लेखी उत्तरे

मु.शी. : तारांकित प्रश्नासबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " तिवसा (जि.अमरावती) येथील उद्योगासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत" या विषयावरील सर्वश्री जगदीश गुप्ता, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. यांच्या दिनांक 4 जून 2009 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 52077 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपणा-या वर्षाचा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपणा-या वर्षाचा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2006-2007 चा स्थानिक संस्था अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2006-2007 चा स्थानिक संस्था अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा सामितीच्या सन 2001-202 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक 1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागानी सन 2008-2009 यसा वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधेयकांना संमती अधिसंमती

सभापती : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकाना विधानसभेकडून संमती मिळाल्याची आणि दोन्ही सभागृहाव्दारे पारित केलेल्या विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी सचिव वाचून दाखवतील.

सचिव : विधान परियदेने पारित केलेली पुढील विधेयके विधानसभेकडून संमत करण्यात आली.

अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली

1) सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 7 महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्येविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्त यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक,2009
2) सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 8 महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन (सुधारणा)विधेयक 2009
3) सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 9 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन वव नगर रचना (तिसरी सुधारणा) विधेयक 2009
4) सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 11 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक 2009

ब) खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

1) सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 54 महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक 2009

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत/ग्रीसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनांसंबंधी</u>

सभापती : आज नियम 93 खालील सूचना मी घेतलेल्या नाहीत. मात्र नियम 93 खाली दिलेल्या सूचनांवर मी निदेश दिल्याप्रमाणे शासनाकडून निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे नियम 93 खालील 36 निवेदने आलेली आहेत. तेव्हा आपण म्हटले तर प्रत्येक निवेदनावर एक एक प्रश्न विचारून ही निवेदने आपल्याला घेता येतील.

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, आजची नियम 93 खालील सर्व निवेदने आम्हाला मिळालेली नाहीत. ..

सभापती : ठीक आहे. क्र. 1 ते 36 निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली निवेदने छापावीत.)

..... बीबी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करतो. सभापती महोदय, वसई परिसरामधील हा विषय आहे. त्या ठिकाणी नायगाव भागामध्ये रेल्वे स्टेशनकडे जाणारा जो पूल आहे तो केव्हाही कोसळेल अशी त्याची आज स्थिती आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा पूल तेथे कार्यरत आहे. सिडको द्वारे वसई परिसरातून लाखा-करोडो रूपयांचा महसूल गोळा केला जातो परंतु त्यातून प्रत्यक्षात जो खर्च केला पाहिजे तो खर्च केला जात नराही. हा जो पूल आहे त्या पुलावरून लाखो लोक स्टेशनवर जातात. त्या पुलाचे दुरूस्तीचे काम सिडकोने केले पाहिजे. परंतु अजूनही ते काम तेथे सुरू झालेले नराही. तेथील नागरिकांनी त्यासाठी सह्यांची मोहीम सुरू केली होती तसेच अनेक आंदोलने केली आहेत. त्यापैकी एका आंदोलनामध्ये मी देखील उपस्थित होतो. त्या पुलाच्या बांधकामाबाबत पालक मंत्र्यांनी एक बैठकही बोलाविली होती. परंतु अद्याप त्या पुलाच्या बांधकामाचा मुहूर्त मिळालेला दिसत नाही. तेव्हा तातडीने, पुढील काही धोकादायक प्रसंग उद्‌भवण्यापूर्वीच, नायगाव रेल्वे स्टेशनला जाणाऱ्या या पुलाच्या दुरूस्तीचे काम केले जावे यासाठी मी हा मुद्दा येथे उपस्थित केला आहे.

--

सभापती : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करते बीड जिल्ह्यामध्ये 108 आश्रमशाळा आहेत आणि त्यांना धान्य पुरवठा करण्यासाठी 163 मे.टन धान्याची मागणी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासनाकडे केली आहे. परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जून 2009 पर्यंत केवळ 54 मे.टन धान्याचे नियतन दिले गेले आहे. जुलैपासून अद्याप पर्यंत तेथे धान्य पुरवठा झालेला नाही त्यामुळे तेथील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची उपासमार होत आहे. तरी शासनाने तातडीने तेथे धान्य पुरवठा करावा यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

..... बीबी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात आरोंदे या ठिकाणी समुद्रालगत एक बेट निर्माण झालेले आहे व त्यावर कांदळवन आणि मॅनग्रोजची झाडे आहेत. त्यांची नोंद 7-12 वर न केल्यामुळे त्या ठिकाणी महसूल विभागाने बिनशेतीचे आदेश दिलेले आहेत. ...

(यानंतर श्री. सरफरे ...सीसी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

वन विभागाच्या एका वन अधिकाऱ्याने त्याठिक्राणी खारफुटी नसल्याचा दाखला दिला आहे. त्यामुळे त्याठिक्राणी बिनशेती करण्याचा दिलेला आदेश रद्द करावेत. आणि ज्या अधिकाऱ्यांनी खारफुटी नसल्याचा दाखला दिला आहे त्याच्यावर कारवाई करावी. आणि याठिकाणी मॅनग्रोव्हज आणि कांदळवन आहे त्याची नोंद 7/12 च्या उताऱ्यावर करण्यासाठी उपाय योजना करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"अशोक कामटे यांच्या पत्नी विनीता कामटे यांच्या "टू द लास्ट बुलेट" या पुस्तकास मी आपल्यामार्फत राम प्रधान समिती अहवालावरील आमदारांच्या समितीसाठी सादर करीत आहे. या मागील महत्वाचे कारण असे की, राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहात सादर झाल्यावर काल दिनांक 22 डिसेंबर रोजी वीरपत्नींनी पत्रकार परिषद घेऊन अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांच्याकडील माहिती, त्यांचे मनोगत व त्यांच्या प्रश्नांची कोणीही दखल घेत नाही. किंवा सरकार त्यांना दिलासा देण्यास कोणतेही पाऊल उचलत नाही. हे अत्यंत क्लेशकारक आहे. याच प्रश्नाला वाचा फोडण्यास मी विनीता कामटे यांचे "टू द लास्ट बुलेट" पुस्तक सादर करुन त्याची दखल घेण्याचा प्रश्न औचित्याच्या मुद्याव्दारे मांडत आहे."

सभापती महोदय, गेल्या वर्षी 26/11 च्या हल्ल्यामध्ये जे वरिष्ठ पोलीस अधिकारी शहीद झाले. त्यामध्ये श्री. अशोक कामटे यांच्या पत्नी श्रीमती विनीता कामटे यांनी "टू द लास्ट बुलेट" या नावाचे पुस्तक लिहिले व ते श्री. उल्हास लाटकर यांच्या अमेय प्रकाशनतर्फे प्रकाशित करण्यात आले. श्रीमती विनीता कामटे आणि श्रीमती विनीता देशमुख यांनी 300 पानी पुस्तक लिहिले आहे त्यावर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व देशामध्ये चर्चा सुरु आहे. सभापती महोदय, राम प्रधान समितीच्या अहवालावर चर्चा होणार नाही. परंतु या वीरपत्नींनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, राम प्रधान समितीच्या अहवालापेक्षा वेगळी माहिती त्यांच्याकडे आहे. आणि म्हणून मी आपल्या अनुमतीने हे पुस्तक या सभागृहामध्ये सादर करते. माझी आपणास विनंती आहे की, या राम प्रधान समितीच्या अहवालावर ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी या पुस्तकाबद्दल शासनाच्या अधिकृत प्रतिनिधींपैकी कुणीतरी श्रीमती विनीता कामटे, श्रीमती कविता करकरे व श्रीमती स्मिता साळस्कर यांचेशी बोलून विचारपूस करावी असे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, एकीकडे महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न प्रलंबित असतांना त्यामध्ये आणखी एक सीमा वादाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र व आंध्र प्रदेश यामधील सीमा वाद सोडवितांना माननीय फाजल अली समितीच्या शिफारशीनुसार भाषावार प्रांत रचनेप्रमाणे, दोन्ही राज्यातील 1955-56 या वर्षाच्या सीमा रेषांच्या आधारे तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या आधारे सीमेवरील 14 गावातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी आदिलाबाद लोकसभा मतदारसंघातून व खानापूर मतदारसंघातून या गावातील मतदारांची नावे वगळण्यासाठी शासनाने परिसीमन आयोग भारत सरकार आणि भारतीय निवडणूक आयोगाकडे तातडीने पाठपुरावा करुन उपरोक्त 14 गावात केवळ महाराष्ट्र राज्यातीलच निवडणुका होण्यासाठी तसेच आंध्र प्रदेशातील मंडळ पंचायत अर्थात ग्रामपंचायती बरखास्त करुन खऱ्या अर्थाने ही गावे महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, तेथील नागरिकांना त्यांचे रेशनकार्ड मिळत आहे. त्यांच्या 7/12 च्या उताऱ्याच्या प्रती मिळत आहेत. आणि म्हणून या संदर्भात शासनाने तातडीने लक्ष घालावे. महसूल विभागाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. म्हणून या औचित्याच्या मुद्याव्दारे मांडलेल्या मांडलेल्या विषयावर शासनाने उचित कारवाई करावी ही विनंती."

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्या मांडला आहे. गेल्या दोन वर्षापासून विधानसभेमध्ये माननीय सदस्य श्री. वामनराव चटप यांनी या विषयावर चर्चा उपस्थित केली होती. त्याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासनाची परिपूर्ती झाली नाही. विषय गंभीर असल्यामुळे आपण याबाबत दखल घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती : मी शासनामध्ये राज्यमंत्री होतो तेव्हापासून हा प्रश्न सोडविण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी त्याबाबत शासनास दखल घेण्यास सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी सन्माननीय आरोग्य मंत्री नामदार श्री. सुरेश शेट्टी यांनी विधानसभेमध्ये एक स्टेटमेंट केले होते की, एकही बालमृत्यू कुपोषणाने झालेला नाही. मी आपणासमोर दोन बालकांचे मृत्यू झाले त्यांची नावासहीत माहिती देतो. मला याठिकाणी दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, धारणी तालुक्यामध्ये गेल्या 90 दिवसात 90 बालमृत्यू झाले आहेत. खारीगावामध्ये लक्ष्मी रायसिंग धुर्वे आणि कळमखार गावामध्ये राजेश्वर रामेश्वर भिलावेकर ही दोन्ही मुले ग्रेड 4 मधील होती. त्यांच्या झालेल्या मृत्यूबाबत हे शासन किती गंभीर आहे हे दिसून येते. 90 दिवसात 90 बालमृत्यू होतात म्हणजे दिवसाला 1 बालकाचा मृत्यू झालेला आहे.त्याचप्रमाणे् या विदर्भामध्ये सिकलसेल ॲनिमियाचा प्रभाव मोठया प्रमाणात आहे. त्यामध्ये साडे दहा लाख लोक सिकलसेल ॲनिमियाच्या उपचारापासून वंचित आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सभापती महोदय, मी एकच बाब वाचून दाखवितो. मी काल जो प्रश्न विचारला होता, त्याच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"केंद्र शासनाकडून सिकलसेल निर्मूलनासाठी या विभागास काहीही निधी प्राप्त झाला नाही." अशी हलाखीची परिस्थिती आहे. माझी औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती आहे की, या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि विदर्भातील रुग्णांना आपण न्याय द्यावा. धन्यवाद.

सभापती : आज माझ्याकडे औचित्याचे मुद्दे आलेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी दोन-दोन औचित्याचे मुद्दे दिलेले आहेत. एक अपवाद म्हणून सन्माननीय सदस्यांना दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी देत आहे.

सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, आपण आम्हाला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते.

सभापती महोदय, सत्यशोधक ओ.बी.सी.परिषदेने माता सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला द्यावे अशी मागणी शासनाकडे सातत्याने केलेली आहे. त्याबाबत शासनाकडून अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. माझी शासनाला या औचित्याच्या मुद्यामार्फत विनंती आहे की, माता सावित्रीबाई फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला द्यावे आणि सावित्रीबाई फुले यांच्या विषयीची स्वत:ची आदराची भावना व्यक्त करावी. धन्यवाद.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे.

सभापती : ठीक आहे.

. . . .2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी हा विषय अशासकीय कामकाजाच्या वेळी उपस्थित केला होता. परंतु 11 डिसेंबर रोजी कोयना भूकंपास 42 वर्षे पूर्ण झाली आहेत. आज देखील सकाळी साताऱ्यामध्ये 3 रिश्टर स्केलचा छोटा भूकंप झाला अशी माहिती आलेली आहे.14 नोव्हेंबरला देखील मोठा भूकंपाचा धक्का बसला. 12 डिसेंबरलाही मोठा भूकंप झाला आणि अशा प्रकारे अनेक वेळा धक्के बसले असले आणि सातारा जिल्ह्यात पडझ ाड झाली असली तरी भूकंप मापक योजना डिजीटल असली तरी त्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. म्हणून सातारा व लातूर येथील भूकंप मापक यंत्रणा अद्ययावत असाव्यात, त्या कार्यक्षमपणे चालविण्यासाठी कर्मचारी असावेत आणि भूकंप प्रतिबंधक उपाययोजनांचा प्रचार करणे. तसेच आता भूकंपाची व्याप्ती सिंधुदूर्ग, रत्नागिरी कोल्हापूर पासून मुंबईपर्यंत सातत्याने पोहोचत आहे. म्हणून मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे की, भूकंपाबाबतच्या उपाययोजनांसाठी कार्यक्षम पावले उचलावीत आणि त्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि संबंधित विभागांनी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण, विदर्भ अशा ठिकाणी विभागीय बैठका घेऊन भूकंप प्रतिबंधक कोणती पावले उचलण्यात आलेली आहेत या संदर्भात पुढील सहा महिन्याच्या आत कार्यवाही करावी याकडे मी औचित्याच्या मुद्याव्दारे लक्ष वेधत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी या माध्यमातून एक अतिशय महत्वाचा विषय मांडू इच्छितो. मी परवाच एका वर्तमानपत्रामध्ये वाचले की, गुरुदेव सेवा मंडळाचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिष्य ग्रामगीताचार्य श्री.रामदेवदादा बेलूरकर यांनी एक वेदना व्यक्त केली की, राष्ट्रसंतांची शताब्दी सुरु असताना कुठल्याही पोस्टामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे पोस्टाचे तिकीट आणि संत गाडगेबाबांचे पोस्टाचे तिकीट उपलब्ध होत नाही. मला ही कल्पना आहे की, ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारित नाही. पण राज्य शासनाच्यावतीने केंद्र शासनाला सांगून, कारण माजी राष्ट्रपती महामहीम डॉ.शंकर दयाल शर्मा

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

यांच्या हस्ते राष्ट्रसंतांचे तिकीटाचे प्रकाशन झाले. परंतु शताब्दी वर्षामध्ये मात्र ते तिकीट कुठेही उपलब्ध नाही अशी खंत ग्रामगीताचार्य रामदेवदादा बेलूरकर यांनी व्यक्त केलेली आहे. तेव्हा राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती करावी की, हे तिकीट उपलब्ध करुन द्यावे.

सभापती : माझी माननीय उप मुख्यमंत्री यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अत्यंत महत्वाचे विषय मांडलेले आहेत. त्याची नोंद आपल्यामार्फत संबंधित विभागांकडे जावी आणि या मुद्यांच्या अनुषंगाने जी योग्य कार्यवाही करावयाची आहे, ती होण्याची आवश्यकता आहे. धन्यवाद.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, होय.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे,तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे विनियमन,2008 हे विधेयक सभागृहात मंजूर झाल्यानंतर, सदर विधेयकाबाबत माननीय राष्ट्रपती यांची अनुमती घेणे आवश्यक असल्याचे अभिमत महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले असतानाही, माननीय राष्ट्रपतींची अनुमती घेणे आवश्यक नसल्याचे नमूद करणे

मु.शी.: कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे,तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे विनियमन,2008 हे विधेयक सभागृहात मंजूर झाल्यानंतर, सदर विधेयकाबाबत माननीय राष्ट्रपती यांची अनुमती घेणे आवश्यक असल्याचे अभिमत महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले असतानाही, माननीय राष्ट्रपतींची अनुमती घेणे आवश्यक नसल्याचे नमूद केल्याबबात श्री.एच.बी.पटेल,सचिव, विधी व न्याय विभाग यांच्या विरुध्द सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना.

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "कापूस बी-बियाण्यांचा पुरवठा, वितरण व विक्री करणे,तसेच त्यांची विक्री किंमत निश्चित करणे विनियमन,2008 हे विधेयक सभागृहात मंजूर झाल्यानंतर, सदर विधेयकाबाबत माननीय राष्ट्रपती यांची अनुमती घेणे आवश्यक असल्याचे अभिमत महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले असतानाही, माननीय राष्ट्रपतींची अनुमती घेणे आवश्यक नसल्याचे नमूद करणे" याबाबतीत श्री. एच.बी.पटेल, सचिव, विधी व न्याय विभाग यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 240 अन्वये मी आपल्याकडे विशेषाधिकारभंगाचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

सभापती महोदय, विधेयक क्रमांक -4. कापूस बी.टी.बियाणाचा पुरवठा यासंदर्भातील एक विधेयक या सभागृहासमोर आले होते ते किमान सहा अधिवेशनामध्ये मंजूर होऊ शकले नाही. या विधेयकाला माननीय राष्ट्रपतींची अनुमती घेतल्या शिवाय हे विधेयक या सभागृहात मांडता येत नाही अशा पकारचे पत्र मी दिनांक 18 मार्च, 2009 रोजी दिले होते. त्यावेळी त्या विधेयकाचा क्रमांक 63 होता, पण ते हेच विधेयक आहे. घटनेच्या कलम 304 नुसार या विधेयकावर चर्चा होण्यापूर्वी माननीय राष्ट्रपतीची मान्यता घेण्याची आवश्यकता आहे, असे मी शासनाच्या निदर्शनास आणले होते. तत्पूर्वी हे विधेयक व्यपगत झाले म्हणून ते पुन्हा एकदा विधानसभेमध्ये आणण्यात आले. त्यावेळी विषय तेथे मांडण्यात आला त्यानंतर याबाबतीत माननीय राज्यपालांचे मत घेण्यात आले. माननीय राज्यपाल महोदयांनी यासंदर्भातील आपले मत स्पष्ट शब्दात व्यक्त केलेले आहे. तसेच "मुबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे याबाबतीत एक याचिका सुरु असून ती लक्षात घेता याबाबतीत माननीय राष्ट्रपतींचे मत घेणे आवश्यक आहे " अशा प्रकारचे मत महाअधिवक्ता यांनी दिलेले आहे. परंतु सभागृहात गोंधळा झाला त्यावेळी त्या गोंधळात हे विधेयक पारित करण्यात आले. याबाबतीत माननीय राष्ट्रपतींची मान्यता नंतर घेण्यात येईल असे सांगण्यात आले असताना देखील सबंधित सचिवांनी माननीय राज्यपालांना जे पत्र लिहिलेले आहे ते सभापती महोदय,मी आपल्याकडे सादर केलेले आहे. त्यामध्ये महाअधिवक्ता यांचे मत माननीय राज्यपालांकडे सादर न करता, त्यांना ते न दाखवता आपलेच स्वत:चे एक पत्र लिहून अशा प्रकारे घटनेच्या कलम 9, अमुक अमुक प्रमाणे आपली मान्यता देण्यास हरकत नाही, अशा प्रकारचे मत देऊन या सदनाचा आणि सदस्य म्हणून आमचा विशेषाधिकार भंग केलेला आहे. तसेच माननीय राज्यपाल महोदयांची फसवणूक केलेली आहे. म्हणून संबंधित सचिवांवर विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव दाखल करण्यात यावा अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती :याबाबतीत नैसर्गिक न्याय या अनुषंगाने संबंधित सचिवांचे स्पष्टीकरण मागविण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जी हक्कभंगाची सूचना दिलेली आहे त्याबाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईवर दि.26 नोव्हेंबर,2008 रोजी झालेल्या हल्ल्याबाबत चौकशी करणाऱ्या राम प्रधान समितच्या गोपनीय अहवालातील मजकूर वर्तमानपत्र तसेच मिडियामध्ये दाखविण्यात येणे.

मु.शी.: मुंबईवर दि.26 नोव्हेंबर,2008 रोजी झालेल्या हल्ल्याबाबत चौकशी करणाऱ्या राम प्रधान समितच्या गोपनीय अहवालातील मजकूर वर्तमानपत्र तसेच मिडियामध्ये दाखविण्यात येणे याबाबत आयबीएन लोकमत, सीसीएन/आयबीएन इलेक्ट्रॉनिक न्यूज् चॅनेलचे संपादक, मालक व प्रशासक यांच्या विरुध्द सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "मुंबईवर दि.26 नोव्हेंबर,2008 रोजी झालेल्या हल्ल्याबाबत चौकशी करणाऱ्या राम प्रधान समितच्या गोपनीय अहवालातील मजकूर वर्तमानपत्र तसेच मिडियामध्ये दाखविण्यात येणे याबाबात आयबीएन लोकमत, सीसीएन/आयबीएन इलेक्ट्रॉनिक न्यूज् चॅनेलचे संपादक, मालक व प्रशासक" यांच्या विरुध्द सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दुसरा अत्यंत महत्वाचा असा विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव मी प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात सादर केलेला आहे. प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात शासनाचे धोरण लवचिक आहे. शासनाचे धोरण निर्धाराचे, कारवाई करण्याचे नाही. ऑफिशियल सिक्रसी ॲक्ट, 1923 नुसार आपण चौकशीची घोषणा केल्यानंतर शासनाच्या मान्यतेशिवाय तो अहवाल जनतेला दाखविणे, जनतेसाठी जाहीर करणे हा गुन्हा आहे. त्या गुन्हयाच्या संदर्भातील माझे मत मी त्यामध्ये दिलेले आहे. तो गुन्हा नोंदविण्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शासनाला धारिष्टय का होत नाही, हेच मला कळत नाही. शासनाने खरे म्हणजे सभागृहात सदस्यांना एवढा मोठा संघर्ष निर्माण करावयाला लावला, आम्हाला या सभागृहातून निलंबित करायला लावले परंतु तोच अहवाल सभागृहाल न दखविता जनतेला दाखविण्यात आला त्याबाबतीत कारवाई करण्याचे धारिष्टय सरकारला कां दाखविता येत नाही? हेच मला कळत नाही. याबाबतीत माननीय गृह मंत्र्यांना मी परवाच्या दिवशी तीन वेळा सभागृहात प्रश्न विचारला, त्यावेळी त्यांनी बघू, करु, शोध घेऊ अशा प्रकारची उत्तरे दिली. शोध काय घेता?

सभापती महोदय, मी याठिकाणी जो विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव सादर केलेला आहे,त्यामध्ये संबंधित आय.बी.एन. लोकमत यांनी दाखविलेली तीन तासाची सीडीच आपल्याकडे सादर केलेली आहे.त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "हा अहवाल सदस्यांना मिळणे आवश्यक असताना देखील मी तो सादर करीत असल्यामुळे याबातीत माझ्यावर विशेषाधिकार हक्कभंगाचा प्रस्ताव सादर होईल याची मला जाणीव आहे. मला याचीही कल्पना आहे की, ऑफिशिएल सिक्रसी ॲक्टचा मी भंग करीत आहे त्यामुळे याबाबतीत माझ्यावर कारवाई होईल. तरीही मी हा अहवाल जाहीर करीत आहे" अशा प्रकारे उघड उघड सदस्यांना आव्हान, सरकारला आव्हान देण्यात आल्यानंतर देखील सरकार बोटचेपेपणा का करीत आहे हेच मला कळत नाही. शासन या बाबतीत धारिष्टय का दाखवित नाही? हे मला कळत नाही. सदस्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव जेवढया उथळपणे याठिकाणी आणला गेला, तेवढा अगतिकपणा शासन याबाबतीत का दाखवित नाही? हे मला कळत नाही. मी सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग करीत आहे,अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य करुन, हा अहवाल सदनात सादर करता आला नाही त्यामुळे याबाबतीत माझ्यावर विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव येईल याची मला माहिती आहे. अशा प्रकारची दरर्पोक्ती त्यांनी केलेली आहे यासंबंधीचा सर्व इतिहास मी यामध्ये लिहिलेला आहे. त्यानंतर या बाबतीत सिक्रसी ॲक्टप्रमाणे कोणता गुन्हा होऊ शकतो, याबाबतचे ओपिनियनसुध्दा मी लिहिले आहे. सुप्रिम कोर्टाच्या सायटेशन्स मी यामध्ये नमूद केलेल्या आहेत. तसेच त्यासंबंधीची एक सीडी देखील सभापती महोदय, मी आपणाकडे सुपुर्द केलेली आहे.

यानंतर श्री.बरवड...

अशुद्धीत प्रत/शोधनीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, ही जी हक्कभंगाची सूचना आह ती विदेशी चालक, विदेशी आणि स्वदेशी मालक, इकडचे चालक आणि संपादक, आयबीएन, सीसीएन, आयबीएन-7 या सर्वांच्या बाबतीत मी हा हक्कभंग उपस्थित केलेला आहे.

सभापती : याबाबतीत संबंधिताना स्पष्टीकरण विचारुन त्यांचे स्पष्टीकरण येताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो हक्कभंग दिलेला आहे त्यादृष्टीने जरुर योग्य तो निर्णय घेण्याची प्रक्रिया मी करीन.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकणासाठी जाहीर करण्यात आलेल्या पॅकेजचा निधी उपलब्ध करण्यात न येणे

मु. शी. : कोकणासाठी जाहीर करण्यात आलेल्या पॅकेजचा निधी उपलब्ध करण्यात न येणे यासंबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, अरविंद सावंत, किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नियोजन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सिंधुदूर्ग जिल्ह्यात कोकणासाठी नुकत्याच घेण्यात आलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीन वर्षाकरीता 5,232 कोटी रुपयांचे पॅकेज जाहिर होणे, त्यामध्ये त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी 1,200 कोटी रुपये, रत्नागिरी, सिंधुदुर्ग स्वतंत्र परिक्षक मंडळ योजना जाहीर होवून सिंधुदुर्गला फक्त साकवासाठी 1 कोटी 50 लाख रुपये जाहिर करण्यात येणे, सदरहू जाहीर झालेल्या पॅकेजमध्ये अन्य कोणतीही तरतूद कोकणाला देण्यात न येणे, परिणामी कोकणातील विकासाला चालना न मिळणे, याबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना. "

श्री. विजय वडेट्टीवार (नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 24 जुलै रोजी मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीच्या अनुषंगाने वृत्तपत्रातून बातम्या छापून आल्या. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषद घेतली आणि सांगितले की, 5200 कोटीचे पॅकेज जाहीर केले आहे. वृत्तपत्रांनी 'कोकणाला घबाड मिळाले' अशा प्रकारच्या बातम्या छापल्या. या बातम्यांमध्ये ठाण्याला 1317 कोटी रुपये मिळणार, सिंधुदुर्ग,रत्नागिरी आणि रायगडला 3915 कोटी रुपये मिळणार आणि सिंचनाला 1200 कोटी रुपये मिळणार असे जाहीर झाले. त्यानंतर या आर्थिक वर्षात सागरी महामार्गासाठी 97 कोटी रुपये, पर्यटनासाठी 60 कोटी रुपये त्याचप्रमाणे बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठासाठी 10 कोटी रुपये मिळणार, पाटबंधारे प्रकल्पांसाठी 725 कोटी मिळणार अशा प्रकारचे जाहीर केले. हे जाहीर केल्यानंतर 31 जुलै रोजी साकव आणि रस्ते दुरुस्तीसाठी 21.50 कोटी रुपये देण्याबाबतचा जी.आर. वितरित केला. त्या निधीचे वितरण न झाल्यामुळे त्या कामांचे टेंडर निघू शकले नाहीत आणि ज्यांचे टेंडर काढले त्यांची वर्क ऑर्डर दिली गेली नाही. त्यामुळे ते पैसे दिले जाणार आहेत काय ? 9 आणि 10 डिसेंबरला पुरवणी मागण्यांव्दारे जे पैसे जाहीर केलेले आहेत ते फक्त ड्रेझरसाठी आणि इमारत बांधकामासाठी आहेत. ज्या अन्य मागण्या आहेत तसेच आपण अन्य ज्या बाबी जाहीर केलेल्या आहेत त्याचा समावेश या पुरवणी मागण्यांमध्ये नाही. तो निधी कोणत्या मार्गाने शासन कोकणाला आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला देणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हे कोकण विकास पॅकेज तीन वर्षासाठी आहे आणि या तीन वर्षामध्ये हे पैसे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सन 2009-10 मध्ये आपण 2908 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पैसे एकाच वेळेस उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत तर ते टप्प्याटप्प्याने पैसे उपलब्ध करुन दिले जातील. ज्या वर्षासाठी जे ॲलोकेशन पाहिजे ते दिले जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, कोकण विकास पॅकेज जाहीर झाल्यानंतर शासनाने वेगवेगळी परिपत्रके पाठविलेली आहेत. धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांच्या संदर्भात शासनाचे असे परिपत्रक आहे की, त्यासाठी डीपीडीसीतून निधी घ्यावा. साकवांच्या संदर्भात सुध्दा अशा प्रकारचे परिपत्रक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

आहे की, त्यासाठी डीपीडीसीमधूनच पैसे खर्च करण्यात यावेत. म्हणून शासनाने सगळ्या बाबतीत जी रक्कम जाहीर केलेले आहे ते पैसे कधीपर्यंत त्या ठिकाणी येतील ? शासनाने पाठविलेले जी. आर. माझ्याकडे आहेत. हे पैसे 2009-10 चे म्हणजे पहिल्या टप्प्यातील आहेत. शासनाने पुरवणी मागण्यांमध्ये बंदरातील गाळ काढण्यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद दाखविलेली आहे. हा निधी प्रत्यक्षात कधी देणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कोकण पॅकेजचा जो उद्देश आहे त्यामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे, शैक्षणिक आणि आरोग्याच्या संदर्भात दर्जा वाढविणे, पर्यटनाला चालना देणे या सगळ्या बाबी आहेत. या वर्षी जे 2908 कोटी रुपये द्यावयाचे आहेत ते या वर्षी दिले जातील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या वर्षी जो निधी द्यावयाचा आहे तो आम्ही देणार आहोत. माननीय राज्यमंत्र्यांनी अशी नवीन काही पध्दत काढली आहे काय ? पुरवणी मागण्या मान्य झाल्यानंतर पुन्हा अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या आधी वेगळ्या पध्दतीने ते हा निधी देणार आहेत काय ? निधी द्यावयाचा असता तर ते या पुरवणी मागण्यांमध्ये यावयास पाहिजे होते. पुरवणी मागण्यांमध्ये ते आले नसेल तर ते द्यावयचे नाही असा अर्थ होतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे, निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे" उत्तर महाराष्ट्राच्या पॅकेजचे, खानदेशच्या पॅकेजचे काय होणार आहे ते समजत नाही. पण गाजावाजा करुन कोकणातील लोकांच्या अपेक्षा उंचावण्यासारखे पॅकेज घोषित केले आहे. त्यानंतर निवडणुकीमध्ये काय झाले हा भाग सोडून द्यावा. परंतु या पॅकेज अंतर्गत 5,232 कोटींचे घबाड या वर्षी द्यावयाचे आहे. त्याची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली नाही ती अन्य कोणत्या मार्गाने पूर्ण केली जाणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोकण पॅकेज अंतर्गत प्रवासी जेट्टीकरिता 13.25 कोटी, खाडीतील गाळ काढण्यासाठी ड्रेजर खरेदीसाठी 20 कोटी, साकव बांधकाम व दुरुस्तीकरिता 39.50 कोटी निधी पूरक मागण्यांमध्ये आलेला आहे, मंजूर झालेला आहे. हा निधी देखील वितरित करण्यात येईल. राज्य शासनाने कोकणासाठी विशेष पॅकेज जाहीर केलेले आहे. यामध्ये विविध विभागांच्या मार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या निवेदनातील परिच्छेद क्र.4 मध्ये नमूद केलेले आहे. तोही निधी याच वर्षी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या पुस्तकातील पान क्रमांक 23 व 33 मध्ये केवळ कोकणातील कामाची नोंद दिसून येते. अन्य कोणत्याही ठिकाणी कोणत्याही कामासाठी केलेल्या तरतुदीची नोंद दिसून येत नाही. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी निवेदनात नमूद केले आहे त्या कामांसाठी कोणत्या मार्गाने निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. कारण शासनाचे स्पष्ट आदेश आहेत की, या कामासाठी डीपीडीसीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन घ्यावा. परंतु डीपीडीसीकडे अल्प निधी आहे. या कामांसाठी वेगळा निधी पुरवणी मागण्यांद्वारे उपलब्ध झालेला नाही, शासन हा निधी कोणत्या मार्गाने उपलब्ध करुन देणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे काही कामांसाठी पुरवणी मागण्यांद्वारे पूर्णपणे निधी उपलब्ध केलेला आहे. हा सर्व निधी जिल्हा नियोजन मंडळामार्फत घ्यावयाचा असला तरी त्याबाबतच्या जी.आर.मध्ये तसा उल्लेख आहे. कोकणातील पॅकेजचा 3 वर्षांचा कालावधी आहे. या पॅकेजकरिता यावर्षी खर्च करावयाचा आहे, त्यासाठी 100 टक्के निधी उपलब्ध

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.सुनील तटकरे....

करुन देण्यात येईल. अर्थसंकल्पाद्वारे वितरित करण्यात येईल. तसेच पुरवणी मागण्यांद्वारे हा निधी प्रस्तावित केलेला आहे, तोही निधी देण्याची व्यवस्था होईल.

डॉ.दीपक सावंत: सभापती महोदय, कोकणातील पॅकेजसाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिलेला आहे असे सन्माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत. त्यांनी आम्हाला पुरवणी मागण्यांच्या पुस्तकातील बाब क्रमांक, पान क्रमांक, मागणीचे मुख्य शीर्ष सांगावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ही माहिती माझ्याजवळ उपलब्ध नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमच्याकडे पुरवणी मागण्यांचे पुस्तक आहे. आम्ही मंत्रिमहोदयांना माहिती देतो की, यामध्ये कोकण पॅकेजसाठी काहीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती : मंत्रिमहोदय उत्तर देण्यासाठी उभे राहिले आहेत, सन्माननीय सदस्यांनी त्यांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदय ठामपणे उत्तर देऊन खाली बसले आहेत. त्यांना पुरवणी मागण्या कोणत्या आहेत ते पाठ असावयास पाहिजे. त्यांनी आम्हाला कोणत्या बाबीच्या अंतर्गत तरतूद केली आहे ते सांगावे. त्यांना ही माहिती नाही असे कसे म्हणता येईल ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सभागृहामार्फत निश्चितपणे सांगत आहे की, कोकणाच्या कालबध्द कार्यक्रमासाठी विविध विभागांमार्फत घेण्यात आलेल्या कामांसाठी निधी प्रस्तावित केला आहे तो निधी यावर्षी उपलब्ध होईल. या निवेदनातील परिच्छेद क्रमांक 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे यावर्षी अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे निधी दिला जाणार आहे तो उपलब्ध करुन करण्याची शासनाची जबाबदारी आहे. काही कामांसाठी पुरवणी मागण्यांद्वारे निधी मिळाला पाहिजे तोही निधी दिला जाईल. दिनांक 31 मार्च पूर्वी खर्च करावा लागतो, त्यासाठी योग्य ते नियोजन केले जाईल.

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

यानंतर श्री.शिगम

श्री. राजन तेली : तीन बाबीसाठी पैसे मिळतील असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आता कोकणामध्ये साकव, जोडरस्ते अशा प्रकारच्या ज्या कामासाठी निविदा मागविलेल्या आहेत त्या कामासाठी या वर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?तसेच कोकणासाठी करावयाच्या एस.एस.सी. आणि एच.एस.सी.बोर्डाला मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे. तेव्हा त्यासाठी देखील निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

श्री. सुनील तटकरे : या संदर्भात प्रधान सचिव नियोजन यांच्या स्तरावर आढावा बैठक होणार आहे. तरी सुध्दा मंत्री म्हणून या बाबींचा आढावा मी निश्चितपणे घेईन. हा आढावा घेत असताना ज्या योजनांची अंमलबजावणी 31 मार्च अखेर करावयाची आहे त्या सर्व योजनांना आवश्यक असणारी तरतूद वितरित करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे एकमेव मंदिर असून त्यासाठी 1 कोटी रुपये देण्याचे शासनाने प्रस्तावित केलेले आहे. परंतु त्यासाठीची तरतूद या वर्षीच्या पुरवणी मागण्यामध्ये केलेली नाही. तेव्हा ही 1 कोटी रुपयाची तरतूद कोणत्या पध्दतीने करण्यात येणार आहे ?

श्री. सुनील तटकरे : सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर व किल्ल्याचे नुतनीकरण व मजबुतीकरणासाठी 1 कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. संबंधित विभागाकडून यासंबंधीचा प्रस्ताव मागवून घेण्यात येईल. त्यामध्ये मी स्वत: लक्ष घालीन. आवश्यकता लागली तर सी.एफ मधून हा निधी उपलब्ध होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नवी मुंबईत सिडको प्रशासनाने बिल्डर्सना गैरमार्गाने भूखंड देणे

मु. शी.: नवी मुंबईत सिडको प्रशासनाने बिल्डर्सना गैरमार्गाने भूखंड देण्यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबईत सिडको प्रशासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना अद्याप साडेबारा टक्के दराने द्यावयाचा मोबदला पूर्ण स्वरुपात दिलेला नसतांना काही मोठ्या बिल्डर्सना गैरमार्गाने मोक्याच्या ठिकाणचे भूखंड देणे, भूपेश शाह नावाच्या एका मोठ्या बिल्डरने रायगड जिल्ह्यातील काही जमीन स्वस्त भावात खरेदी करणे, त्या मोबदल्यात साडेबारा टक्क्याच्या निकषात बसत नसतानांही सी.बी.डी. बेलापूर येथील भूखंड सिडकोकडून मिळविणे, नियमाप्रमाणे सदर भूखंड सी.बी.डी. ऐवजी रायगड जिल्ह्यात देणे आवश्यक असताना सी.बी.डी बेलापूर मध्येच सदर भूखंड भूपेश शाह यांना देण्यात येणे तसेच सदर भूखंड शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याचा भास निर्माण करणे, या बिल्डरने तेथील संपूर्ण डोंगरच व तेथील झाडे तोडून जे.सी.बी. मशीन लावून जमीन सपाटीकरण करण्याचे काम रात्रंदिवस सुरु ठेवणे, नैसर्गिक संपत्ती तसेच पर्यावरणाच्या होणाऱ्या हानीकडे स्थानिक राजकीय पुढारी तसेच सिडको प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, नैसर्गिक साधनसंपत्तीची होत असलेल्या हानीमुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाचे वातावरण, या प्लॉटची बाजारभावाप्रमाणे एक लाख रुपये मीटर याप्रमाणे ५ हेक्टरची किंमत ५०० शुल्कही अत्यंत कमी प्रमाणात शासनाच्या महसूलात जमा होणे, त्यामुळे शासनाचे झालेले करोडो रुपयांचे नुकसान तसेच पर्यावरणाची कधीही भरुन न निघणारी हानी, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : नवी मुंबई प्रकल्पासाठी शासनाने ज्यांची जमीन संपादित केलेली आहे त्या जमीन मालकांना साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप करण्याचे शासनाचे धोरण होते. जवळपास 500 हेक्टर जमिनीचे वाटप व्हायचे बाकी होते. प्रकल्पग्रस्त शेतक-यांना साडेबाराटक्के जमिनीचे वाटप अजूनपर्यन्त करण्यात आलेले नाही. मात्र कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार करुन बिल्डर्सना मोक्याचे भूखंड देण्यात आलेले आहेत. साडेबारा टक्के योजनेप्रमाणे भूखंड देण्याबाबत खारघर, कामोठे व उलवे येथील जमिनीबाबत सिडकोने तपासणी केली. मात्र श्री. मुंदरा व इतर यांना पात्र असलेले क्षेत्र जास्त असल्याने इतक्या मोठया प्रमाणात एकत्रितरित्या क्षेत्र देणे सिडकोस शक्य नाही, असे निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. या ठिकाणी साडेबारा टक्के योजनेप्रमाणे आतापर्यन्त किती शेतक-यांना भूखंड दिले ? बिल्डर्सना अतिशय अल्पदरात भूखंड देण्यात आले. त्यांनी स्टॅम्पडयुटी भरलेली नाही. भूपेश शाह या बिल्डरला नियमाप्रमाणे रायगडमध्ये भूखंड द्यावयास पाहिजे होता. परंतु तसे न करता तो सी.बी.डी..बोलापूरमध्ये दिला गेला. यासंदर्भात सदर भूखंडावर विकास कामे करण्यासाठी प्रारंभ प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेने दिलेले आहे. सदर भूखंडाचे क्षेत्र मोठे असल्यामुळे जोत्यापर्यंत बांधकाम करण्यापूर्वी पर्यावरण ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्याची अट विकासकांना नवी मुंबई महानगरपालिकेने घातली आहे. उपरोक्त विकास कामांकरिता दिलेल्या परवानग्यामध्ये नमूद अटी/शर्तींचा भंग होत आहे अगर कसे किंवा कोणतेही काम विनापरवानगी होत आहे अगर कसे व त्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे अगर कसे याबाबत चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. सभापती महोदय, हे अगर कसे, अगर कसे काय चालवले आहे ? सिडको प्रशासन बिल्डरवर एवढे मेहरबान का झाले ?

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुद्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी तीन अत्यंत महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा होता की ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांपैकी एकूण किती शेतकऱ्यांना आतापर्यंत शासनाने 12.5 टक्के विकसित जमिनी दिल्या ? त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, जवळपास 37897 शेतकऱ्यांना 12.5 टक्क्याप्रमाणे 1064 हेक्टर जमीन परत द्यावयाची आहे. त्यापैकी 917 हेक्टर जमीन ही 32033 शेतकऱ्यांना शासनाने दिलेली आहे. अशा प्रकारे 86 टक्के शेतकऱ्यांना ठरल्याप्रमाणे विकसित जमिनी देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित 146 हेक्टर एवढी जमीन 5826 शेतकऱ्यांना देण्याचे बाकी आहे.

महोदय सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न अत्यंत मुलभूत असा आहे. तो म्हणजे रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची जमीन घेतलेली आहे म्हणून त्यांना त्याच ठिकाणी जमीन देणे आवश्यक असताना दुसऱ्याच ठिकाणी का दिली ? त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, ही गोष्ट सुध्दा खरी आहे. रायगडमध्ये जमीन संपादित केल्यानंतर त्याच नोडमध्ये जमीन प्रकल्पग्रस्तांना दिली पाहिजे आणि अशा प्रकारचा शासनाचा प्रचलित नियमही आहे. परंतु त्या नोडमध्ये जागा मिळाली नाही तर लगतच्या नोडमध्ये जागा देण्यासंबंधीचे धोरण प्रस्तावित केलेले आहे. त्या अनुषंगाने मी असेही सांगणार आहे की तेथे एक टेकडीचा भाग होता. त्या ठिकाणी ही जागा संबंधित शेतकरी आणि ट्राय पार्टी यांच्यामध्ये ॲग्रीमेंट झालेले आहे व त्यानुसार ती जागा विकासकाला देण्यात आली आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, हा टेकडीचा जो भाग आहे याचा अर्थ ती जमीन टेकडीची असल्यामुळे त्याची लेव्हल करण्याचा निर्णय विकासकाला घ्यावा लागला. हे काम करीत असताना नवी मुंबई महापालिकेच्या एक गोष्ट लक्षात आली की, या ठिकाणी अशा प्रकारचे काम करीत असताना त्यासंबंधी आवश्यक असणाऱ्या कायदेशीर परवानग्या घेण्याची गरज आहे तशा परवानग्या विकासकाने घेतल्या की नाही याची विचारणा महानगरपालिकेने विकासकाकडे केली आहे. कारण बांधकामासाठी जी परवानगी तो मागत आहे ती देत असताना पर्यावरणाचेही क्लिअरन्स सर्टिफिकेट उपलब्ध करावे आणि नंतरच पुढील कार्यवाही करावी असे महापालिकेच्या वतीने त्याला सांगण्यात आले त्यायाबाबतची चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय विकासकाची जरा जास्तच बाजू घेत असल्याचे दिसून येते. ते अशी बाजू का घेत आहेत हे मला समजत नाही. वसई-विरारसारख्या भागात जागा मिळत नाही म्हणून कांदिवली आणि बोरिवलीत जागा द्यावयाची हा कुठला नियम शासनाने लागू केला आहे. कुठल्या गणेशाचा यांच्यावर आशीर्वाद आहे, कोणता गणपती यांना पावला आहे. वसई-विरार भागात जागा मिळत नाही म्हणून मुलुंड-विक्रोळी मध्ये आपण जागा देत अहात याचा अर्थ यामध्ये सरळसरळ नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसते. अशा प्रकारे आपल्याच माणसाला कोणाला तरी फायदा व्हावा म्हणून हा प्रकार करण्यात आल्याचे दिसून येते. म्हणून या प्रकरणाची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, शासनाने पर्यायाने मी सुध्दा कबूल केले की, एका विशिष्ट नोडमध्ये जागा देण्याचे शासनाचे धोरण आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, खारघरमध्ये भरपूर प्रमाणात जागा पडून आहे. तेथे या शेतकऱ्यांना का जमीन देण्यात आली नाही?

श्री. भास्कर जाधव : महोदय, ज्या भागातील जमीन संपादित केली त्याच नोडमध्ये जागा दिली पाहिजे ही गोष्ट खरी आहे. परंतु तेथे जागा उपलब्ध नसल्यामुळे दुसरीकडे दिली असल्याचे मी सांगितले. आपण म्हणालात नवी मुंबईमध्ये भरपूर जागा उपलब्ध आहे. माझी विनंती आहे की, आपण अशी जागा दाखवून देणार असे गृहित धरले पाहिजे. या अनुषंगाने चौकशी करणार काय असेही त्यांनी विचारले आहे. यात प्रामुख्याने दोन तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो. तो म्हणजे एकाच दिवशी ट्राय पार्टी ॲग्रीमेंट, एकाच दिवशी मानयता असा जो प्रकार आहे त्यासंबंधी नगरविकास विभागाचे सचिव-1 यांच्यामार्फत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येईल आणि तोपर्यंत हे काम थांबविण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, समजा माझी एक एकर जमीन एक कोटी किमतीची असेल आणि मला जर त्यातील 12.5 टक्के हिस्सा पाच हजार एकर जमिनी प्रमाणे मिळणार असेल तर ते बरोबर होईल काय ? मला जर पाच हजार एकर किमतीच्या जमिनी पैकी 12.5 टक्के देणार असेल तर आपल्याला ते योग्य वाटते काय? जी जमीन विकसीत झालेली आहे त्या विकसीत जमिनीच्या कोप-याचा हिस्सा शेतक-याला मिळाला पाहिजे असा हिस्सा आपण शेतक-याला देणार आहात काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, पूर्वी ज्या जमिनी ॲक्वायर झाल्या त्यावेळेला शेतक-यांना यातील काही जमिनी परत देण्याचा निर्णय झाला नव्हता. परंतु 1990-94 मध्ये शेतक-यांना 12.5 टक्के जमिनी परत देण्याचा निर्णय झाला होता त्यामुळे काही बाबतीत अशा प्रकारची अडचण निर्माण होऊ शकते.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या मताशी मी 100 टक्के सहमत आहे. श्री. भूपेश शाह हा किती मोठा विकासक आहे, नव्या मुंबईमध्ये या विकासकाने किती विकास केलेला आहे याची माहिती शासनाने घेतलेली आहे काय ? तसेच नव्या मुंबईमध्ये डोंगराच्या जागेला जास्त किंमत आहे. त्यामुळे या विकासकाला रायगड जिल्यात जमीन देण्याऐवजी नव्या मुंबईतच का दिली ? माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाला या प्रकरणाची माहिती नाही, ही सिडकोने दिलेली आहे. परंतु या विकासकाला जी नियमबाहय जागा दिलेली आहे ती त्वरित रद्द करुन, ज्या अधिका-यानी या विकासकाला मुंबईतील जागा दिलेली आहे त्या अधिका-यावर शासनाकडून कडक कारवाई केली जाणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एकंदरीत दोन प्रश्न विचारले आहे. जो विकासक आहे त्याने मुंबईत किती विकास केला आहे असा प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे या लक्षवेधी सूचनेच्या प्रश्नाशी त्याचा काही संबंध येत नसल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर देणे मला उचित वाटत नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे की, चुकीचा निर्णय करणारे जे अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ? यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, नगर विकासाचे प्रधान सचिव (1) यांच्या मार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

येईल. जेव्हा नगर विकास विभगाचे प्रधान सचिव या प्रकरणाची चौकशी करतील तेव्हा ती सर्वंकष चौकशी होईल. या चौकशीमध्ये जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, एका बिल्डरला एक जिल्हा बदलून दुस-या जिल्हयात जागा दिलेली आहे. यासंदर्भात जो काही निर्णय झाला आहे त्याची नोंद शासन जरुर नोंद घेईल. परंतु सामान्य माणसाने अशा प्रकारे जागा बदलून मागितली तर शासन त्याला जागा बदलून देईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, झाडे जगवा,झाडे लावा या योजनेसाठी आपण पैसे खर्च करीत असतो त्यामुळे या प्रकरणी डोंगरावरील झाडे मोठया प्रमाणात तोडण्याची आणि पर्यावरणाचा -हास करण्याची जी धमक बिल्डरने दाखवली ती धमक कोणाच्या विश्वासाने केली आहे याबाबत काय कारवाई करणार आहात याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय ?.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, ही जागा बिल्डरला देण्यात आलेली नाही. मुळ मालक श्री. मुंद्रा यांनाच ही जागा देण्यात आली होती. तसेच सन्माननीय सदस्यांनी झाडे कापण्याच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, झाडे कापण्याच्या संदर्भात परवानगी लागते त्यामुळे यासंदर्भात पर्यावरण विभागाचा दाखला मागवण्यात आलेला असून हा भाग सुध्दा चौकशी मध्ये येणारच आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मी दोनच प्रश्न विचारु इच्छितो. या प्रकरणाची नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत चौकशी केली जाणार आहे त्यामुळे जोपर्यंत सचिवांची चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत या विकासकाला कोणतेही काम करु न देण्याची तसेच सर्व त्याचे सर्व व्यवहार स्थगित केले जाणार आहे काय ? तसेच त्या भागात ज्यांच्या जमिनी गेल्या, त्यात 12.5 टक्के पात्र असणा-या भुखंड धारकांना जमिनी परत मिळालेल्या आहेत काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी असा प्रश्न विचारला की , सामान्य माणसाला अशा प्रकारे जागा देणार आहात काय ? त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, श्री.मुंदडा हा सामान्य शेतकरी असून त्याने ट्रायपार्टी ॲग्रिमेन्ट केले होते त्याचबरोबर सचिव (1) यांच्याकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे तोपर्यंत तेथे जे काम करण्यात येत आहे त्याला स्थगिती दिली जाणार आहे. या बाबतीत देखील मी या पूर्वीच उत्तर दिलेले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी :. नाशिक महानगरपालिकेतील जकात विभागात होत असलेला गैरव्यवहार

मु.शी.: नाशिक महानगरपालिकेतील जकात विभागात होत असलेल्या गैरव्यवहारासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जयप्रकाश छाजेड (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेघू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विंनंती करतो.

"गेल्या अनेक वर्षापासून नाशिक महापालिकेच्या जकात विभागात कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी, एजंट, व्यापारी व उद्योजक दरवर्षी कोटयावधी रुपयांचा करीत असलेला घोटाळा जकात विभागाच्या भरारी पथकाने दिनांक 28 ऑक्टोबर 2009 वा त्या सुमारास उघडकीस आणणे, मुंबई, पुणे इत्यादी मोठया शहरातून कपडे, इलैक्ट्रॉनिक्स वस्तू, स्टील या सर्व मालावर 1 ते 7 टक्क्यापर्यत वर्गवारीनुसार जकात आकारली जाणे, वाहनांच्या नंबरची सेटींग लावून ही वाहने जकात नाक्यांवरुन विनाजकात सोडून देऊन पूर्ण जकात बुडविणे, वाहनांमध्ये असलेल्या मालाच्या फक्त पाच - दहा टक्के जकात भरुन जकात चोरी करणे, तसेच बनावट पावती पुस्तके छापून जकातीचे पैसेवसूल करणे, नुकतीच या बनावट पावती पुस्तके छापणा-या प्रिटींग प्रेसवर धाड घालूनही या प्रकरणात कोणालाही अटक न करता कोणतीही कारवाई न होणे, अशा प्रकारे मोठया प्रमाणात दरवर्षी कोटयावधी रुपयांचे शासनाचे होत असलेले नुकसान, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, नाशिक महापालिकेच्या जकात विभागातील घोटाळयाची सखोल चौकशी करुन यात दोषी असलेल्याविरुध्द तातडीने कठोर कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री):सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे .

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड :सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेच्या जकात विभागामध्ये गेल्या कित्येक वर्षापासून भ्रष्टाचाराचे प्रकार सुरु आहेत. एका प्रिन्टीगप्रेसमध्ये जकातीच्या बनावट पावत्या छापल्या जात होत्या अशी माहिती महानगरपालिकेला मिळाल्यानंतर महानगरपालिकेचे अधिकारी तेथे गेले व याबाबतीत त्यांनी चौकशी केली. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की , हा प्रकार अधिका-यांनी शोधून काढलेला नाही. पहिल्या प्रिन्टीग प्रेसमधील एक नोकर तेथून दुसरीकडे बदली होऊन गेला तेव्हा त्याला असे कळले की, त्या ठिकाणी बनावट जकातीच्या पावत्या छापल्या जात आहेत. त्याच्या मार्फत ही गोष्ट उघडकीस आलेली आहे एवढेच नव्हे तर काल महानगरपालिकेचे जकात विभागातील अधिकारी जकातीसंबंधी लाच घेत असतांना ॲन्टी करप्शन विभागाने पकडले होते. नाशिक सारख्या विकसित शहरामधील जकातीच्या रकमेमध्ये फ्रॉड होत असून त्यासंबंधी वर्तमानपत्रात रोज बातम्या छापून येत आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या नगरसेवकामध्ये असंतोषाची भावना आहे. मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की ,या प्रकरणाची चौकशी पोलीस खात्याकडे देण्यात आली होती परंतु त्यांनी योग्य पध्दतीने चौकशी केलेली नाही. त्यांनी फक्त प्रिन्टीग प्रेसाच्या मालकाला पकडले होते या बनावट जकातीच्या पावत्या ज्याने छापावयास दिल्या होत्या त्याचे नाव पोलीस सहजगत्या मिळवू शकले असते. परंतु त्यांनी हे नाव शोधले नाही. या पावत्या छापावयास देणारा कोणी तरी अतिरेकी असावा असे समजून त्याचे रेखाचित्र काढण्यात आले होते व ते प्रसिध्द करण्यात आले होते. सन्माननीय मंत्री तरुण व तडफदार असून भ्रष्टाचाराविरुध्द संघर्ष करणारे मंत्री आहेत या पूर्वी सभागृहात सदस्य असतांना प्रत्येक भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची ते मागणी करीत होते. तेव्हा या प्रकरणाची देखील त्यांनी योग्य पध्दतीने सखोल चौकशी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे. सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेने शासनाला एक पत्र पाठवून अशी मागणी केली होती की , या सर्व प्रकरणाची सीआयडी किंवा सीबीआय मार्फत चौकशी करण्यात यावी त्याप्रमाणे या प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे वा सीबीआयकडे देण्यात येणार आहे काय ? महानगरपालिकेच्या ठरावामध्ये आणि शासनाला लिहिलेल्या पत्रात त्यांनी असे म्हटले होते की, ही चोकशी पूर्ण होण्याच्या आत त्या विभागात काम करणारे जे कर्मचारी आहेत

श्री.जयप्रकाश छाजेड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांची बदली दुस-या विभागात करण्यात यावी परंतु अजूनही आयुक्तांनी त्यांची बदली दुसरीकडे केलेली नाही तेव्हा या कर्मचा-याची बदली दुस-या विभागात करण्याबाबत शासन आयुक्तांना आदेश देणार आहे काय ? त्याचबरोबर भ्रष्टाचाराचे मूळ शोधण्याकरिता पाच वर्षा पेक्षा जास्त `वर्षे त्या विभागात काम करणारे जे कर्मचारी व अधिकारी आहेत त्यांच्याकडे स्त्रोता पेक्षा अधिक संपत्ती दिसून येते त्यांची ॲन्टी करप्शन मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. छाजेड यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्याचबरोबर या निवेदनामध्ये जी माहिती नाही ती अधिकची माहितीसुध्दा त्यांनी या ठिकाणी दिलेली आहे. निवेदनात दिलेल्या माहिती प्रमाणे महानगरपालिकेमध्ये काम करणा-या कर्मचा-यांनाच ही माहिती मिळाली होती आणि त्यांनी हा छापा टाकला होता .परंतु सन्माननीय सदस्यांनी अशी अधिकची माहिती दिली होती की,बदली होऊन गेलेल्या एका कर्मचा-याला माहिती मिळाली असल्यामुळे हा छापा टाकण्यात आला होता. ही अधिकची माहिती तपासून पाहण्यात येईल सन्माननीय सदस्यांनी दुसरा असा प्रश्न उपस्थित केला की, या संदर्भात सीबीआय किंवा सीआयडीकडे चौकशी देण्यात येणार आहे काय ? त्याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नाशिक महानगरपालिकेने ठराव करुन शासनाकडे पाठविलेला असून त्यात तसे म्हटलेले आहे ही गोष्ट खरी आहे. हया चौकशीचे काम तेथील गुन्हे अन्वेषण शाखेकडे दिले असून मला असे दिसून येत आहे की, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा योग्य पध्दतीने चौकशी करीत असून या चौकशीसाठी त्यांनी 20 जणांची नेमणूक केलेली आहे. आतापर्यंत जवळजवळ 15 हजार पावत्या तपासून पाहण्यात आल्या आहेत. या सर्व बनावट पावत्या चलनामध्ये आल्या आहेत काय आणि चलनामध्ये या पावत्या येऊन त्याचा गैरव्यवहार झाला आहे काय हे तपासून पाहण्याचे काम सुरु आहे.त्यामुळे सीआयडीकडे या प्रकरणाची चौकशी देण्याची आजच आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, त्या ठिकाणच्या गैरव्यवहाराची चौकशी करीत असतांना तेथे काम करणारे कर्मचारी जर

6..

श्री.भास्कर जाधव.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महानगरपालिकेच्या त्याच विभागात राहिले तर चौकशीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात त्याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की , त्या विभागातील कर्मचा-यांची बदली दुसऱ्या विभागात करण्याच्या दृष्टीने आदेश देण्यात येतील.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

त्यानंतर त्यांनी असाही प्रश्न विचारला आहे की, तेथील कर्मचाऱ्यांनी आपल्या नियमित स्रोतातून मिळणाऱ्या मालमत्तेपेक्षा किती तरी पटीने मालमत्ता वाढवून ते गब्बर झालेले आहेत तर त्यांची अँटी करप्शन खात्याकडून चौकशी करणार काय ? सभापती महोदय, मी याबाबत आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, आपण या बाबतीत काही नावे दिली तर,.. कारण अशा संशयावरून सरसकट सगळ्याच कर्मचाऱ्यांची चौकशी करणे अवघड वाटते. त्यामुळे त्यांनी काही स्पेसिफिक नावे दिली तर आपण त्या मार्गाने त्यांची चौकशी करण्याचा प्रयत्न करू.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आता माननीय राज्यमंत्र्यांनी जे निवेदन दिलेले आहे त्यात जेव्हा महानगरपालिकेसारखी संस्था स्वत:हून याची चौकशी सीआयडी अथवा सीबीआय कडून व्हावी अशी मागणी करते अशा वेळी त्याबाबत निर्णय घेण्यासाठी आणखी आपणास कशाची वाट पहावी लागते आहे ? या प्रकरणी स्थानिक पोलीस पातळीवरून चौकशी सुरू होणार आहे त्यातून फारसे काही निष्पन्न होण्याची शक्यता फार कमी आहे, शिवाय त्यात वेळही जाणार आहे. त्यामुळे अधिक वेळ जाऊ नये म्हणून हे प्रकार ताबडतोब थांबवून आपण याची चौकशी सीआयडी अथवा सीबीआयकडून करणे योग्य वाटते. तर त्या दृष्टीने शासन कारवाई करील का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. शासन यामध्ये उशीर का करते असे त्यांनी विचारले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पहिल्यांदा 11.12.2009 रोजी महानगरपालिकेच्या जनरल बॉडीची बैठक झाली आणि त्यात ठराव झाला की, या प्रकरणाची चौकशी सीआयडी वा सीबीआय कडून करण्यात यावी आणि त्यांनी तो ठराव 19.12.2009 रोजी शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे यामध्ये शासनाने निर्णय घेण्यास अजिबात वेळ लावलेला नाही. सभापती महोदय, प्रश्न विचारणारे दोन्ही सनमाननीय सदस्य नाशिकचे आहेत आणि त्यांच्या म्हणण्याचा होरा असा दिसतो आहे की, या एकूणच प्रकरणाचा आवाका पाहता ही चौकशी सीआयडी वा सीबीआयकडून केली जावी. तर शासन याबाबत सीआयडी कडे ही चौकशी देईल इतकेच मी येथे सांगतो.

***

..... एलएल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मौजे तमदगले (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कु.मेधा तानाजी कांबळे या दलित मुलीवर झालेला बलात्कार व त्या नंतर तिचा झालेला मृत्यू.

मु.शी. : मौजे तमदगले (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कु.मेधा तानाजी कांबळे या दलित मुलीवर झालेला बलात्कार व त्या नंतर तिचा झालेला मृत्यू या संबंधी सर्वश्री राम पंडागळे, रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मौजे तमदगले (ता.शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील कु.मेधा तानाजी कांबळे, 17 वर्षीय युवतीने सी.इ.टी. परीक्षा दिली असल्याने दिनांक 11 मे 2009 रोजी वा त्या सुमारास निकाल आणावयास कोल्हापूर येथे गेली असता त्याच गावातील गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनी बलात्कार करून रात्री 11.45 वाजता घरी सोडणे, सदर घटनेबाबत युवतीचे वडील जयसिंगपूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंद करावयास गेले असता त्यांची तक्रार दाखल करून न घेणे, त्याच दरम्यान सदर युवतीचा मृत्यू होणे, याबाबत दलित समाजाच्या लोकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ..)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचना क्र.3 बाबत मा.गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, कु.मेधा तानाजी कांबळे ही 17 वर्षीय दलित मुलगी तालुका शिराळा, जिल्हा कोल्हापूर येथे् सीइटी परीक्षा देण्यासाठी गेली असता संध्याकाळी जेव्हा ती घरी आली तेव्हा श्री.विनोद सुतार आणि विनोद जगदाळे या तरूण मुलांनी तिला जीपमध्ये टाकून तिच्या घरी आणून सोडले. त्यानंतर त्या मुलीने आपल्या आई-वडिलांकडे तक्रार केली की, मी जेव्हा सीइटी परीक्षा देण्यासाठी म्हणून गेले तेव्हा गावातील दोन गुंडांनी माझा पाठलाग केला आणि त्यांनी मला पकडून शेतामध्ये नेऊन माझ्यावर बलात्कार केला. त्यानंतर ती मुलगी घरात बेशुद्ध पडली. त्यानंतर गावातील दलितांनी तिला पोलीस ठाण्यावर आणले तेव्हा तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी ताबडतोबीने त्याबाबतचा गुन्हा नोंदवून घेण्याऐवजी त्या मुलीला तुम्हीच दवाखान्यात घेऊन जा असे सांगितले. त्याप्रमाणे तिला दवाखान्यात नेत असताना रस्त्यातच त्या मुलीचा मृत्यू झाला. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ज्यावेळेस एखादी मुलगी वा एखादी व्यक्ती दुरावस्थेमध्ये पोलीस ठाण्यामध्ये जाते तेव्हा ताबडतोबीने तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीला वा त्या मुलीला दवाखान्यात घेऊन जाणे हे त्या पोलीस अधिकाऱ्यांचे प्रथम कर्तव्य असते. परंतु या प्रकरणात तसे न केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई केलेली आहे ? तसेच त्या मुलीवर जो बलात्कार झालेला आहे असे सांगितल्यानंतर त्याप्रमाणे गुन्ह्याची नांद केली गेली आहे काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, त्या मुलीवर बलात्कार झालेला आहे काय असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला आहे तर त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या मुलीवर बलात्कार झाला नसून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तसा दाखला दिलेला आहे. सदर मुलगी वय वर्षे 17, मेधा तानाजी कांबळे ...

(यानंतर श्री.सरफरे ...एमएम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे...

ही मुलगी 11 मे रोजी सकाळी कॉलेजला सीईटीचा निकाल आणण्यासाठी गेली होती हे खरे आहे. त्याचप्रमाणे सचिन नावाच्या आरोपी मुलाबरोबर त्या मुलीचे गेल्या तीन महिन्यापासून संबंध होते. त्यामुळे ती त्याच्याबरोबर कऱ्हाडला फिरायला गेली होती. त्या मुलाचे वडील श्री. विलास महादेव सुतार आणि श्री. विनोद सुतार यांनी त्या मुलीला तिच्या आईच्या घरी आणून सोडले. आणि सांगितले की, तुमची मुलगी माझ्या मुलाबरोबर कऱ्हाडला गेली होती, तिला आता तुम्ही संभाळा. त्यावेळी मुलीच्या घरी तिची आई व बहिण होती. त्यांनी सांगितले की, मुलीचे वडील घरी नाहीत, ते येईपर्यंत तुम्ही थांबा. थोडया वेळाने मुलीचे वडील घरी आल्यानंतर त्या मुलीच्या वडिलांनी मुलाच्या वडिलांना सांगितले की, ही मुलगी तुमच्या घरी घेऊन जा. या मुलीला आम्ही आता घरामध्ये घेणार नाही. असे म्हणून त्यांनी त्या मुलीला घरामध्ये घेण्यास नकार दिला. हा वाद सुरु असतांना त्या मुलीने घरामधील इंडोसल्फाईन नावाचे किटकनाशक प्राशन केले. त्यानंतर ती मुलगी बेशुध्द पडली. त्या मुलीला घेऊन पोलीस चौकीवर नेले असता ती मुलगी बेशुध्द पडली.. हे पाहिल्यानंतर पोलीस चौकीवरील हवालदार श्री. शिंदे यांनी त्या मुलीला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार करण्यासाठी नेले. तेथील डॉक्टर्सनी त्या मुलीची तपासणी केल्यानंतर ती मृत झाल्याची नोंद केली. या प्रकरणी मुलीला पळवून नेणे, संगनमताने आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त करणे अशाप्रकारचे गुन्हे मुलाचे वडील आणि भावाविरुध्द पोलीस चौकीमध्ये दाखल करण्यात आले आहेत. अशाप्रकारे कलम 306, 363, 34 प्रमाणे गुन्हे दाखल करुन यामध्ये मुलगी मागासवर्गीय व मुलगा सवर्ण असल्यामुळे दलित अत्याचार कायद्यातील तरतुदी सुध्दा त्याठिक्राणी लावण्यात आल्या आहेत. अशाप्रकारे गुन्हेगारांवर केस दाखल करुन त्यांचा सहा दिवसांचा रिमांड घेऊन त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे. अशाप्रकारची कारवाई झाली आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर त्या मुलीचे वडील पोलीस स्टेशनला गेले त्यावेळी पोलीस स्टेशनमध्ये प्रथमदर्शनी तक्रार कां नोंदविण्यात आली नाही?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, त्या मुलीचे वडील ज्यावेळी पोलीस चौकीमध्ये गेले त्यावेळी ती मुलगी बेशुध्द पडली.त्यावेळी पोलिसांनी या मुलीवर प्रथम दवाखान्यात उपचार करु या. त्यानंतर तुमची तक्रार दाखल करु घेऊ असे सांगितले.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या दलित मुलीवर बलात्कार करण्यात आला आहे. परंतु याठिकाणी गृह खात्याने या संपूर्ण प्रकरणाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राम पंडागळे....

मुलीचे प्रेम प्रकरण होते असे याठिकाणी सांगण्यात आले. त्यासंबंधीचा कोणताही पुरावा आपल्यासमोर आलेला नाही. त्या मुला-मुलींचे फोटो किंवा प्रेमपत्र आपणाकडे आहेत काय? दुसरा प्रश्न असा की, पोलिसांनी यामध्ये बलात्कार झालेला नाही अशाप्रकारचा अहवाल दिला आहे. सभापती महोदय, अशाच प्रकारे चेंबूर येथे बौध्द भिक्षूला फाशी देऊन मारण्यात आले असतांना डॉक्टर्सनी आपल्या पोस्ट मार्टेम रिपोर्टमध्ये चुकीचा निष्कर्ष दिला. त्याबाबत चौकशी केल्यानंतर त्यांना फाशी देण्यात आल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला होता. आणि म्हणून या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी. चौकशी झाली पाहिजे. आपण जर प्रेमप्रकरण म्हणत असाल तर तसा पुरावा सभागृहाला दाखवा. या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत पुन्हा चौकशी करुन बलात्काराचा गुन्हा दाखल करणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, डॉक्टरचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला असून त्यामध्ये बलात्कार झाल्याचा उल्लेख नाही. त्या मुलीने विष प्राशन केल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे आलेला अहवाल आणि पोलीस तपासामध्ये त्या दोघांचे एकमेकांवर प्रेम होते हे निष्पन्न झाले आहे.

(यानंतर सौ.रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची घटना लिहिली आणि या देशातील लोकशाही ही जगामध्ये सर्वात मोठी लोकशाही आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्य घटनेमुळे आज जगामध्ये सर्व आघाडीवर प्रगती करणारा हा देश आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, ज्या समाजाच्या विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आयुष्य खर्ची घातले, पण याठिकाणी जी घटना घडलेली आह, त्यासंदर्भात दिलेले उत्तर वाचल्यानंतर त्यामध्ये संशयाचे वातावरण असल्याचे दिसून येते. 11 मे रोजी घटना घडली आहे. संबंधित मुलीने इन्डोसल्फाईड हे औषध प्यायले होते असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. हे औषध प्यायल्यानंतर तिचे वडील या मुलीला मोटर सायकलवर घेऊन पोलीस स्टेशनमध्ये गेले. सभापती महोदय, आपण मला सांगावे की, इन्डोसल्फाईड औषध प्यायल्यानंतर झटक्यामध्ये माणूस बेशुध्द पडतो. अशा प्रकारे बेशुध्द पडलेल्या व्यक्तीला मोटर सायकलवरुन पोलीस स्टेशनला नेता येते काय ? हे उत्तर वाचल्यानंतर आपल्या काय ते लक्षात येते. 11 मे रोजी घटना घडते, मुलीच्या वडीलांनी एफ.आय.आर.केल्यानंतर त्या तक्रारीमध्ये काय म्हटलेले आहे, ते आपण येथे जाहीर करावे. 11 मे ला घटना घडल्यानंतर 16 जून रोजी संबंधितांना अटक करण्यात आली आहे, म्हणजे याबाबतीत जवळजवळ 25-30 दिवस पोलीस खाते, शासन काय करीत होते ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत सद्यस्थिती काय आहे ? तसेच आपल्याकडे अजून व्हिसेराचा रिपोर्ट आलेला नाही. मला आपल्याला सांगावयाचे आहे की, यामध्ये आम्हाला संशयाची सुई असल्याचे दिसत आहे. तसेच कोणाला तरी पाठिशी घालण्यासाठी अधिकारी व शासन दलितांवर, मागासवर्गीयांवर अत्याचार करीत असेल तर खरोखरच स्वर्गामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आत्म्याला सुध्दा दु:ख झाल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून माझा शासनाला प्रश्न आहे की, या घटनेला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ? तसेच संबंधितांना अटक करण्यासाठी उशीर का झाला ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, 11 तारखेला प्रकार घडला. पण मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ती मुलगी 11 तारखेला निघून ...

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे . . . .

गेली आणि घटनेची तारीख 15 जून असून रात्री 11.50 वाजता ही घटना घडलेली आहे. विशेष म्हणजे सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, बलात्कार झाला. पण त्यासंबंधात फिर्याद दिलेली नाही. संबंधितांनी बलात्काराची तक्रारच दिलेली नसल्यामुळे आणि पळवून नेल्याबाबतची तक्रार असल्यामुळे त्याप्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, हा महत्वाचा विषय आहे. हा दलितांचा प्रश्न आहे. सभापती महोदय, याठिकाणी . . . .

सभापती : माननीय मंत्री महोदय, याबाबतीत नकळत संशयाला कुठेतरी जागा असावी असे वाटते. म्हणून या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होण्यासाठी जर आपण या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत फेर चौकशी केली तर यातील खरी परिस्थिती बाहेर येऊ शकेल. त्यामुळे मला असे वाटते की, शासनाने या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे आणि सन्माननीय सदस्यांनी देखील येथे जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यानुसार या प्रकरणाची फेर चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती : असे नाही.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपल्या विनंतीचा मान ठेऊन, हे प्रकरण सी.आय.डी.कडे चौकशीसाठी देण्यात येईल.

. . . .2 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5 बाबत

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पाच क्रमांकावरील लक्षवेधी सूचनेला माननीय मंत्री श्री.सचिनभाऊ अहेर उत्तर देणार आहेत. परंतु विधानसभेमध्ये ते चौथ्या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेबाबत उत्तर देत आहेत. तेथील लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपल्यानंतर विधान परिषदेमध्ये उपस्थित रहातील, त्यासाठी त्यांना परवानगी द्यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

सभापती : ठीक आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली पाचव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

. . . .2 एन-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापनाने कंपनीत
टाळेबंदी जाहीर करणे.

मु.शी.: कल्याण मोहने येथील नॅशनल रेयॉन
कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापनाने कंपनीत
टाळेबंदी जाहीर करणे याबाबत सर्वश्री
अरविंद सावंत,दिवाकर रावते,अनिल परब,
किरण पावसकर,परशुराम उपरकर वि.स.स.
यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"कल्याण मोहने येथील नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशच्या व्यवस्थापनाने कंपनीत टाळेबंदी जाहिर केल्याने सदर कंपनीच्या कॉलनीमध्ये सुमारे ९८८ कामगारांची कुटुंबे वर्षानुवर्षे रहात असून सदर कॉलनी तोडण्याचा कंपनीच्या व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयामुळे सदर कंपनीच्या वसाहतीत राहणाऱ्या शेकडो कामगार रस्त्यांवर येणे, एनआरसी कंपनीने आपले एक एक प्लॅन्ट बंद करुन कामगारांची केलेली उपासमार व आर्थिक कोंडी, सदर कॉलनीतील पाणी पुरवठ्याचे सात कोटी कल्याण पालिकेची थकबाकी असणे, कामगारांच्या सोसायटीचेही १५ कोटी रुपयांची रक्कम थकविले असणे, तसेच कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचेही कोट्यावधी रुपयांची व्यवस्थापनाकडे असलेली थकबाकी, कंपनीच्या सर्व गैरव्यवहारामुळे कामगारांची रास्त व न्याय कोट्यावधी रुपयांची देणी थकल्याने तेथील हजारो कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

23-12-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) NN-5

APR/ KTG/ SBT/ 13:20

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण ही लक्षवेधी सूचना मान्य केली, त्याबद्दल मी धन्यवाद देतो. हे एक अतिशय गंभीर प्रकरण आहे. एका बाजुला रोजगार उपलब्ध होत नाही. परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कल्याण येथील अंबिवली येथे नॅशनल रेऑन कॉर्पोरेशन 1946 मध्ये स्थापन झाले. आज या कंपनीला 63 वर्षे झालेली आहेत. आता या कंपनीचे मालक श्री.गोयल यांनी मेसर्स रहेजा इन्र्व्सल यांच्याबरोबर कंत्राट केले, करार केले आणि या कंपनीची जी मोकळी जागा होती, ज्या जागेवर कामगारांच्या काही वसाहती होत्या. ती 348 एकर जमीन विकली. एका बाजूला चायनीज प्रॉडक्शन मुळे येणारे आव्हान, त्यामुळे कंपनीचे उत्पादन आणि त्याला मिळणारा भाव लक्षात घेता कंपनी तोट्यामध्ये जात होती.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत....

कामगारांच्या युनियनने सामजस्याने कामगाराना ओ.आर.एस. घेण्यास परवानगी दिली. देय रक्कम देण्याबद्दल परवानगी दिली. हा करार मे. रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. आणि कंपनीच्या मालकांसोबत झालेला आहे. ती जमीन 167 कोटी रुपयाला विकण्याचा करार झालेला आहे. त्यातील जेमतेम 40 कोटी रुपये दिलेले आहेत. बाकीची देय रक्कम मिळत नाही त्यामुळे कामगारांची देय रक्कम देता येत नाही आणि दुसऱ्या बाजूला मोकळया जागेवर त्यांना काही निवासी संकुल बांधावयाचे होते यासाठी कामगारांची घरे निष्काषित करण्याचा प्रयत्न होता. उत्तरात असे म्हटले आहे की, मे. रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि. यांच्याकडून जमीन विक्रीची रक्कम अद्याप प्राप्त झालेली नसल्याने कामगारांना त्यांच्या देय रकमा अदा करणे अवघड झाले आहे." या कामगारांच्या घराच्या संदर्भात निवेदनामध्ये असे म्हटले आहे की,"या निवासस्थानामध्ये रहाणाऱ्या कामगारांच्या देय रकमा दिल्या शिवाय त्यांची निवासस्थाने रिकामी करु नयेत अशा सूचना व्यवस्थापनाला दिलेल्या आहेत."सभापती महोदय, उद्या या कामगारांची देय रक्कम दिल्यानंतर त्यांची धरे काढून घेणार काय ? सभापती महोदय, माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, 348 एकर अधिक कारखान्याकडे असलेल्या 84 एकर जमिनीचे मूळ मालक कोण? सरकारने ही जमीन त्या काळात त्या कंपनीला मोफत दिली होती की अल्प दरात दिली होती? जर सरकाने ही जमीन दिली असेल आणि ती एका उद्योगासाठी लोकांना उद्योग उपलब्ध व्हावा या भावनेतून दिली असेल तर ती जमीन आता कंपनीचे मालक खाजगीरीत्या विकत आहेत त्याला सरकार निर्बंध घालणार काय? दुसरा प्रश्न असा की, कामगाराच्या वसाहतीतील घरे कधीही निष्काषित करण्यात येणार नाहीत आणि करण्यात येणार असतील तर तेथेच बांधल्या जाणाऱ्या घरांमध्ये या कामगारांना जागा देणार काय? मे. रहेजा युनिव्हर्सलला यु.एल.सी.खाली एन.ओ.सी. मिळाली नाही म्हणून उर्वरित रक्कम आम्ही देत नाही असे त्यांचे वर्तमानपत्रात जाहीरपणे स्टेटमेंट आलेले आहे. कारखान्याच्या काही मशिन्स हलविण्यात येत नाहीत म्हणून आम्ही रकमा देत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून यु.एल.सी.खाली त्यांना एन.ओ.सी. देण्यात आली काय आणि दिली असेल तर बाकीची रक्कम किती दिवसात अदा करण्यात येईल?

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कल्याण मोहने येथे नॅशनल रेयॉन कॉर्पोरशनची 449.57 एकर इतकी जमीन आहे त्यापैकी 346.7 एकर जमिन रहेजा बिल्डरला 167 कोटी 50 लाख रुपयाला विकण्याचा करार केलेला आहे. त्यामध्ये 100 एकर जमीन शासनाची आहे. शासनाच्या 100 एकर जमिनीबाबतची परवानगी न घेता त्यांनी करार केला असल्यामुळे शासनाने त्याला स्थगिती दिली आहे. 7/12 च्या उताऱ्यावर तशी नोंद केली आहे. यु.एल.सी.ची परवानगी त्यांना अद्याप मिळालेली नाही. कामगार युनियन बरोबर त्यांचा असा करार झाला होता की, ही कंपनी तोटयात असल्यामुळे या जमिनीचे जे पैसे येणार आहेत त्यामधून कामगारांची जवळ जवळ 46 कोटी रुपयाची देणी भागवावयाची आणि 50,60 कोटी रुपये हा कारखाना पुन्हा सुरु करण्यासाठी वापरावयचे आणि हा कारखाना सुरु ठेवावयाचा असे त्यांचे ठरलेले होत. रहेजा बिल्डरबरोबर त्यांचा जो करार झाला होता त्या करारातील अटींची पूर्तता झाली नाही. यु.एल.सी.ची परवानगी मिळाली नाही. शासनाच्या जमिनीची परवानगी मिळाली नाही. त्यामुळे हा व्यवहार पुरा झ ाला नाही. दरम्यान ही कंपनी सिक युनिट करण्यासाठी ए.आय.एफ.आर.मध्ये गेली. त्यामुळे ए.आय.एफ.आर. आणि बी.आय.एफ.आर. मध्ये केसेस चालू आहेत. कामगार युनियन, रहेजा बिल्डर आणि मालक यांची एक बैठक झाली. कामगारांचे पैसे ताबडतोबीने देण्याची त्यांची तयारी आहे पण या एन.ओ.सी. मिळावयाला पाहिजेत अशी त्यांची अट आहे. दरम्यान ही जमीन एम.एम.आर.डी.ए.ला द्यावी आणि रहेजाने त्यातून बॅकआऊट व्हावे अशा प्रकारचा प्रयत्न सुरु आहे. या जमिनीची किंमत जवळ जवळ हजार कोटी रुपयाच्या वर आहे. ही खाजगी जमीन असल्यामुळे त्यांनी ती किती रुपयात विकावी हा त्यांचा प्रश्न आहे. रेडीरेकनरपेक्षा कमी किंमतीने विकली तर स्टॅम्पडयुटच्या बाबतीत आपण काही तरी करु शकतो. पण त्यांची खाजगी जमीन असल्यामुळे त्यांनी ती कितीला विकावी हा त्यांचा प्रश्न आहे.

यानंरत श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

दरम्यान मी माननीय मुख्यमंत्र्यांशी आम्ही बोललो आणि जर एमएमआरडीए घेण्यास तयार असेल तर हा प्रश्न ताबडतोब निकाली निघू शकतो.

उपसभापती : मला असे वाटते की, हा एनआरसी कंपनीबाबतचा प्रश्न आहे. कामगारांना मदत व्हावी म्हणून राज्य शासनाने या कंपनीला फार मोठ्या प्रमाणात मदत केलेली आहे. राज्य शासनाची मदत घेतल्यानंतर ही कंपनी जर स्वत:चाच फायदा बघणार असेल तर मला असे वाटते की, राज्य शासनाने त्यांना ज्या काही परवानग्या दिलेल्या आहेत त्या सगळ्या रिव्होक कराव्यात. कल्याण महापालिकेच्या पाण्याच्या थकबाकीपोटी असलेल्या एक कोटी रुपयांच्या बिलाबाबत मी स्वत: लक्ष घातले होते. म्हणजे शासनाच्या सर्व सोयीसुविधांचा, सवलतींचा फायदा कंपनीने घ्यावयाचा, ज्या कामगारांकरिता शासनाने त्यांना ज्या काही सवलती दिल्या त्याचा फक्त स्वत:साठी वापर करावयाचा आणि कामगारांना वाऱ्यावर सोडावयाचे हे जर धोरण असेल तर राज्य सरकारने आतापर्यंत त्यांना दिलेल्या सर्व परवानग्या रिव्होक कराव्यात असे मी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्यांना आपण कोणतीही परवानगी दिलेली नाही.

उपसभापती : त्यांना एन.ओ.सी. दिलेली आहे. मला माहीत आहे.

श्री. हसन मुश्रीफ : शासनाने त्यांना कोणतीही परवानगी दिलेली नाही. जमीन विक्रीला आपण स्टे आणलेला आहे. सातबाराच्या उताऱ्यावर आपण नोंद केलेली आहे की, आपल्याला हा व्यवहार करता येणार नाही. रजिस्ट्रारने त्यांना कळविले आहे की, आपल्याला याबाबत खरेदीपत्राचा व्यवहार करता येणार नाही. त्यांना आपण एन.ओ.सी. दिलेली नाही. उच्च न्यायालयामध्ये प्रकरण चालू आहे. प्लॅट, मशिनरी आणि जमीन याबाबत जैसे थे परिस्थिती ठेवावी, मशिनरी उचलावयाची नाही अशा प्रकारचे आदेश त्यांना कोर्टाने दिलेले आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामध्ये एक गोष्ट अशी आली की, या पैशातून 50 कोटी रुपये घेऊन पुन्हा तो कारखाना सुरु करण्याचा त्यांचा विचार आहे. शासन जसे सहकारी कारखान्यांच्या बाबतीत पुढाकार घेते आणि त्यांना मदत करते त्या पध्दतीने शासन यासंदर्भात पुढाकार घेणार काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

कारण त्या ठिकाणी एकूण 7 हजार कामगार आहेत. तेथील व्यापाऱ्यांनी सुध्दा बंद पाळला. कारण तेथील ज्या अँसीलरीज आहेत त्या कामगारांच्या जीवावर जगत आहेत. तेथील उद्योग-व्यापार या कामगारांच्या जीवावर जगत आहेत. त्यांनी बंद पाळला. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, शासनाने पुढाकार घेऊन जर या कंपनीला काही आर्थिक मदत करता आली आणि कारखान्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ते प्रयत्न करीत असतील तर त्यादृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अशा खाजगी कारखान्याला शासन काही मदत करणार नाही. परंतु मी सन्माननीय सदस्यांना आश्वासित करु इच्छितो की, हे अधिवेशन संपल्यानंतर, या कंपनीला, तेथील कामगारांच्या जेवढ्या संघटना असतील त्यांना आणि रहेजा यांना एकत्र बोलावून हा तिढा कसा सुटेल याबाबत शासन प्रयत्न करील. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक 2 वर असे नमूद केले आहे की, 45 कोटी रुपये देय्य रकमा देण्यासाठी, कारखान्याचे भागभांडवल 30 कोटी, प्लँट दुरुस्ती आणि देखभाल यासाठी 25 कोटी हे त्यांच्या जमिनीतूनच उपलब्ध होणार आहेत. ती जमीन निकामी आहे. त्या जमिनीचा काही उपयोग नाही. जो कारखाना सुरु करावयाचा आहे त्यासाठी त्यांनी 100 ते 125 एकर जमीन आपल्याकडे ठेवलेली आहे. त्यामध्ये कारखाना सुरु होणार आहे. त्यादृष्टीने शासन यामध्ये पुढाकार घेईल आणि त्यांना बोलावून जर रहेजा हे करणार नसेल तर एमएमआरडीएला देऊन हा कारखाना कसा सुरु होईल यादृष्टीने आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु.

श्री. अरविंद सावंत : ही बैठक किती दिवसात घेणार ?

श्री. हसन मुश्रीफ : हे अधिवेशन संपल्यानंतर जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये ही बैठक बोलण्यात येईल आणि आपल्यालाही त्या बैठकीला बोलविण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, आतापर्यंत गेल्या वर्षभरामध्ये प्रत्येक अधिवेशनामध्ये या कारखान्याच्या संदर्भात लक्षवेधी सूचना आलेली आहे. या विषयावर चर्चा झालेली आहे. त्या वेळच्या प्रत्येक कामगार मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही दालनात बैठका घेऊ. याबाबतीत निर्देश दिलेले आहेत, निर्णय होत आहेत परंतु आजपर्यंत अंतिम स्वरुपात कोणताही निर्णय आलेला नाही.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ....

कारण जोपर्यंत आपल्या कायद्याची अंमलबजावणी जोरदारपणे करीत नाही तोपर्यंत काही होणार नाही. शासनाने सांगितले की, 100 एकर जमीन शासनाच्या अखत्यारित आहे. 100 एकरच्या बाबतीत एन.ओ.सी. द्यावयाची किंवा ए.एल.सी.च्या बाबतीत परवानगी द्यावयाची याबाबतचा अधिकार शासनाला आहे. परंतु त्यांच्या मालकीच्या अधिकारामध्ये देखील शासनाकडे कित्येक गोष्टी अशा आहेत की, शासनाने त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे ठरविले पाहिजे. ते मालक हा जो प्रश्न लांबणीवर टाकत आहेत, सगळे अधिकारी त्यांना पळवाटा दाखवित आहेत आणि त्यामध्ये कामगारांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या संपूर्ण बाबतीत कडक अंमलबजावणी करुन हा अंतिम निर्णय शासन किती दिवसात घेणार ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कामगार खाते हे रेग्युलेटरी खाते आहे. यामध्ये जे कायदे आहेत ते कारखान्यांना रोखू शकेल इतके परिणामकारक नाहीत. म्हणूनच मी आज सचिवांना आणि बाकीच्या अधिकाऱ्यांना सूचना केली. टाळेबंदीची नुसती नोटीस दिली तरी टाळेबंदी होऊ शकते. त्यांना असे करता येणार नाही. परवा ठाणे येथील रेमंड कंपनीचा प्रश्न आला. त्या जमिनीची किंमत आता दोन-तीन हजार कोटी रुपये व्हावयास लागली आहे त्यामुळे सगळीकडे रेमंडचे काम चांगले चालले आहे आणि या ठिकाणी ते म्हणतात की मंदीत चालले आहे. त्यांना जमिनीचे पैसे घेऊन बाहेर जावयाचे आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ...

हे त्यांना करता येणार नाही, टाळेबंदी करण्यासाठी सुध्दा त्यांना शासनाची परवानगी घ्यावी लागेल. अशाप्रकारचा कायदा केल्यानंतर टाळेबंदी होणार नाही. तसा कायदा शासन सभागृहासमोर आणणार आहे, त्यावेळी त्याबाबतचे बिल सभागृहाने मंजूर करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या कंपनीने रहेजा बिल्डरला ही जमीन 167 कोटी रुपयांना विकली आहे. त्या कंपनीने कामगारांचे 350 कोटींचे देणे आहे. त्यामुळे त्या निधीतून कंपनी देणे देऊच शकत नाही. ही त्यामधील वास्तवता आहे. त्याचप्रमाणे त्या जमिनीचा औद्योगिक वापर बदलून निवासी वापर चालू आहे. लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी आपण तेथे जाऊन कामगारांची बैठक घेतली होती, त्यावेळी मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते. जमीन वापरातील बदल त्यांनी केला आहे तो रिव्होक केला आहे काय आणि केला नसेल तर केला जाणार आहे काय ? कल्याण महानगरपालिकेची थकबाकी असताना त्यांनी या कंपनीला काही एनओसी दिल्या आहेत. सभापती महोदयांनी म्हटल्याप्रमाणे या कंपनीतील कामगारांचे भले व्हावे म्हणून शासनाने विशेष सवलती दिलेल्या आहेत. परंतु कामगारांचे भले होत असल्याचे दिसत नाही. त्यामुळे या एनओसीज शासन रद्द करणार आहे काय, त्याचप्रमाणे या निवेदनात असे म्हटले आहे की, " भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या कंपनीच्या व्यवस्थापनाकडे भविष्य निर्वाह निधीची 95 लाख रुपये थकित असून " कायद्यानुसार व्यवस्थापनाने हा निधी वेळेवर भरला नाही तर संबंधितांना अटक करण्याचा शासनाला अधिकार आहेत. त्याप्रमाणे शासनाने कंपनीच्या मालकांना अटक केलेली आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, भविष्य निर्वाह निधीचा विषय केंद्र सरकारचा आहे. राज्य सरकारच्या अखत्यारितीमध्ये तो विषय येत नाही. परंतु भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने सुध्दा कंपनीविरुध्द कारवाई सुरु केलेली आहे. परंतु या विषयाच्या अनुषंगाने कंपनीच्या मालकाला अटक केलेली नाही.

श्री.विनोद तावडे : त्यांना का अटक केली नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, भविष्य निर्वाह निधीचा कायदा केंद्र सरकारचा आहे, राज्य सरकारचा तो कायदा नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतात.)

श्री.विनोद तावडे : भविष्य निर्वाह निधीचा कायदा अमेरिकेचा आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : भविष्य निर्वाह निधीचा कायदा केंद्राचा आहे, त्याचे वेगळे अधिकारी आहेत. मी हे जबाबदारीने सांगत आहे. भविष्य निर्वाह निधी विभागाशी राज्य सरकारचा संबंध असेल तर सन्माननीय सदस्यांनी माझ्याविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतात.)

श्री.हसन मुश्रीफ : या कंपनीने कामगारांचे किमान वेतन दिलेले नाही म्हणून कंपनीविरुध्द दोन वेळा खटले दाखल केले आहेत. त्यांच्या सर्व परवानग्या रद्द केलेल्या आहेत. कल्याण महानगरपालिकेने एनओसी दिलेली आहे ती यासाठी की, जकात यावी, कामगारांचे भले व्हावे.....

उपसभापती : या कंपनीने शासनाची, महानगरपालिकेची, कर्मचा-यांची सगळयांची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे या कंपनीची गय करण्यात काही अर्थ नाही. मला असे वाटते की, या कंपनीने ज्या ज्या गोष्टी कायदा मोडून केलेल्या आहेत किंवा कायदा न पाळता केलेल्या आहेत यासंबंधी शासनाने तातडीने कारवाई करावी अशी मी मंत्रिमहोदयांना सूचना करतो.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, यामध्ये दोन भाग आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, या कंपनीमध्ये एवढे कामगार आहेत, त्यांच्याकडे एवढे लोक राहतात, यासंबंधी शासनाने काही तरी कार्यवाही करावी. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, यासंबंधी शासनाकडे काही राहिलेले नाही. शासन जमीन विक्रीस परवानगी देणार नाही, त्यांच्याविरुध्द किमान वेतनासंबंधीचे दावे दाखल केलले आहेत. मशिनरी हलवावयाची नाही, जैसे थे परिस्थिती ठेवावी असे उच्च न्यायालयाने सांगितलेले आहे. कल्याण महानगरपालिकेची जेवढी रक्कम थकित आहे, ती भरण्यामध्ये कंपनीला थोडीशी सवलत दिलेली आहे. शासनाने त्यांना कोणतीही सवलत दिलेली नाही.

उपसभापती : या कंपनीला कल्याण महानगरपालिकेने दिलेल्या सर्व परवानग्या रद्द करण्यात याव्यात.

श्री.हसन मुश्रीफ : परवानग्या दिलेल्या नाहीत, पण दिल्या असतील तर रद्द करण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक 5 (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 165 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 165 ही निवेदने कृपया छापावी.)

4....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 वरील निवेदनासंबंधी</u>

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी नियम 93 ची सूचना दिली होती, त्याबाबतचे निवेदन शासनाने वितरित केलेले नाही. म्हणजे आम्हाला सभागृहाच्या पटलावर सुध्दा उत्तर दिले जात नाही.

उपसभापती : आज संध्याकाळपर्यंत आपण दिलेल्या नियम 93 च्या सूचनेबाबतचे निवेदन वितरित करण्यास सांगतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : व्होडाफोन कंपनीच्या ग्राहकसेवेसाठी मराठी भाषेचा सुरु केलेला पर्याय बंद असणे

मु. शी. : व्होडाफोन कंपनीच्या ग्राहकसेवेसाठी मराठी भाषेचा सुरु केलेला पर्याय बंद असणे याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ.नीलम गो-हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

व्होडाफोन या बहुराष्ट्रीय मोबाईल कंपनीने काही महिन्यापूर्वी ग्राहकसेवेसाठी मराठी भाषेचा पर्याय सुरु केला. परंतु अवघ्या तीन महिन्यातच व्होडाफोनच्या या मराठी सेवेने मान टाकली. व्होडाफोनच्या 98200982000 या ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क करा, तीन क्रमांक दाबून ग्राहक सेवेसाठी मराठी भाषेचा पर्याय स्वीकारा...पण त्यानंतर समोरील कर्मचारी आपल्याशी मराठीत बोलणार नाही, मराठीत बोलायला लाज वाटते म्हणून की काय, व्होडाफोनचे कर्मचारी इंग्रजी किंवा हिंदीतूनच संवाद साधतात. व्होडाफोनने सिस्टीमध्ये प्रॉब्लेम आहे असे सांगून खुलेआम मराठी भाषेच्या केलेल्या गळचेपी बाबत मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, व्होडाफोन या बहुराष्ट्रीय मोबाईल कंपनीने आणि सगळयाच कंपन्यानी ग्राहकसेवेसाठी त्या त्या राज्यामध्ये त्या त्या भाषेचा पर्याय सरु केला आहे. परंतु व्होडाफोनचा 98200982000 या ग्राहकसेवा क्रमांकावर संपर्क केला की, 3 नंबरचे बटण दाबून ग्राहक सेवेसाठी मराठी भाषेचा पर्याय स्वीकारता येतो. परंतु मराठी अभ्यास केन्द्राचे कार्यवाही श्री.रामभाऊ ठाणापूरकर यांनी व्होडाफोनला फोन केला त्यावेळी त्यांनी सिस्टिममध्ये खराबी आहे, मराठीमध्ये उत्तर देता येणार नाही असे सांगून हिंदीमधूनच उत्तर द्यायला सुरुवात केली. इतकेच नाही तर तेथील कर्मचा-याबरोबर मराठीतून बोलायचे आहे असे सांगितल्या नंतर हिंदी किंवा इंग्रजीतूनच बोलता येईल अशा प्रकारचे उत्तर दिले गेले असल्याचे वृत्त दैनिक "सामना"मध्ये प्रकाशित झालेले आहे. या व्होडाफोन कंपनीशी संपर्क साधून ग्राहक सेवा अधिकारी श्री. जसवींदर टंडन यांच्याशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

बोलून मराठी सेवा त्यांनी ताबडतोब सुरु न केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करावी आणि व्होडाफोन कंपनीला मराठी भाषेचा सन्मान करण्यास आपण भाग पाडावे यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड जिल्हयाची राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत निवड करण्याबाबत

मु. शी. : बीड जिल्हयाची राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत निवड करण्याबाबत ॲड. उषा दराडे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडते.

बीड जिल्हयामध्ये बाजरी, रब्बी ज्वारी, हरभरा या पिकांचे सर्वात जास्त क्षेत्र आहे. मराठवाडयातही ते आहे. परंतु तरी सुध्दा मराठवाडा विभाग राज्याच्या तुलनेमध्ये आणि त्यातल्या त्यात बीड जिल्हयामध्ये क्षेत्र जास्त असूनही उत्पादन कमी आहे. या अर्थाने विचार करता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानामध्ये बीड जिल्हयाचा समावेश करावा यासाठी राज्य शासनाने विशेष प्रयत्न करावेत अशी मी विशेष उल्लेखाची सूचना देते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर मधील चिखली नाला प्रकल्पग्रस्तांना मोबदला न मिळणे

मु. शी. : नागपूर मधील चिखली नाला प्रकल्पग्रसतांना मोबदला न मिळणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, नागपूर येथील काटोल तालुक्यातील चिखली नाला प्रकल्पग्रस्तांना न्यायालयाच्या आदेशानुसार सुमारे 20 वर्षे मोबदला देण्यात आलेला नाही. परिणामी न्यायालयाने जिल्हाधिकारी कार्यालयावर जप्ती वॉरण्ट बजावला. प्रकल्पग्रस्त कोणत्याही शासकीय प्रकल्पांसाठी जमिनी देतात पण त्यांना पुरेसा मोबदला देण्यात व त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करण्यात शासन अपयशी ठरले असून शेतक-यांच्या हक्कासाठी शासनावरच जप्ती आणावी लागणे, यामुळे शासनाची झालेली बदनाम तसेच प्रकल्पग्रस्त आणि जनमानसात निर्माण झालेला असंतोष व असुरक्षितता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथील मोचेमाड पूलाजवळ सुरु असलेले वाळू उत्खनन

मु. शी. : वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथील मोचेमाड पूलाजवळ सुरु असलेले वाळू उत्खनन याबाबत श्री. अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. अरविंद सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यामध्ये सगळीकडे वाळूच्या उपशाची परवानगी देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात वाळूचा उपसा न करता वाळूचे खणन केले जात आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ला येथील शिरोडा येथे मोचेमाड खाडीवर बॅ. नाथ पै पूल हा प्रमुख राज्य महामार्ग क्रमांक 4 वरील महत्वाचा पूल आहे. या पुलावरुन सतत मोठी वाहतूक सुरु असते. शासनाच्या महसूल खात्याने मोचेमाड खाडीतील वाळूसाठयांचा लिलाव केला. परंतु प्रत्यक्षात वाळूसाठा उचलण्या ऐवजी खणून वाळू काढण्यात येत असल्याची तक्रार करुनही कोणतीच कारवाई झालेली नाही. मोचेमाड पुलाच्या दोन्ही बाजूने 100 मीटर परिसरात वाळू उत्खनन सुरु असल्यामुळे मोचेमाड पुलाच्या खांबांना धोका असून तातडीने मोचेमाड पुलाच्या दोन्ही बाजूने 100 मीटर परिसरात वाळू उत्खनन करण्यास बंदी करावी. तसेच सध्याच्या वाळू उत्खननामुळे पुलास धोका असल्याचे पत्रच सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविलेले आहे. तेथीलच जवळच्या पालगावाच्या सरपंचाने खासकरुन पुलाखालचा वाळू उपसा - शंभर मीटर या बाजूला आणि शंभर मीटर त्या बाजूला- बंद करण्यासंबंधी ग्रामसभेचा ठराव घेऊन तहसीलदाराला पत्र पाठवून देखील कारवाई होत नाही. म्हणून या औचित्याच्या मुद्याद्वारे मी दोन मागण्या करीत आहे. एक म्हणजे या पुलाच्या दोन्ही बाजूला शंभर मीटर अंतरावर वाळू उपसा करण्यास बंदी घालावी आणि दुसरे म्हणजे तहसीलदार कार्यालयाकडे तक्रार करुन सुध्दा तहसीलदार कार्यालयाने त्याची दखल घेतली नाही, म्हणून संबंधित तहसीलदारावर आणि संबंधित अधिका-यांवर कारवाई करावी.

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ. शी. : इमर्जन्सी कॉन्ट्रासेप्टिव्ह पिल्स यांची जाहिरात मोठ्या प्रमाणात होणे
मु. शी. : इमर्जन्सी कॉन्ट्रासेप्टिव्ह पिल्स यांची जाहिरात मोठ्या प्रमाणात होणे याबाबत श्री.विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, इमर्जन्सी कॉन्ट्रासेप्टिव्ह पिल्स यांची जाहिरात प्रसिध्दी माध्यमांतून विशेषत: टी.व्ही. च्या माध्यमातून मोठया प्रमाणात केली जात असल्याचे लक्षात येते. त्यात क्रोसिन आणि ॲनासिनसारख्या गोळ्या सुध्दा घेतल्या आहेत. थोडी घेतली की काम भागते अशा प्रकारच्या या जाहिराती असतात. अमेरिकेत सुध्दा वॉशिंग्टन सोडले तर संपूर्ण शहरात तसेच कुठल्याही राज्यात अशा प्रकारची खुली विक्री करण्याची परवानगी नाही. दुर्दैवाने आपल्या आरोग्य खात्यामार्फत मात्र अशा प्रकारच्या जाहिरातींचा पुरस्कार केला जातो. कारण यातून गर्भपातातून होणारे मृत्यू टाळता येतील असे कदाचित त्यांना वाटत असेल. अशा प्रकारच्या टी.व्ही. वरील जाहिरातींच्या संदर्भात ॲडव्हर्टाईजिंग स्टॅन्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाकडे एक तक्रारही केली आहे. कारण ही गोळी घेणाऱ्या व्यक्तिला त्यासंबंधीची माहिती नसते. तसेच या पिल्सबाबत परदेशात दुष्परिणामांची माहिती दिल्याशिवाय विक्री होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणून या पिल्सच्या प्रसिध्दी माध्यमातून होत असलेल्या जाहिरातींवर योग्य तो प्रतिबंध घालण्याची गरज आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाने सुध्दा यासंबंधीची काळजी घ्यावी असे आपण निदेश शासनाला द्यावे अशी विनंती या विशेष उल्लेखाच्चया माध्यमातून मी करतो.

उपसभापती : याची शासनाने गंभीर नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की,

"श्रीपाद कर्वे, सह आयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अमरावती यांचेविरुध्द श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण" ,

"संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेगांव, जि बुलढाणा आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांचेविरुध्द श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण", आणि

"सुझलॉन कंपनीविरुध्द श्री. दिवाकर रावते, श्री. अरविंद सावंत, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. विनोद तावडे, डॉ. वसंत पवार, श्री. अरुण गुजराथी, श्री. मोहन जोशी, प्रा.बी.टी.देशमुख वि.प.स. यांनी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण"

या तीनही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्यासाठी दिलेला कालावधी पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढवून द्यावा

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबईत झालेल्या दहशतवादावरील खटला सुरु असताना माजी केंद्रीय मंत्र्याकडून राजकीय दबाव येत असल्याचा गौप्यस्फोट

मु.शी.: मुंबईत झालेल्या दहशतवादावरील खटला सुरु असताना माजी केंद्रीय मंत्र्याकडून राजकीय दबाव येत असल्याचा गौप्यस्फोट या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबईत झालेल्या दहशतवादावरील खटला सुरु असताना माजी केंद्रीय मंत्र्याकडून राजकीय दबाव येत असल्याचा गौप्यस्फोट या विषयासंबधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे. निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याच संदर्भातील प्रश्न मी अगोदर सुध्दा उपस्थित केला होता. सरकारी वकिलाकडे महत्वाचा खटला असेल तर त्यांसदर्भातील माहिती त्याने मिडीयाकडे देऊ नये परंतु या प्रकरणात सरकारी वकील नेहमी मिडीयाकडे माहिती देत असतात ते योग्य नाही त्यामुळे या प्रकरणात सरकारी वकिलावर आपण कोणता अंकुश ठेवणार आहात ?

उपसभापती : सरकारी वकिलाने प्रेस समोर शक्यतो बोलणे टाळावे.

आता सभागृहाची बैठक मी अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1.52 ते 2.30 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी. गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात विविध उद्योगामुळे होत असलेले प्रदूषण

मु.शी.: गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात विविध उद्योगांमुळे होत असलेल्या प्रदषणासंबंधी सर्वश्री जैनुद्दिन जव्हेरी, जयप्रकाश छाजेड, संजय दत्त ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जैनुद्दिन जव्हेरी (वर्धा - चंद्रपूर -गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था):सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :-

"चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात येणाऱ्या कोळसा खाणीमुळे व उद्योगामुळे मोठया प्रमाणात प्रदूषणाचा ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण होणे, कोळसा खाणीच्या खोदण्यामुळे पाण्याची पातळी अतिशय खोलवर गेल्यामुळे या जिल्ह्यातील ग्रामस्थांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी न मिळणे, या जिल्ह्यातील सर्व विहिरींना २५ ते ४० फूटापर्यंत तसेच बोरवेलला ३०० ते ४०० फूटापर्यंत पाणी न लागणे, असे असूनही उद्योगाला नदीतून व बंधाऱ्यातून प्राथम्याने पाणी पुरवठा केला जात असणे, मात्र शेतीसाठी व पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा करण्यात न येणे, कोळसा खाणीत मोठ्या प्रमाणात सुरुंग लावण्यामुळे अनेक घरांना तडे जाणे, तसेच अनेक ठिकाणी जमिनीला तडे जावून जमिनी ठीक ठिकाणी खचल्याच्याही घटना घडत असल्याचे आढळून येणे, या ठिकाणचे अनेकवेळा सर्वेक्षण करण्यात येणे, यावर अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये निर्माण होत असलेले भितीचे व दहशतीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (उद्योग व पर्यावरण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस सोबतचे निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-निवेदना नंतर -

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असून त्या अनुषंगाने मला एक दोन प्रश्न माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहेत.चंद्रपूर,गडचिरोली या भागात मोठया प्रमाणात खाणी आहेत त्या उद्योगामुळे आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. कोळसा खाणीच्या खोदण्यामुळे पाण्याची पातळी खोलवर गेल्यामुळे 25 ते 40 फुटापर्यत विहिरींना आणि 300 ते 400 फुट बोअरवेलना पाणी लागत नाही. चंद्रपूर हा जिल्हा केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात आणि जगभरात सर्वात जास्त प्रदूषण युक्त जिल्हा आहे. हे खरे आहे काय ? या भागातील लोखंड, सिमेन्ट,पेपर मिल, मायनिंगच्या ओव्हर बर्डनमुळे मोठया प्रमाणावर प्रदूषण झालेले आहे हे खरे आहे काय ?खाणी खोदण्यामुळे पाण्याची पातळी खोल गेली आहे हे खरे आहे काय ? ही गोष्ट खरी असेल तर आतापर्यत या उद्योगावर फोजदारी खटले ,दंडात्मक कारवाई व क्लोजर नोटीस दिली आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो खरा आहे . माननीय सदस्यांनी शेवटचा जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, विभागाने वेळोवेळी सबंधितावर कारवाई करण्याचे काम केलेले आहे.सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या लहान वा मोठया कंपन्या प्रदूषण करतात अशा सर्व उद्योगांना नोटीसेस देण्याचे काम या अगोदरच झालेले आहे.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांकडे वर्तमानपत्राचे कात्रण देतो. गेल्या तीन साडे तीन वर्षा पासून मी सातत्याने प्रदूषणासंबंधी अनेक प्रश्न मांडले आहेत. परंतु जे कारखाने प्रदूषण करतात त्यांना शासनाने नोटीस दिलेली नाही त्या भागात किती प्रदूषण होते हे माननीय पर्यावरण मंत्र्यानी स्वत: पाहिलेले आहे.त्या भागाला भेट देण्यासाठी गाडीतून जात असतांना मी त्यांना असे म्हटले की, आपण गाडीतून खाली उतरून परिस्थितीची पहावी .परंतु गाडीची काच खाली करण्याससुध्दा ते तयार नव्हते. बल्लापूर पेपरमिलमुळे त्या भागात मोठया प्रमाणावर प्रदूषण होत आहे. आता माझे वय 55 वर्षाचे आहे मी अनेक वर्षापासून प्रयत्न करीत आहे परंतु अजूनही प्रदूषणाचे प्रश्न सुटलेले नाहीत.

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझ्याकडे वर्तमानपत्रातील कात्रणे आहेत ती मी माननीय मंत्रिमहोदयांकडे देतो . त्या वर्तमानपत्रात काही फोटो छापून आलेले आहेत आणि रोडला भेगा पडलेल्या त्यामध्ये दिसत आहे. विजेचे टॉवर्ससुध्दा पडलेले त्यामध्ये दिसत आहेत.....

श्री.दिवाकर रावते:सभापती महोदय, वर्तमानपत्रातील बातम्या ख-या नसतात असे आपल्याच मंत्र्यांनी सागितले होते.

श्री.जैनुद्दिन जव्हेरी : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. रावते जी मुझे डिस्टर्ब कर रहे हैं, इसलिए अब मैं हिन्दी में बात करुंगा. सभापति महोदय, कोई भी व्यक्ति यह चाहेगा कि उसके जिले में उद्योग आएं, लेकिन हम यह चाहते हैं कि हमारे जिले में माइनिंग इन्डस्ट्री न आए. इसकी वजह से लोगों को बहुत परेशानी हो रही है. चंद्रपुर जिले में प्रदूषण फैलाने वाले उद्योगों को बंद करना चाहिए. मैंने न्यूज पेपर में पढ़ा है कि पश्चिम महाराष्ट्र में 15 दिन से बिजली बंद थी. पहले श्री. तटकरे जी ऊर्जा मंत्री थे. इस समय श्री. अजितदादा पवार ऊर्जा मंत्री हैं और वे हमारे क्षेत्र में आए. वे हमारी परेशानी जानने के लिए आए. मैं पिछले 25-30 साल से यही प्रश्न पूछ रहा हूँ कि जो सरकार के नियम हैं, उनके हिसाब से आप कार्रवाई करेंगे या नहीं. हमारे क्षेत्र में खदानें, सीमेंट उद्योग, पेपर मिल प्रदूषण फैला रही हैं और लोगों को परेशानी का सामना करना पड़ रहा है. मेरी सरकार से मांग है कि आप इन उद्योगों के ऊपर नियम के अनुसार क्लोजर नोटिस दें, उनके ऊपर कायदे के हिसाब से फौजदारी गुनाह दाखिल करें और दंडात्मक कार्रवाई करें. क्या शासन इस प्रकार की कार्रवाई करेगा ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, नियमानुसार जी काही कारवाई करावयाची असेल ती केली जाईल.

. . . . . .

नेंतर श्री.सुंबरे

अशुद्धारित प्रत/प्रसिद्धीपूर्वी नहीं

<u>औचित्याच्या मुद्याबाबत.</u>

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितली होती. त्यांना मी त्यासाठी परवानगी देत आहे. सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला माझा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, माझा मुद्दा असा आहे की, जळगाव मध्ये अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री. मनोज लोहार हे पोलीस वेषातील दरोडेखोर म्हणून तेथे काम करीत आहेत. सुदैवाने आता सभागृहात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे स्वत: उपस्थित आहेत म्हणून त्यांच्या समोरच मी हा मुद्दा मांडत आहे जेणे करून ते याची दखल घेतील, काही कडक कारवाई करतील. सभापती महोदय, जळगावातील श्री.उत्तमराव महाजन नावाचे गृहस्थ आहेत ते कॉंग्रेसचे कार्यकर्तेदेखील आहेत. त्यांना अति.पोलीस अधीक्षक श्री.लोहार यांनी तेथील स्थानिक पोलीस निरीक्षक श्री.निंबाळकर यांच्या मार्फत आपल्या कार्यालयात बोलाविले आणि तुमच्याविरूद्ध गुजराथ मधील एका व्यापाऱ्याचे 21 लाख रूपये तुम्ही दिले नाहीत अशी त्या व्यापाऱ्याची तक्रार आहे आणि त्याबाबत चौकशीसाठी तुम्हाला बोलाविले आहे असे सांगितले. श्री. उत्तमराव महाजन हे त्यावेळी मालेगाव येथे कॉंग्रेस पक्षाच्या काही कार्यक्रमासाठी जात होते आणि तसे त्यांनी त्यांना सांगितले असता देखील त्यांनी त्यांना तेथे बोलावले, त्यांच्या कार्यालयात बसवून ठेवले तसेच त्यांच्या विरूद्ध अशी अशी तक्रार आली आहे व त्याबाबत चौकशी करायची आहे म्हणून सांगितले. चौकशी करता करता त्या ठिकाणीच स्थानिक चाळीसगाव येथील दोन गुंड असलेले इसम येतात. ते श्री.महाजन यांना सांगू लागतात की, आम्ही या प्रकरणात तुमची सेटलमेंट करून देतो. सभापती महोदय, हे त्यांनी त्यांना खाजगीमध्ये सांगितले आहे असे नाही तर अति.पोलीस अधीक्षक श्री.मनोज लोहार यांच्या समोरच सांगितले आणि तडजोडीसाठी 60 लाख रूपयांची खडणी मागितली. सभापती महोदय, एक अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशा प्रकारे कॉलेज चालविणाऱ्या संस्थाचालकाकडून खंडणी मागतो, ही किती गंभीर बाब आहे हे आपण लक्षात घ्यावे. सभापती महोदय, श्री. उत्तमराव महाजन यांनी त्यांना सांगितले की, मला या विषयी काही माहिती नाही, मी इतके पैसे देऊ शकत नाही, माझा या प्रकरणाशी काही संबंध नाही. माझा त्यात काही दोष नाही. असे त्यांनी परोपरीने समजावून सांगत होते पण त्यावेळी तेथे मध्यस्थ

..... V V 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून स्थानिक गुंड मध्यस्थी करीत होते. त्यांच्याशी संगनमत करून पोलीस वेषातील दरोडेखोर असलेल्या अति.पोलीस अधीक्षकांनी श्री.महाजन यांच्याकडून खंडणी वसूल करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यानंतर श्री.महाजन यांच्या मुलाने याबाबत पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन त्यांच्याकडे हे सारे सांगून या प्रकरणाची तक्रार केली. त्यावर पोलीस अधीक्षकांनी अति.पोलीस अधीक्षक श्री.लोहार यांना बोलावून घेतले असता श्री.लोहार यांचे वक्तव्य असे होते की, मी पैसे देऊन या पदावर आलो आहे तेव्हा ते वसूल केल्याशिवाय मी राहणार नाही. सभापती महोदय, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदावरील एक व्यक्ती अशा प्रकारचे वक्तव्य करते आहे हेही आपण लक्षात घ्यावे. पोलीस अधीक्षकांना ते पटल्यामुळे त्यांनी त्यांची कारवाई या प्रकरणी सुरू केली. त्यावर अति.पोलीस अधीक्षक यांनी कोर्टामध्ये, उच्च न्यायालयात जाऊन या विषयी स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न केला. पण ती त्यांना मिळाली नाही आणि कोर्टाने याबाबत दखलपात्र गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला आणि सदर गुन्हा गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यास सांगितले. ...

Windows Media Player.lnk (यानंतर श्री. सरफरे

....2डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

परंतु या लोहारची पोहोच अशी आहे की, त्यांनी सी.आय.डी. च्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर संगनमत केले आहे. उच्च न्यायालयात हे प्रकरण मूव्ह केल्यानंतर ते सुप्रिम कोर्टापर्यंत जात राहिले. आणि सुप्रिम कोर्टापर्यंत गेले पाहिजे असे ठरले असतांना सरकार सुप्रिम कोर्टामध्ये जात नाही. म्हणून मग सुटीकालीन न्यायालयाकडे गेले व त्यांनी हे प्रकरण दाखल करुन घेतले. अशापध्दतीने अतिरिक्त पोलीस अधीक्षक या स्वरुपाचे काम करणार असतील तर आपण राज्यामध्ये नक्षलवाद्यांच्या प्रश्नांवर चर्चा करतो. अनेक गुन्हे राज्यामध्ये घडत आहेत. असे असतांना पोलीस दलाच्या आधारे असे प्रकार होणार असतील तर आपण अनेक दरोडेखोरांना पोलीस दलात भरती केले पाहिजे. आणि म्हणून या संपूर्ण प्रकरणामध्ये आपण कडक कारवाई केली पाहिजे. खंडणी वसूलीचे काम पोलीस अधिकारी करणार असतील तर त्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे. आणि तसा मेसेज जनतेपर्यंत गेला पाहिजे. चालू अधिवेशनामध्ये आपण ही कारवाई केली तर सामान्य माणसाला शासनाकडून न्याय मिळतो अशाप्रकारचा मेसेज जनतेमध्ये जाईल. आणि म्हणून माननीय गृहमंत्र्यांना त्यांनी याबाबत कडक कारवाई करावी अशी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर देण्यापूर्वी मला एक प्रश्न विचारावयाचा आहे की, विदर्भामध्ये पोलिसांच्या प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख म्हणून श्री. रेहमान यांना नेमण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी पोलिसांना देण्यात येणारे सॉक्स आणि गमबूटचे पैसे जबरदस्तीने वसूल करण्याचे काम श्री.रेहमान करीत आहेत. वास्तविक या वस्तूंचे पैसे शासनाकडून मिळत असतांना अशाप्रकारे पैसे वसूल केले जात आहेत याची माहिती आपणास आहे काय?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत पूर्णपणे माहिती घेण्यात येईल. आणि त्यानंतर जर कारवाई करण्याची आवश्यकता असेल तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात विधानसभेमध्ये एक तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता, परंतु तो चर्चेला आला नाही. या संदर्भात संपूर्ण माहिती घेण्यात आली आहे. श्री. मनोज लोहार यांनी श्री. उत्तमराव महाजन यांच्याकडे पैसे मागितल्याची तक्रार आली असल्यामुळे या गंभीर प्रकरणाचा तपास सी.आय.डी.मार्फत सुरु आहे. या संदर्भात मी सी.आय.डी. कडून सुध्दा माहिती घेण्याचा प्रयत्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. आर.आर.पाटील...

केला.त्यावेळी ज्यांच्यावर आरोप ठेवण्यात आले आहेत त्यामध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे आढळून आले आहे, हे मी याठिकाणी प्रांजळपणे सांगतो. त्याचप्रमाणे सराईत गुन्हेगारांना जिल्हा बंदी, तालुका बंदी केली जाते, त्याप्रमाणे एका ॲडिशनल एस.पी. ला ज्या जिल्हयामध्ये नेमले आहे त्या जिल्हयामध्ये हायकोर्टाने बंदी घालावी यासारखी दुर्दैवी बाब असू शकत नाही. म्हणून हे प्रकरण आपण खूप गांभीर्याने घेतले आहे. यामध्ये सुप्रिम कोर्टाचे आदेश तपासून बघितले जातील व तातडीने निलंबनाची कारवाई निश्चितपणे केली जाईल.

त्याचबरोबर माननीय सदस्यांनी यानिमित्ताने संदेश द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ही गोष्ट खरी आहे की, पोलीस अधिकाऱ्यांना अनेक ठिकाणी पाठबळ देण्याचे काम, त्यांचे नीतिधैर्य कमी होऊ नये म्हणून त्यांना पाठीशी घालण्याचे काम दोन्ही सदनातील माननीय सदस्यांचा रोष पत्करुन केले आहे. मी यानिमित्ताने एकच सांगू इच्छितो की, योग्य काम करीत असतांना कुणाकडूनही बोनाफाईड मिस्टेक झाली असेल किंवा काम करीत असतांना इच्छा नसतांना चूक झाली असेल आणि ती चूक बोनाफाईड असेल तर त्यासंबंधित अधिकाऱ्याला नक्कीच पाठीशी घातले जाईल. परंतु अशापध्दतीने जर कुणी खंडणी वसूल करीत असेल आणि जनतेला त्रास देत असेल तर त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याची भूमिका कदापि घेतली जाणार नाही. माननीय सदस्यांनी या संदर्भात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊ द्यावा. हेच काय, परंतु अशाप्रकारचे काम करणारा कोणताही अधिकारी पोलीस दलामध्ये राहणार नाही. त्यासाठी कायद्यामध्ये सुध्दा बदल करावा लागला तरी तो केला जाईल. सभापती महोदय, अधिकाऱ्यांना त्यांच्या कामामध्ये स्थैर्य मिळाले पाहिजे. बदलीच्या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार होऊ नये म्हणून त्या संदर्भातील कायदा राज्यामध्ये आहे. त्यांना आपल्या नोकरीमध्ये स्थिरता मिळाली पाहिजे व त्यांना निपक्षपातीपणे काम करता यावे म्हणून त्यांना सेवाशर्तीमध्ये सुध्दा संरक्षण दिले आहे. परंतु अधिकारी व नोकरांना मिळालेले हे संरक्षण जर अशाप्रकारे गैरप्रकार करण्यासाठी वापरले जाणार असेल तर...

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यावरील उपाययोजनांची नक्कीच आवश्यकता आहे. या प्रकरणामध्ये काही गंभीर स्वरुपाच्या चुका झाल्याचे प्रथमदर्शनी पुढे आलेले आहे. याबाबतीत तपास सुरु असून, तो देखील लवकर संपविला जाईल आणि शासनामार्फत कठोर कारवाईची भूमिका निश्चितपणे स्विकारली जाईल.

. . . .2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय गृहमंत्री महोदय, आपण आता याठिकाणी मांडण्यात आलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत विवेचन केले. आपण एक अत्यंत संवेदनाशील अशा प्रकारचे खाते सांभाळत आहात. आपण कर्तव्यकठोर आहात, कार्यक्षम आहात याबद्दल सर्वसाधारण जनतेमध्ये देखील आपण आपली चांगली प्रकारची इमेज निश्चितपणे निर्माण केलेली आहे. परंतु समाजामध्ये आणि बाकीच्या ठिकाणी वावरत असताना काही-काही अनुभव येत असतात. मी याठिकाणी याविषयी फार लांबलचक बोलणार नाही. परंतु याठिकाणी आपण पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीत व्यवस्थितपणे स्पष्टीकरण केले. आपण कित्येक वेळेला जनहित डोळयासमोर ठेऊन, प्रशासनामध्ये शिस्त रहावी, प्रशासनातील कार्यक्षमता चांगली रहावी, शासनाची कार्यक्षमता चांगली रहावी म्हणून खात्यामार्फत काही-काही बदल्या करीत असता. परंतु एखाद्या अधिकाऱ्याची बदली मनाविरुध्द झाली तर तो अधिकारी मॅटमध्ये जातो. आपण बदलीचा कायदा केला, त्याचा खात्यावर चांगल्या प्रकारचा परिणाम व्हावयास पाहिजे. परंतु सध्या त्याचा उलटा परिणाम होत असल्याचे आपण पहात आहोत. जर एखादा अधिकारी योग्य प्रकारे काम करीत नसेल तर आपण त्याची बदली करतो. मग मनाविरुध्द बदली झालेला तो अधिकारी नंतर मॅटमध्ये जाऊन सहजासहजी ती रद्द करुन घेतो, म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाचे कुठलेतरी एक ट्रॅब्युनल हे कुठेतरी शासनावर देखील अंकुश ठेवण्याचे काम करीत आहे, त्यामुळे आपण प्रभावीपणे काम करण्याची संकल्पना उराशी बाळगत आहात, पण अशा घटनांमुळे आपल्याला निश्चितपणे त्याचा त्रास होत असेल, जो सर्वसामान्यांना देखील होतो. मी याठिकाणी विनोद म्हणून नाही, पण सहज एक किस्सा सांगतो. माझ्या घरी एक वर्षभरापूर्वी काही पोलीस अधिकारी आले होते. ते पोलीस अधिकारी ओळखीचे होते, परिचयाचे होते, ते बसले. ते एका मिटींगसाठी आले होते आणि युनिफॉर्म मध्ये होते. मग त्यांचे चहा-पाणी झाले. ते माझ्याकडे कशासाठी आले आहेत हे मी त्यांना विचारले नाही. मग मी त्यांना विचारले की,आता पुढे काय ? त्यावर ते म्हणाले की, आम्ही दगडी चाळीमध्ये चाललो आहोत. मी त्यांना विचारले की, तुम्ही सर्व बाहेरचे अधिकारी आहात आणि तुम्ही दगडी चाळीमध्ये जात आहात, तुम्ही काय रेड वगैरे टाकणार आहात की काय ? त्यावर ते म्हणाले की, याठिकाणी आमची दगडी चाळ आहे. त्यांनी पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाकडे हात केला, आणि म्हणाले की, त्याला आम्ही दगडी चाळ म्हणतो. यातून त्यांच्या मनातील वेदना बरेच काही सांगून गेली. आपणही या सगळया गोष्टींचा अतिशय गांभीर्याने विचार करीत असता हे मलाही माहिती आहे. मी आपली .....

. . . .2 एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यपध्दती स्वत: जवळून पहात आहे. मी कै.बाळासाहेब देसाई यांच्या हाताखाली देखील काम केले होते, त्यामुळे त्यांची कार्यपध्दती देखील मला माहिती आहे. म्हणून तुमच्यासारखा एक आदर्श गृहमंत्री म्हणून मिळाल्यानंतर जर पोलीस अधिकाऱ्यांमध्ये अशा प्रकारची भावना खदखदत असेल तर याठिकाणी कुठेतरी आत्मपरिक्षण होणे आवश्यक आहे असे मला वाटते. मी याठिकाणी अत्यंत संक्षिप्तपणे बोललो आहे. मला असे वाटते की, आपल्याला कळले असेल की, पोलीस खात्यामधील अधिकाऱ्यांच्याही काही तीव्र भावना आहेत. आपण निश्चितपणे त्याचा देखील व्यवस्थित शोध घेऊन बंदोबस्त करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

. . . .2 एक्स-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण माननीय गृहमंत्र्यांच्या कर्तव्य कठोरतेबद्दल जी प्रशंसा केली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. सर्वांच्याच तशा भावना आहेत. आमच्या आहेत, जनतेच्या देखील तशाच आहेत. आपण एकदा काम हातामध्ये घेतले की ते सोडत नाही. मग तो कितीही बलदंड असू दे. याठिकाणी आपण भावना व्यक्त केल्यानंतरही, मी येथे एका गोष्टीसाठी उभा आहे. कारण मी आपल्याला व्यक्तीश: विनंती केली होती. कधीही कार्य कठोरतेमध्ये दिरंगाई होत नाही आणि तशी ती होता कामा नये. तसे जर झाले तर त्याला कार्य कठोरता म्हणत नाहीत. आज माझ्याकडे नियम 93 अन्वये करण्यात आलेले "आयबीएन-लोकमत" च्या संदर्भातील निवेदन आहे आणि कोणाकोणावर, 21 शिवसैनिकांवर कारवाई केल्याचे दिलेले आहे. ते ठीक आहे. परंतु न्यायालयाने सुध्दा संबंधितांवर कलम 307 चा गुन्हा दाखल करावा असा निर्णय दिला आहे, त्याला तीन-चार आठवडे उलटून गेले आहेत. मी आपल्याला विनंती केली होती. तेव्हा आपण न्यायालयाने निर्देश दिल्याप्रमाणे संबंधितांवर कलम 307 अन्वये कधी गुन्हा दाखल करणार आहात ? जनतेला असे वाटू लागलेले आहे की, याबाबतीत संबंधितांना पाठिशी घालण्याचे धोरण आहे. तुम्ही सुमोटो कारवाई केली नाही. या घटनेमध्ये एका व्यक्तीची कवटी तुटलेली आहे, त्याला पॅरलेसिस झालेला आहे. त्याचे मोठे सिव्हीअर ऑपरेशन झाले. तेव्हा माणसाची कवटी उगाच फुटत नाही. म्हणून न्यायालयाने याची पूर्ण चौकशी करुन, मेडिकल रिपोर्ट मागवून नंतर आदेश दिले की, संबंधितांवर सुध्दा ताबडतोब कलम 307 खाली गुन्हा दाखल करावा. या बाबतीत आपल्या खात्याकडून जी दिरंगाई होत आहे. तेव्हा एक कर्तव्यकठोर आणि एक दक्ष मंत्री म्हणून आपण आपल्या खात्याला याबाबतीत ताबडतोब कारवाई करण्यास सांगावे अशी अपेक्षा व्यक्त केली तर ते गैर होणार नाही. आपण त्याप्रमाणे कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी.: विदर्भ मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना.

मु.शी.: विदर्भ मराठवाा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाची उपाययोजना यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे,प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, अरुण गुजराथी, नितीन गडकरी, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी सर्वश्री उल्हास पवार, जयप्रकाश छाजेड, अरविंद सावंत, सय्यद जमा, जैनुद्दीन जव्हेरी, वसंतराव खोटरे, विक्रम काळे, ॲड.उषा दराडे, सर्वश्री विलासराव शिंदे, रमेश शेंडगे, जयंत प्र. पाटील वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

श्री. माणिकराव ठाकरे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"विदर्भ, मराठवाडा इत्यादी मागासलेल्या भागांचा जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये विकास होण्याकरिता धोरणात्मक निर्णय दरवर्षी अद्ययावत सरासरीवर करुन सर्वच क्षेत्रातील विकास कामांना आवश्यक तो निधी मिळण्याकरिता जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी आर्थिक अनुशेष भरुन काढण्याची पध्दत सक्षम न ठरल्याने त्याज्य ठरविण्याची आवश्यकता, जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्यासाठी आर्थिक अनुशेष दूर करण्याचे धोरण स्वीकरण्याची गरज, वर्षभरात जिल्हानिहाय साध्य झालेली भौतिक सिंचन क्षमता व वाढलेली राज्य सरासरी लक्षात घेऊन भौतिक अनुशेष दरवर्षीच्या राज्य सरासरीवर अद्ययावत करण्याचे धोरण स्वीकारण्याची गरज, जलसिंचन या क्षेत्राबरोबर इतरही विकास क्षेत्राचा अनुशेष भरुन न निघाल्याने विद्यमान भौतिक स्थितीवर आधारित अनुशेष निर्मुलनाची कालबध्द विशेष योजना हाती घेऊन सर्वांगीण विकासासाठी करावयाची उपाययोजना तसेच महाराष्ट्र राज्य विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी आदेश १९९४" ची मुदत दिनांक ३० एप्रिल, २०१० रोजी संपुष्टात येत असल्याने ती मुदत आणखी पाच वर्षासाठी राज्यशासनाने वाढविण्यासाठी केंद्र शासनाला विनंती करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या निर्मितीच्या वेळेला संपूर्ण मागास भागातील विशेषत: विदर्भातील जनतेला सांगण्यात आले आणि तशा प्रकारे लेखी स्वरुपामध्ये विदर्भातील जनतेला विधानसभेमध्ये आश्वासित करण्यात आले की, संपूर्ण भागाचा समतोल विकास करण्याचा दृष्टीकोन ज्यावेळेला सन्माननीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी सदनासमोर ठेवला त्यावेळेपासून महाराष्ट्राची एकूण विकास करण्याची जबाबदारी सामुदायिकपणे आपल्या सर्वांवर चालत आलेली आहे. महाराष्ट्राने अनेक क्षेत्रामध्ये विकास केला आणि संपूर्ण देशामध्ये एक नंबरचे राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याने नावलौकिक मिळविला. त्याचबरोबर विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि इतर काही भागामध्ये जो मागसलेपणा होता तो दूर करण्याविषयीचे काही कार्यक्रम सुध्दा सतत आग्रह केल्या नंतर हातामध्ये घेण्यात आले. विधानसभेमध्ये वारंवार सांगितले जात होते की, आम्ही अनुशेष भरुन काढीत आहोत परंतु अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टिकोनातून स्पष्टपणे कुठेही लेखी स्वरुपात माहिती देण्यात येत नव्हती. परंतु त्यावेळचे मुख्यमंत्री माननीय श्री. शंकररावजी चव्हाण साहेब यांनी किती आर्थिक अनुशेष भरुन निघाला यासंदर्भात दरवर्षी बजेट अधिवेशनामध्ये माहिती द्यावी, अशा प्रकारची सूचना केली आणि त्या आधारावर त्यानंतर झालेल्या सगळया अधिवेशनामध्ये अशा प्रकारची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने सुरुवातीला दांडेकर समितीचा आधार घेण्यात आला. परंतु दरम्यानच्या काळामध्ये अनुशेष वाढल्यामुळे परत आपण अनुशेषची माहिती घेतली पाहिजे आणि वस्तुनिष्ठ आधारावर अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे अशी मागणी त्यावेळी विधानसभा आणि विधान परिषदेच्या माध्यमातून पुढे आली आणि 1994 ला अनुशेष व निर्देशांक समितीची स्थापना करण्यात आली. या माध्मातून विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष काढण्यात आला. यामध्ये आर्थिक आधारावर तसेच भौतिक आधारावर अशा दोन्ही पध्दतीचा अनुशेष काढण्यात आला. त्यावेळी जो अनुशेष काढण्यात आला त्यामध्ये आर्थिक आधारावर जो अनुशेष काढण्यात आला होता तो भरण्याचा प्रयत्न राज्य शासनाकडून केला गेला. तशा प्रकारची माहिती विधानसभेमध्ये देण्यात आली. परंतु वस्तुनिष्ठ आधारावर जो अनुशेष होता तो भरुन काढला गेला नाही आणि विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश या भागातील अनुशेष मोठ्या प्रमाणामध्ये वाढू लागला. भौतिक आधारावरील अनुशेष भरुन न काढल्यामुळे 1994 साली भौतिक आधारावर जो अनुशेष काढला होता तो आपण भरुन काढू शकलो नाही त्यामुळे 1994 चा जवळजवळ 2 लाख 90 हजार 690 हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष आजही जशाच्यातसा राहिला. तो अनुशेष कोणामुळे राहिला असे काही सन्माननीय सदस्य विचारत आहेत. तो अनुशेष कोणामुळे राहिला हा विषय नाही. एकूणच आर्थिक आधावरील अनुशेष ज्यावेळी आतापर्यंत भरत होतो त्यावेळी आपण भौतिक आधारावरील अनुशेष भरुन काढा असे म्हटले नाही. भौतिक आधारावर किंवा ज्या वस्तुनिष्ठ गोष्टी समोर येतात त्या शासनासमोर मांडणे आणि तो अनुशेष भरण्याकरिता आग्रह धरणे हे सर्व सन्माननीय सदस्यांचे कर्तव्य असते. या भावनेतूनच मी हा विषय या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियोजन प्राधिकरणाची स्थापना केली. त्या आधारावर माननीय राज्यपालांनी काही सूचना केल्या. 1994 च्या भौतिक आधारावर जसा अनुशेष काढला तशा पध्दतीने अनुशेष काढला पाहिजे आणि तो काढल्यानंतर अनुशेष भरण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि तो प्रयत्न करीत असताना परत नव्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

अनुशेष निर्माण होऊ नये याची काळजी घेणे गरजेचे आहे अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना माननीय राज्यपालांनी दिल्या. त्यासंदर्भामध्ये काही प्रयत्न झाले. मागच्या काळामध्ये ज्या ज्या वेळी अशा प्रकारचे निर्णय झाले होते त्यावेळी एका बाजूला अनुशेष वाढत होता आणि दुसऱ्या बाजूला अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न केला जात होता. म्हणून कोणताही नवीन निर्णय घेत असताना अशा प्रकारचा अनुशेष निर्माण होऊ नये याची काळजी घेतली गेली पाहिजे म्हणून सचिवांच्या संदर्भात अशा प्रकारचा एक जी.आर. काढण्यात आला की, ज्या खात्याने निर्णय घेतला असेल त्या खात्यामध्ये त्या निर्णयामुळे नवीन अनुशेष तयार होत असेल तर त्या सचिवांवर सुध्दा कारवाई झाली पाहिजे आणि ही जबाबदारी त्या सचिवाची राहील. अशा पध्दतीची पावले उचलली गेली. परंतु ते कितपत पाळले गेले हे पुढें घडलेल्या बाबींवरुन लक्षात येते. कॅबिनेट नोटमध्ये सुध्दा असे लिहिले जात होते की, या निर्णयामुळे कोणताही नवीन अनुशेष निर्माण होणार नाही. या सगळ्या गोष्टी टाळण्यात आल्या आणि त्यामुळे विपरित परिस्थिती निर्माण झाली. विदर्भ, मराठवाडा आणि इतर भागात तुलनात्मकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर फरक पडला. आज भौतिक आधारावर जो अनुशेष आहे त्यामध्ये सन 2008 पर्यंत विदर्भाचा अनुशेष 10 लाख 67 हजार 970 हेक्टरचा आहे. त्याच पध्दतीने मराठवाड्याचा अनुशेष 5 लाख 970 हेक्टरचा निघतो. कोकणाचा अनुशेष 1 लाख हेक्टरच्या वर निघतो.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

खानदेशचा 1 लाख 99 हजार हेक्टरचा अनुशेष आहे. इतक्या मोठया प्रमाणात भौतिक आधारावर अनुशेष निघतो. विदर्भातील 10 लाख हेक्टरच्या अनुशेषाचा विचार केला आणि तो भरुन काढावयाचा असेल तर त्यासाठी 26 हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे, इतकी प्रचंड रक्कम त्यासाठी लागणार आहे. 1994 ला अनुशेष निर्देशांक समितीने भौतिक आधारावर अनुशेष काढला होता. त्या आधारावर 2 लाख 90 हजार हेक्टरचा अनुशेष भरुन काढावयाचे म्हटले तर त्यासाठी 9 हजार कोटी रुपये लागतील. सभापती महोदय, राज्याची सिंचनाची सरासरी 54 टक्के इतकी आहे. परंतु काही ठिकाणी विपरित परिस्थिती दिसून येते. अमरावती, बुलढाणा व वाशिम या जिल्हयांमध्ये 21 टक्के सिंचनाची व्यवस्था होऊ शकली. मराठवाडयातील हिंगोली जिल्हयात 28 टक्के सिंचनाची व्यवस्था झाली आहे, नागपूर, चंद्रपूर या जिल्हयामध्ये 37 टक्के सिंचनाची व्यवस्था होऊ शकली आहे. ही जी जिहयाजिल्हयांमध्ये तफावत आहे, मग कोणत्या भागामध्ये, कोणत्या विभागामध्ये आहे हा महत्वाचा भाग नाही. पण ज्यावेळी आपण समतोल विकास म्हणतो त्यावेळी समतोल विकास साधण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजेत आणि ही जी कमतरता आहे ती भरुन काढण्यासाठी प्रयत्न केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, मी यानिमित्ताने नमूद करु इच्छितो. उदाहरण द्यावयाचे झाले तर विदर्भाच्या दृष्टीकोनातून गोसीखूर्द हा महत्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाची सुरुवातीची किंमत 383 कोटी इतकी होती. स्व.राजीव गांधी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले होते. 2009 पर्यंत या प्रकल्पावर 3,292 कोटी रुपये खर्च होऊनही आणखी 5 हजार कोटी रुपये या प्रकल्पाला लागणार आहेत. केंद्र सरकारने आता हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून या प्रकल्पासाठी 90 टक्के निधी मिळणार आहे. राज्य सरकारने फक्त 10 टक्के रक्कम गुंतवावयाची आहे. हा प्रकल्प 3 वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने पावले उचलली आहेत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.माणिकराव ठाकरे..

सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भात संपूर्ण विदर्भाची स्थिती पाहिली तर येथे मुबलक पाणी आहे. याठिकाणचा पावसाळयाचा मोसम लक्षात घेता येथील दऱ्याखोऱ्यातील पाण्यामुळे वेगवेगळे प्रकल्प होऊ शकतात. अधिक प्रमाणात सिंचनाची व्यवस्था होऊ शकते. त्यासाठी आर्थिक तरतूद केली तर ते प्रकल्प देखील उभे राहू शकतात. मागील काही काळामध्ये अशी सूचना आली होती आणि त्यानुसार मंत्रिमंडळात ठराव मंजूर झाला होता. राज्यात मागासलेल्या भागात जे काही प्रकल्प आहेत त्यांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी 20 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय झाला होता. 4 वर्षात हा अनुशेष भरुन काढण्यात येणार होता. त्याप्रमाणे राज्यपालांना सुध्दा कळविले होते. परंतु राज्यपालांनी त्या ठरावात त्रुटी काढल्या, त्या त्रुटींसंबंधी सरकारने उत्तर दिले नाही. त्यामुळे सरकारला कर्ज मिळाले नाही आणि अनुशेष तसाच राहिला. त्यावेळच्या निर्णयाप्रमाणे शासनाला 20 हजार कोटींचे कर्ज मिळाले असते तर हा संपूर्ण अनुशेष भरुन निघाला असता आणि विदर्भात सिंचनाची व्यवस्था स्थापित होऊ शकली असती. सिंचनाच्या आधारावर विकास होऊ शकतो. वेगवेगळया माध्यमातून पावले उचलली असली तरी पुरेशा प्रमाणात सिंचनाची व्यवस्था केली नाही तर विदर्भाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल असे वाटत नाही म्हणून शासनाने याबाबत विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आम्ही दोन गोष्टींची सातत्याने मागणी करीत आहोत. विदर्भाचा अनुशेष आर्थिक आधारावर काढला आहे तो भौतिक आधारावर काढण्यात यावा. भौतिक आधारावर हा अनुशेष काढल्यानंतर तो सक्षमपणे भरुन काढण्यासाठी वैधानिक विकास मंडळाची पुढील वर्षात एप्रिल महिन्यात मुदत संपत आहे त्याची मुदत 5 वर्षांनी वाढवावी. हया दोन मागण्या शासनाने पूर्ण कराव्या. शासनाला हे दोन निर्णय विदर्भासाठी घ्यावे लागतील. त्यामुळे विधानसभेचे अधिवेशन विदर्भात होत असताना येथील जनतेला व मराठवाडयातील जनतेला न्याय दिल्यासारखे होईल. यामध्ये कोकण, उर्वरित महाराष्ट्र हा भाग सुध्दा यामध्ये येतो. या सगळया भागातील जनतेला मदत करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली पाहिजे. अशा दोन मागण्या मी करीत आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(श्री. माणिकराव ठाकरे...

भौतिक आधारावर या भागाचा अनुशेष निघाला पाहिजे. हा अनुशेष दरवर्षी काढला पाहिजे आणि त्या आधारावर पुढच्या वर्षाचा अनुशेष काढला पाहिजे, जेणे करुन तो पुन्हा निर्माण होणार नाही ही गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. अनुशेषाच्या संदर्भात बोलत असताना इतरही महत्वाच्या बाबींचा उल्लेख मला या ठिकाणी करावयाचा आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळी रस्त्यांच्या संदर्भातील अनुशेष काढला होता. आपण किती गावामध्ये रस्ते केले, किती गावे रस्त्याने जोडली, या आधारे रस्त्यांचे उद्दिष्ट ठरविले जाते. या आधारे विदर्भामध्ये रस्त्यासाठी 617 एवढया निशीची आवश्यकता आहे. एवढा निधी रस्त्याच्या कामावर खर्च केला तरच रस्त्याच्या बाबतीत आपण समतोल विकास साधू शकू. सेंट्रल बोर्ड फॉर डेव्हलपमेंटकडून दरवर्षी निधी प्राप्त होत असतो. परंतु त्यातील विदर्भासाठी किती खर्च केले आहेत हेही पाहिले पाहिजे. शासन एकीकडे असे सांगत असते की, सर्वांना न्याय मिळाला पाहिजे, समतोल विकास झाला पाहिजे.तर हा दृष्टीकोन विदर्भाच्या बाबतीतही शासनाने नजरेसमोर ठेवण्याची गरज आहे.

सभापती महोदय, कृषी पंपाचा अनुशेष विदर्भातील काही गावांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे. मागच्या वेळी कृषी पंपांचा निर्देशांक समितीच्या आधारावर काढलेला अनुशेष मोठ्या प्रमाणावर आहे. हा अनुशेष 4 लाख 35 हजार पंपांचा आहे. त्यामधील 2,42,715 कृषिपंपांचा अनुशेष विदर्भातील आहे, 1,32,433 कृषिपंपांचा अनुशेष मराठवाडयातील आहे आणि, 78 हजार कृषिपंपांचा अनुशेष नाशिक विभागातील आहे. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होते. जवळपास 56 टक्के वीज विदर्भातील चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर इत्यादी ठिकाणी होते. विदर्भामध्ये कोळशाच्या खाणी आहेत. या खाणीमुळे विदर्भातील रस्ते अत्यंत खराब झालेले आहेत. उत्खननाचे भराव टाकल्यामुळे एका बाजूला जास्त भार पडल्यामुळे काही ठिकाणी रस्ते खचतात तर काही ठिकाणी ते वर येतात. या खाणींचा तेथे राहाणा-या लोकांना किती त्रास होते हे प्रत्यक्ष तेथे जाऊन राहिल्या शिवाय समजणार नाही. मोठमोठ्या अवजड वाहतुकीमुळे रस्ते अतिशय खराब होतात. खाणीतील उत्खनन केलेल्या मातीचा ढीग एखाद्या रस्त्याच्या बाजूला टाकण्यात आला तर त्याच्या बजनामुळे रस्त्याला भेगा पडता किंवा तो दिसेनासा होतो. काही ठिकाणी तर नदीचे प्रवाह देखील

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. माणिकराव ठाकरे...)

बदलतात. या खाणीच्या परिसरामध्ये प्रचंड प्रमाणावर प्रदूषण होत असल्यामुळे माणसांच्या आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम होत असतो.

सभापती महोदय, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होत असून देखील विजेच्या बाबतीत विदर्भाला अजून न्याय मिळालेला नाही. म्हणून विजेच्या बाबतीत विदर्भाला न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी सातत्याने पुढे येत आहे. इतर भागातील उद्योगांचे प्रमाण आणि विदर्भातील उद्योगांचे प्रमाण यांची तुलना केली तर विदर्भातील उद्योगांचे प्रमाण अल्प असल्याचे दिसून येते. विदर्भातील नागपूर वगळता अन्य जिल्ह्यातील कामगारांचे प्रमाण पाहिले तर ते इतर जिल्ह्यातील कामगारांच्या प्रमाणापेक्षा किती तरी कमी आहे. म्हणून विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर उद्योग सुरु होण्याकरिता त्यांना विजेची सवलत देण्यात आली तर निश्चितच वीज निर्मिती करणा-या भागाला न्याय दिल्यासारखे होईल. सभापती महोदय, 47 प्रकल्प नव्याने येत असल्याचे समजते. ते येत असतील तर त्यांच्यासाठी मोठया प्रमाणावर सिंचनाचे पाणी वापरावे लागणार आहे.

....नंतर श्री. पी. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

आतापर्यंत जेवढे प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांना 1.50 लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल एवढे पाणी लागते आणि आणखी त्यात 47 प्रकल्पांची भर पडली तर 2.50 लाख हेक्टर ओलितासाठी लागणारे पाणी त्या वीज प्रकल्पांनाच लागणार आहे. अशा प्रकारे या विजेच्या प्रकल्पांसाठी सिंचनाचे पाणी शासन देणार असेल आणि विकासाच्या माध्यमातून अन्य कुठलीही मदत मिळत नसेल तर त्याचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण संपूर्ण राज्याचा विकास करीत असताना काही भाग दुर्लक्षित राहू नये. दऱ्या-खोऱ्यांमध्ये राहणारा आदिवासी तसेच मागावर्गीय माणूस असेल त्याला न्याय देण्यासाठी समतोल विकास आपण साधला पाहिजे अशी विदर्भातील जनतेच्या वतीने मी अपेक्षा करतो. त्याचबरोबर महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यात कापूस मोठ्या प्रमाणात पिकतो. तरी देखील या भागात कापसावर प्रक्रिया करणारे औद्योगिक क्षेत्र निर्माण झालेले नाही. तसेच धानाचे पीक सुध्दा मोठ्या प्रमाणात होते त्याची प्रक्रिया केंद्रे या भागात सुरु केलेली नाहीत. ज्यावेळेस कापूस एकाधिकार खरेदी योजना शासनाने सुरु केली होती त्यावेळेस विदर्भात कापसापासून कापडापर्यंतचे उद्योग उभारण्यात येतील असे सांगितले होते, परंतु दुर्दैवाने ते अद्यापही झालेले नाही. असे प्रकल्प झाले असते तर तरुण व बेरोजगारांना काम मिळाले असते. यादृष्टीनेही शासनाने विचार करण्याची गरज आहे. त्याचबरोबर कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु असताना शेतकऱ्यांकडून जो 3 टक्के विकास निधी जमा झालेला होता तो जवळपास 800 कोटी होता तो शासनाने परत केला. वास्तविक त्यामागची अशी कल्पना होती की, या निधीतून कापूस कापूस पिकविणाऱ्या परिसराचा विकास झाला पाहिजे असे जे शासनाचे धोरण होते त्यानुसार 1:9 अशी ती रक्कम होती. अशा प्रकारचे धोरण शासनाने सुत गिरण्यांच्या बाबतीत देखील आखले होते व त्यानुसार ते राखविले. इतर भागात सुध्दा सुत गिरण्यांना अशी मदत केली परंतु या विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची जी 1000 कोटीची रक्कम आहे त्यात शासनाने 1:9 प्रमाणे 9000 कोटीची मदत केली असती तर कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग या भागात निघाले असते. त्याचप्रमाणे प्रत्येक तालुक्याला अशा प्रकारचे केंद्र उभारण्याची सूचनाही आम्ही केली होती. त्यात आम्ही असे म्हटले होते की 1 लाख क्विंटल कापूस ज्या ज्या भागात गोळा होईल त्या भागात त्यावर प्रक्रिया करण्यासाठी असा उद्योग काढावा. हे करीत असताना त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

केंद्रासाठी 100 एकर जमीन घेऊन अशा प्रकारचे बायो-प्रोजेक्ट उभे केले आणि गारमेंट्सची व्यवस्था करु शकलो तर स्थानिक लोकांनाही रोजगार मिळू शकेल. परिणामी विदर्भासारख्या कापूस बेंचमधील आत्महत्त्या थांबण्यास, पूर्णपणे कमी होण्यास मदत होईल म्हणून शासनाने अशा उद्योगांसाठी हातभार लावण्याची गरज आहे, याचाही विचार शासनाने करावा अशी माझी अपेक्षा आहे. यापूर्वीच मी उल्लेख केला की, विदर्भ वैधानिक विकास मंडळाची मुदत पुढील वर्षी संपत आहे ती मुदत पुन्हा पाच वर्षापर्यंत वाढवून घेण्यासाठी शासनाने केंद्रशासनाकडे शिफारस करावी. तसेच माझी दुसरी मागणी आहे आहे की, विदर्भातील अनुशेष हा भौतिक आधारावरच काढला जावा. अशा ज्या सूचना मी केल्या त्या अनुषंगाने शासन निश्चित काही तरी निर्णय या विदर्भातील जनतेच्या दृष्टीने घेणार. कारण विदर्भातच हे अधिवेशन आहे आणि त्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेणे अतिशय महत्वाचे आहे. इतर विषय नेहमीच येत असतात परंतु कायमस्वरुपी विदर्भ आणि मराठवाड्याचा समतोल विकास होण्याच्या दृष्टीने या दोन्ही गोष्टी महत्वाचया आहेत, याकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे आणि त्याबाबतचा निर्णय शासनाने जाहीर करावा अशी विनंती करतो आणि मला हा प्रस्ताव मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय,...

उपसभापती : या ठिकाणी हा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख ऑनलेग राहतील. पुढील अधिवेशनात या प्रस्तावावर चर्चा होईल. आता सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 2009 हे चर्चेला घेतले जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्य विशेष सुरक्षा महामंडळ विधेयक

L. A. BILL NO. XXI OF 2009

(A BILL TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT AND REGULATION OF THE MAHARASHTRA STATE SPECIAL SECURITY CORPORATION IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा विधेयक, सन 2009 चे वि.स.वि. 21, महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 21, महाराष्ट्र राज्यात, महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

माननीय सभापती महोदय, दिनांक 26.11.2008 रोजी मुंबई शहरावर दहशतवाद्यांनी जो हल्ला केला होता त्यावेळी शासकीय अस्थापना, खाजगी अस्थापना, औद्योगिक अस्थापना, सर्व प्रमुख प्रतिष्ठाने, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था, सांस्कृतीक संस्था, वैद्यकीय संस्था, खाजगी बंदरे, धरणे, मॉल्स अशा अनेक ठिकाणावरुन पोलिसांच्या बळाची मागणी करण्यात आली होती. प्रत्येक ठिकाणी पोलीस संरक्षण देणे शक्य होईल अशी आपली अवस्था नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे....

म्हणून केंद्रशासनाने निर्मित केलेले केंद्रीय औद्योगिक बळ (सीआयएसएफ) हे देखील पुरेसे पडू शकत नाही. आपल्या पोलिस दलावरील ताण कमी व्हावा म्हणून आपण पोलीस कर्मचा-यांची भरती करीत असतो. खरे म्हणजे समाजामध्ये शांतता व सुरक्षितता नांदावी, समाजातील गुन्हेगारांवर वचक बसावा, गुन्हयांचा तपास लवकरात लवकर व्हावा यासाठी आपण पोलीस कर्मचा-यांची भरती करीत असतो. परंतु अनेक वेळा पोलीस बांधवांना बँकेच्या सुरक्षेसाठी, खाजगी संस्थाच्या सुरक्षेसाठी, निरनिराळया अस्थापनाच्या सुरक्षेसाठी जावे लागते. पोलिसांची भरती आपण ज्या कारणासाठी करीत असतो तो मूळ हेतूच यामुळे बाजूला राहतो. पोलिसांवरील ताण कमी व्हावा म्हणून अनेक ठिकाणी पोलीस स्टेशन्स, पोलीस चौक्या स्थापन करीत असतो. परंतु पोलिंसाचे पुरेसे बळ नसल्यामुळे पोलीस स्टेशन्स आणि चौक्या बंद असतात. या विधेयकाच्या माध्यमातून पोलीस स्टेशन्स आणि पोलीस चौक्या व्यवस्थित सुरु व्हाव्यात आणि पोलिसांवरील ताण कमी व्हावा यासाठीच हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. या सुरक्षा महामंडळाकरिता महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळाने दिनांक 23 जुलै, 2009 रोजी 25 कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सन 2009-2010 या आर्थिक वर्षात 2 कोटी रुपये इतका निधी पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावीत केलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रमेश बागवे .....

या सुरक्षा मंडळाची स्थापना करीत असतांना या मंडळाचे अध्यक्ष गृह खात्याचे सचिव असतील त्याचबरोबर व्यवस्थापकीय संचालक अपर पोलीस महासंचालक , महानिदेशक असतील तसेच या मंडळात सहा सदस्य असतील. त्यामध्ये पोलीस आयुक्त,मुंबई, आयुक्त राज्यगुप्ता वार्ता विभाग, प्रधान सचिव विशेष (गृह विभाग), सचिव, वित्त विभाग, सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस महा निरीक्षक व शासन नियुक्त दोन तज्ज्ञ असतील. अशा प्रकारे या मंडळाची रचना राहणार आहे.हे मंडळ स्थापन करीत असतांना या मंडळाचे उद्दिष्ट आणि कार्य मी आपल्याला सांगू इच्छितो.यामंडळाच्या अनुषंगाने राज्य शासन आणि केन्द्र शासनाची कार्यालये आणि त्यांची उपक्रमे,अशा सर्व आस्थापनावरील कर्मचारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमे व प्रमुख प्रतिंष्ठाने वित्तीय संस्था, धार्मिक संस्था, शैक्षणिक संस्था,सांस्कृतिक संस्था, वैद्यकीय संस्था अशा विविध संस्थाना त्यांच्या विनंतीवरुन अतिशय सुसज्ज आणि मनुष्यबळाची सशुल्क तत्वावर सेवा पुरविण्याचे काम असेल तसेच सुरक्षा विषयक परीरक्षण करणे व त्यांना सुरक्षेच्या मुद्यावर सल्ला देणे अशा प्रकारचे काम या महामंडळाला करावे लागणार आहे.

सभापती महोदय, या सुरक्षा मंडळाचे जे सदस्य आहेत त्यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीव्दारे वा कंत्राटदार पध्दतीने करण्यात येईल आणि शासनाच्या सेवसंबंधी जे नियम असतात त्याच सेवा नियमाच्या अनुषंगाने कर्मचा-यांची भरती होईल. जसजसी या ठिकाणी आवश्यकता वाटेल त्या त्या ठिकाणी भरती करण्यात येईल ही भरती कशी करावी, कर्मचा-यांचे वय किती असावे यासबंधीची गाईड लाईन तयार करण्यात येईल. मुंबई पोलीस अधिनियम 1939 च्या 21 अंतर्गत विशेष पोलीस अधिकारी असल्याचे त्यांना मानण्यात येईल व कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांना सशस्त्र परवाने देखील देण्यात येणार आहे अशा प्रकारे हे अत्यंत चांगले विधयेक असून ते सभागृहाने मंजूर करावे अशी विनती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक स्वराज्य संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी मांडण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळ विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी चांगले विधेयक मांडलेले आहे. परंतु त्या संबंधीच्या एक दोन मुलभूत प्रश्नांचा उल्लेख माननीय मंत्रिमहोदयांनी केलेला नाही तेव्हा त्याबाबतीत त्यांनी खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, या सुरक्षा मंडळाला काल पुरवणी मागणीव्दारे दोन कोटी रुपये आणि आता सागितल्याप्रमाणे 25 कोटी रुपये अशा प्रकारे एकूण 27 कोटी रुपये देण्यात येणार आहेत त्यापैकी आस्थापनेवरील खर्च किती आहे ? त्यानंतर सुरक्षा मंडळाला पोलिसांचे अधिकार देण्यात येणार आहेत काय ? याबाबतीत खुलासा करण्यात यावा त्याचबरोबर या कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देण्यात येणार आहे ते कोणाच्या खर्चाने देण्यात येणार आहे ? त्याच बरोबर एखादे रुग्णालय असेल वा एखादी औद्योगिक वसाहत असेल वा अन्य उद्योग असेल त्या ठिकाणी सुरक्षा देण्यासाठी या मंडळाला अधिकार देण्यात येणार आहे. सध्या सिध्दिविनायक मंदिराला सुरक्षा देण्यासाठी पोलीस फोर्स दिलेला आहे तेव्हा त्या ठिकाणचा पोलीस फोर्स विथड्रॉ करण्यात येऊन या सुरक्षा मंडळाला मंदिराच्या सुरक्षेसंबंधीचा अधिकार देण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर किती शुल्क आकारण्यात येणार आहे ? तसेच पोलिसांचे अधिकार त्यांना देण्यात येणार आहेत काय ? फौजदारी कायद्या अंतर्गत पोलीस खटले भरत असतात वा अन्य काही गोष्टी करीत असतात ते अधिकारसुध्दा सुरक्षा मंडळातील कर्मचा-यांना देणार आहात काय ? उदाहरणार्थ एखाद्या संस्थेने सुरक्षा मंडळाची सुरक्षा घेतली असेल व त्या ठिकाणी जर गुन्हा घडला असेल व या यंत्रणेने एखाद्या गुन्हेगाराला पकडले तर ते त्याच्यावर कायदेशीर कारवाई करुन गुन्हा दाखल करणार आहेत की स्थानिक पोलीस स्टेशनच्या ताब्यात या गुन्हेगाराला देणार व त्यांना असे सांगणार की, मी हा गुन्हेगार पकडला असून त्याच्यावर कारवाई करावी . तेव्हा या दोन तीन गोष्टी बाबत खुलासा होणे आवश्यक आह तो खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी करावा त्याचबरोबर या ठिकाणी भूमीपूत्रांची सुरक्षा रक्षक म्हणून निवड करण्यात यावी अशी अट घालण्यात येणार आहे काय या बाबतीतही माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात खुलासा करावा अशी मी त्यांना विनंती करुन माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक मांडून गृह खात्याने देशातील, महाराष्ट्रातील आपली हतबलता प्रगट केली आहे आणि त्याबद्दल येथे आम्ही खेद व्यक्त करावा की त्याबद्दल कौतुक करावे हा प्रश्न मंत्री महोदय, आपण स्वत:च निर्माण केला आहे. एका बाजूला आपण पोलिसांबद्दल नेहमीच कर्तव्य कठोर वगैरे सारखे मोठे मोठे शब्द वापरता ... मुंबईत 26 नोव्हेंबर 2008 ला जी भयंकर घटना घडली त्यापूर्वी राज्याचे गृहमंत्री पद माननीय श्री.आर.आर.पाटील यांच्याकडेच होते आणि आताही तेच गृहमंत्री आहेत. ते एकदा का बोलायला उभे राहिले की, तास-दीड तास बोलतच राहतात, खाली बसतच नाहीत. अर्थात त्यामुळे आमचे चांगले प्रबोधन होते आणि आम्हीही त्यांच्या प्रलोभनात पडतो. खरे तर त्यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यातील पोलिसांसमोर अशी भाषणे देत राहिले तर त्यातून निदान त्या पोलिसांचे बळ वाढेल, मनोबल वाढेल आणि त्यांची मानसिकता तयार होईल असे मला वाटते. पण ते येथे आम्हालाच भाषणे ऐकवतात. माननीय श्री.आर.आर.पाटील गृहखात्याचे प्रमुख झाले त्यावेळी 82 हजार पोलिसांचा तुटवडा आहे असे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर मुंबईतील पोलिसांची हतबलता व्यक्त करीत असताना मुंबईतील लोकसंख्या किती आहे आणि पोलीसबल किती आहे हेही त्यांनी सांगितले. तसेच कोणत्याही परिस्थितीत या पोलीसदलातील भरती तातडीने आम्ही करू, लवकरात लवकर ही भरती पूर्ण आम्ही करू अशा प्रकारची आश्वासने त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला या सभागृहाच्या माध्यमातून वेळोवेळी चर्चांच्या वेळी दिलेली आहेत. सभापती महोदय, आता पोलीस दलामध्ये 82 हजार पोलिसांचा तुटवडा असताना पोलीस भरती न झाल्यामुळे या महाराष्ट्र राज्यात आपण 22 हजार पोलिसांच्या भरतीचा प्रस्ताव पुढे केलेला आहे. त्यासाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. आता त्यातील किती प्रशिक्षणासाठी गेले ते सांगितले तर बरे होईल. कारण पोलीस दलात आलेल्या नव्या पोलिसांसाठी 6 महिन्यांचे प्रशिक्षण असते आणि एका वेळी एका ठिकाणी हजार दोन हजार पोलिसांनाच प्रशिक्षण देता येते अशी आपल्या प्रशिक्षण केंद्रांची क्षमता आहे आणि अशी प्रशिक्षण केंद्रे राज्यात केवळ 4-5 आहेत. तेव्हा एवढ्या पोलिसांना प्रशिक्षित आपण करणार केव्हा आणि तेव्हा कर्तव्यावर आणणार केव्हा ? परवाच तुम्ही एक विधेयक आणले आहे. सभापती महोदय, नक्षलवादाच्या बाबतीत माननीय गृहमंत्री बाहेर बोलत होते की, नक्षलवाद रोखण्यासाठी 22 हजार पोलिसांची भरती करणार आणि त्या पोलिसांना नक्षलवादी एरियामध्ये

..... 3एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

पाठविणार. सभापती महोदय, नव्याने भरती झालेल्या आणि नुकतेच प्रशिक्षण पूर्ण करून आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना आपण तेथे पाठविणार आहात. कशाला ? मरायला पाठविणार आहात ? पण आमचे रिचर्ड रॉबर्ट पाटील ... आर.आर.पाटील यांना आता वेगळीच चिंता लागली. ते म्हणतात माझ्या पोलीस खात्यात पोट सुटलेले पोलीस आहेत. ... सभापती महोदय, वर्तमानपत्रातून जे येते तेच मी येथे सांगतो आहे. .. तर पुढे ते सांगतात की, अशा पोलिसांची बदली आम्ही अशा ठिकाणी करू की जेथे त्यांना काम नाही. ... सभापती महोदय, हे सारे वृत्तपत्रातून आलेल्या बातम्यांतूनच आम्हाला कळते आहे तेच आम्ही येथे सांगतो आहोत. यातून तुमच्या पोलीस खात्याची पारदर्शकता किती आहे हेच आपण दाखवून देत आहात. ...

(यानंतर श्री. सरफरे ...जी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आपण 22 हजार पोलीस कसे प्रशिक्षित करणार आहात? त्यासाठी तुमच्याकडे किती ट्रेनिंग कँप आहेत? मघाशी मी रेहमानबद्दल याठिकाणी सांगितले. त्याचे सर्व कारनामे या सभागृहामध्ये मी मांडले आहेत. ते ज्याठिकाणी जातात, त्याठिकाणी असेच प्रकार करतात. असे म्हटल्यानंतर आपण त्यांना ट्रेनिंग कँपचा प्रमुख म्हणून पाठविले. आपण पोलिसांचा ड्रेस कोड लिहिला आहे त्याची यादी मी शोधत आहे. त्यामधील प्रत्येक वस्तूची किंमत किती आहे? याची माहिती मी शोधत आहे. प्रत्येक पोलिसांना लागणाऱ्या वस्तूंसाठी शासन पैसे खर्च करते. परंतु त्या वस्तूंचे पैसे हे अधिकारी जमा करीत आहेत. हे अधिकारी जातील त्याठिकाणी भ्रष्टाचार करतात. पोलीस दलामध्ये उद्या तयार होणाऱ्या पोलिसांना चिरीमिरी घेण्याचे काम कसे करावे हे अधिकारी आताच शिकवीत आहेत. आपण उद्या बाहेर गेल्यानंतर असेच काम करावे असे ते शिकवीत आहेत. असे पोलीस अधिकारी असल्यामुळे तुमच्या पोलीस खात्याची ही दुर्दशा झाली आहे. पोलिसांची ही भरती करण्यास आपण सक्षम नसल्यामुळे आता या लोकांना तुम्ही प्रशिक्षण देणार आहात. याठिकाणी अधिकृतरित्या पोलिसांची प्रवृत्ती असली पाहिजे असे म्हटले आहे. याठिकाणी आपण म्हटले आहे की, "महामंडळ सुरक्षा दल गठीत करील" आपण सुरक्षा दल असे नाव दिले आहे.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, सोसायटीच्या ठिकाणी आपण वॉचमेन ठेवतो. त्याप्रमाणे ड्रेसवाले प्रशिक्षित माणसे येतील अशी संकल्पना होती, परंतु तसे नाही. तुम्ही सुरक्षा दल निर्माण करीत आहात. याठिकाणी असे वाक्य आहे की, "महामंडळ सुरक्षा दल गठीत करील". तर मग पोलीस दल म्हणजे काय? राज्यामध्ये घटनेप्रमाणे गृह खात्याने निर्माण केलेली जी सुरक्षा यंत्रणा असते ते पोलीस दल" आज जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात गेलात तरी त्याठिकाणी पोलीस असतो. त्याला वेगवेगळी नावे असतात. आपण याठिकाणी नवीन सुरक्षा दल करीत आहात. तर मग पोलीस दल आणि सुरक्षा दल यामधील नेमका फरक तुम्ही काय करणार? हा विषय आहे. सुरक्षा दल हे अद्ययावत असले पाहिजे. याठिकाणी असे म्हटले आहे की, "महामंडळ सुरक्षा दल गटित करील, ज्यामध्ये महामंडळाचे पर्यवेक्षी अधिकारी, दुय्यम अधिकारी, सदस्य आणि नाव नोंदणी करण्यात आलेले सदस्य यांचा समावेश असेल" ही नाव नोंदणी करणार म्हणजे काय? ती कोण करणार? हे सुरक्षा दल कसे जमविणार? त्यासाठी जाहिरात देणार काय? त्यांची पात्रता, त्यांची अर्हता काय असणार आहे? त्यांच्यामध्ये काहीतरी गुण असले पाहिजेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे नक्की काय पाहिजे? या विधेयकात आपण म्हटले आहे की, महामंडळ सुरक्षा दल गठीत करील. त्यामध्ये महामंडळाचे पर्यवेक्षी अधिकारी असतील. म्हणजे एसआय, पीएसआय, डीसीपी, एसीपी अशाप्रकारचे आपल्याकडे असलेले पदांचे रँकींग आपण याठिकाणी निर्माण करीत आहात. "नाव नोंदणी करण्यात आलेले सदस्य या मंडळाचे सदस्य असतील" म्हणजे काय? नाव कोण नोंदणी करील? त्यांची अर्हता काय असेल? नाव नोंदणी करण्याचा अधिकार कुणाला असेल? त्यांच्याकडून कोणती कागदपत्रे आपण घेणार? मघाशी रेशनकार्डचा विषय उपस्थित झाला होता. आपण कुणाला रेशनकार्ड देऊ शकतो. त्यासाठी त्याच्याकडे कोणते आयडेंटिफिकेशन असले पाहिजे? त्याप्रमाणे यामध्ये कोणते आयडेंटिफिकेशन असले पाहिजे? हे सर्व केल्यानंतर आपण सुरक्षा दलाच्या सदस्याचे प्रमाणपत्र देणार. "सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्यास त्याच्या नियुक्तीनंतर" ही नियुक्ती कोण करणार? तुमच्याकडे नियुक्ती कोण मागायला येणार? आता असे झाले आहे की,सिध्दीविनायक मंदिराला आतंकवाद्यांचा धोका आहे. त्यासाठी 10 कोटीची भिंत बांधली. आता ते प्रकरण कोर्टामध्ये गेले आहे. त्या भिंतीची किंमत खरेच 10 कोटी आहे की नाही हा खरा प्रश्न आहे? हा 10 कोटीचा खर्च दाखविल्यानंतर हिंदुस्थान-पाकिस्तानच्या सीमेवर एखादी भिंत बांधली की काय? असे मला वाटले. नक्षलवादी भागातील पोलीस सुरक्षित रहातात, त्यांनी 5 वाजल्यानंतर बाहेर पडावयाचे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

जनतेला वाऱ्यावर सोडावयाचे, काय तुमची पोलीस यंत्रणा ? काय तुमचे आदेश ? तुमच्या पोलीस दलाचे काय वैभव आहे. 5.00 वाजल्यानंतर पोलिसांनी बाहेर पडावयाचे नाही. पोलिसांनी स्वत:च्या सुरक्षिततेसाठी जेलसारखी भिंत बांधलेली आहे. माझ्याकडे फोटो आहे, पण आता मी आणलेला नाही. नाहीतर तुम्हाला फोटोच दाखविला असता. ते पाहून वाईट वाटले. तेथे तटबंदीसारखे बांधलेले आहे, वर वायरफेन बांधलेली आहे आणि तेथे बारीक-बारीक भोके ठेवलेली असून पोलीस कायम तेथे बंदुका घेऊन उभे आहेत. पोलिसांनाच नक्षलवाद्यांपासून भीती असेल तर मग ते जनतेचे नक्षलवाद्यांपासून काय रक्षण करणार आहेत? तेथील जनता वाऱ्यावर पडलेली आहे. सायंकाळी 5.00 वाजल्यानंतर ट्रॅफीक बंद केला जातो आणि मग नक्षलवाद्यांच्या ताब्यात सगळे गावकरी असतात. तुम्ही असे पोलीस तयार केले आहेत. मुंबईतील सिध्दीविनायक मंदिराच्या बाबतीत सांगवयाचे तर तेथे संरक्षणासाठी एक भिंत बांधण्यात आली आणि ते प्रकरण कोर्टामध्ये गेले. ही भिंत बांधल्यापासून अजूनही एकदा देखील गेलो नाही. ते देऊळ माझ्या मतदार संघामध्ये आहे. ज्यावेळेला मंदिराच्या कळसावर झाडे उगवत होती आणि शेवाळ निर्माण होते, फारसे कोणीच तेथे जात नव्हते, तेव्हा आम्ही सिध्दिविनायक मंदिरामध्ये जात होतो. तेव्हा तेथे एक हारवाला होता आणि त्याला जागा देणार नाही असे सांगण्यात आले होते. तेव्हा मी त्याचा जागेचा प्रश्न येथे मांडला होता. हा विषय कसा निर्माण झाला ? तर विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, "सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्यांस त्याच्या नियुक्तीनंतर" या नियुक्त्या कोण करणार आहे ? त्या कशा साठी करणार ? त्या कोणासाठी करणार ? मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, पोलीस दलामध्ये माणसे कमी असल्यामुळे जेथे जेथे पोलिसांची आवश्यकता आहे, तेथे यांची नियुक्ती करणार" आता आमदारांच्या बरोबर सुरक्षेसाठी जे पोलीस जातात, ते देखील अतिरिक्त झालेले आहेत, त्यांच्याबरोबर यांना देणार काय ? तसेच आमदार त्यांना स्विकारणार आहेत काय ? अशा प्रकारे नियुक्तीच्या बाबतीत सगळेच विषय आहेत. कारण अतिरिक्त पोलिसांचा भार सांभाळावा लागतो. पुढे असे म्हटलेले आहे की,"त्यांच्या नियुक्तीनंतर व्यवस्थापकीय संचालकांच्या किंवा व्यवस्थापकीय संचालक याबाबतीत प्राधिकृत करील अशा अन्य कोणत्याही पर्यवेक्षी अधिकाऱ्याच्या मुद्रेसह," म्हणजे परत हे अधिकारी खालच्या स्तरावर देत जावयाचे. पुढे म्हटलेले आहे की,"विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र मिळेल. असे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीकडे

. . . .3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सुरक्षा दलाच्या सदस्यांचे अधिकार निहित असतील." आता हा भरतीचा अधिकारच आहे. कोणाची भरती करणार आहात हे सांगितलेच पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, कोणत्याही परिस्थितीमध्ये 100 टक्के भूमीपूत्र असले पाहिजेत. 80 टक्के वगैरे भानगड नाही.100 टक्केच. कारण या महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईची ज्यांना जाण आहे, माहिती आहे, ज्यांना सर्व रस्ते माहिती आहेत, ज्यांच्याकडे अनुभव आहे, असेच लोक सुरक्षा रक्षक असावयास पाहिजेत. जर आपण बांगला देशी लोक भरली तर काय होईल ? मी माननीय सभापतींना विनंती केली होती की, सदरहू विधेयकावरील चर्चा पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात यावी, कारण मुंबई शहराच्यादृष्टीने हा अत्यंत गंभीर विषय आहे. याठिकाणी आम्हाला सरकारने आणलेले विधेयक अडवून ठेवावयाचे नाही.पण जर आम्हाला या विधेयकामध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या असतील किंवा उप सूचना सुचवावयाच्या असतील तर त्यासाठी वेळच मिळालेला नाही. तुम्ही त्यासाठी काही सवलतच देत नाही. त्यामुळे आम्हाला येथे चर्चा करताना बोलावे लागते. पण ते बोलून देखील काही उपयोग नाही हेही आम्हाला समजते. माननीय मंत्री महोदय उत्तर देऊन खाली बसणार, मग अधिकारी काखेमध्ये फाईल घेऊन जाणार आणि तुम्हाला समाधान मिळणार की, चला, विधेयक पास झाले आणि बाहेर पडणार. सरकार म्हणजे मेळावा झालेला आहे. गांभीर्य वगैरे काही नाही. माझा असा समज होता की, आम्ही जेव्हा विधेयकाला सुधारणा न सुचविता येथे बोलतो, त्यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व टिप्पणे लिहून घ्यावयाची असतात. मग त्यावर सखोल विचार करावयाचा असतो आणि हे सगळे करीत असताना जर आपल्याला विधेयकाच्या बाबतीत काही बदल करावा असे वाटले तर मग त्यादृष्टीने सुधारणा केलेले नवीन विधेयक पुढच्या अधिवेशनामध्ये आणणे हे आम्हाला सरकारकडून अभिप्रेत आहे. जर विधेयकामध्ये काही उणिवा राहिल्या असतील तर उणिवांसकट मंजूर केलेले विधेयक पुन्हा त्यादृष्टीने दुरुस्ती आणणे हा या चर्चेचा प्रोसेस आहे.पण तुम्हाला असे वाटते की, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे रहातात, बोलतात. पण तसे नाही. आपण समाजाच्या विविध भागातून येथे आलो आहोत. आपल्याला विविध अनुभव आलेले आहेत. अशा वेळी एखाद्या कायद्यामध्ये काय असावे याविषयी मत मांडत असतो. यामध्ये काही चुकीचे असेल तर ते सोडून द्यावयाचे आणि येथील विचार मंथनातून काही बरोबर वाटले तर मग

. . . .3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

विधेयकामध्ये तशा प्रकारची दुरुस्ती करुन,मग पुढील अधिवेशनामध्ये सरकारला दुरुस्तीसह विधेयक मांडण्याची एक सवड मिळते.

(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, कायदा हा सर्वंकष आणि व्यवस्थित असला पाहिजे, ही भूमिका आहे. जे विचारमंथन आपण या ठिकाणी करतो त्या विचारमंथनातून कायदा निर्माण व्हावा ही अपेक्षा असते. गंमत म्हणून चर्चा नसते. किती वेळ बोलणार यापेक्षा काय बोलणार याला महत्व असते. कितीही वेळ बोलावे अशा प्रकारचा कायदा जर याठिकाणी निर्माण होणार असेल तर ती आपली कायदा निर्मितीची कमकुवतता आहे. हा माननीय मंत्रिमहोदयांचा विषय नाही. तो विधी व न्याय विभागाचा विषय आहे. विधी व न्याय विभाग परिपक्व असतो असे नाही. तो परिपक्व नाही असे माझे ठाम मत आहे. दोन इंजिनियर, दोन वकील, दोन डॉक्टर हे कधीही एका विचाराचे नसतात.आम्ही तर अज्ञानी माणसे, कायद्याचे ज्ञान नसलेली माणसे, पण समाजाकडून ज्ञान घेऊन या बाबतीत आम्ही काही सांगण्याचा प्रयत्न करतो. त्यामागे आम्हाला असा कायदा हवा, अशा प्रकारचा प्रयत्न असतो. म्हणून या नियुक्तीमध्ये 80 टक्के नव्हे तर 100 टक्के स्थानिकच असले पाहिजेत. राष्ट्रीय सुरक्षेचा, शहराच्या सुरक्षेचा, समाजाच्या सुरक्षेचा हा विषय असल्यामुळे याच्यामध्ये ही भानगड नाही. कलम 19(1) प्रमाणे मला हक्क आहे. चल नोकरी कर भांडी घास, धुणी धू, कर्मचारी बन, काहीही बन. पण सुरक्षितता म्हटल्यानंतर ज्याला स्थानिक पूर्ण माहिती आहे असाच माणूस असला पाहिजे ही भूमिका आहे. म्हणून तो 100 टक्के असला पाहिजे. खंड 7(1) मध्ये असे म्हटले आहे की,"असे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीकडे सुरक्षा दलाच्या सदस्याचे अधिकार निहित असतील. त्यास, विहित केल्याप्रमाणे ओळखपत्र व गणवेश देखील प्राप्त होईल." हे कशासाठी करण्यात येत आहे हे मला कळले नाही पण नवीन पोलीस फोर्स निर्माण करण्यात येत आहे त्यासाठी हे सगळे करण्यात येत आहे. आपले पोलीस वाढवा. पोलिसाचा धाक असतो. एक पोलीस उभा राहिला तर शंभर माणसे विचारात पडतात. एका पोलिसाचा जो धाक समाजामध्ये आहे तो धाक या सुरुक्षा रक्षकांमुळे निर्माण होणार आहे काय? या सुरक्षा रक्षकाच्या बाबतीत काय प्रोव्हिजन केली आहे? तो एखाद्याच्या बकोटीला धरुन पोलीस स्टेशनला नेऊ शकेल काय? आपल्या येथे आता अधिकाऱ्यांना मारतात, गँगस्टरवाले पोलिसांना मारतात अशी परिस्थिती आहे मग यांना कोण घाबरणार? म्हणून पोलीस वाढविणे हे हिताचे काम असताना याठिकाणी मंडळ निर्माण करण्यात येत आहे.प्रशिक्षण वगैरे सगळयाच्या बाबतीत याठिकाणी म्हटलेले आहे.खंड 8

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते. . . .

मध्ये असे म्हटले आहे की, "सुरक्षादलाच्या नावे नोंदणी केलेल्या सदस्यांसह सुरक्षा दलाच्या सदस्यांना, विनिर्दिष्ट केलेल्या प्रशिक्षण केंद्रातून किंवा संस्थेमधून, त्यांच्य कर्तव्याच्या संबंधात, विहित केलेले प्रशिक्षण घ्यावे लागेल." शासनाकडे प्रधान समितीचा अहवाल आला पण त्या अहवालावर या सभागृहात चर्चा होणार नाही. या अहवालामध्ये असे लिहिले आहे की 62 कोटी रुपये एका वर्षाला पोलिसांच्या प्रात्यक्षिक प्रशिक्षणाकरिता पाहिजेत. किमान तीन महिन्यातून एकदा तरी त्यांनी गोळी चालवून प्रॅक्टीस केली पाहिजे. असे असतांना त्यासाठी फक्त तीन कोटी रुपये देण्यात आले आहेत. सध्या असलेल्या पोलिसांनाच शासन प्रशिक्षण देऊ शकत नाही अशी परिस्थिती असताना आता हा आणखी 65 कोटी रुपये निधी देण्यात येणार आहे आणि त्या निधीमधून हे सगळे उभे करण्यात येणार आहे. आपल्याकडे पोलिसाचे कपडे घ्यायला,. सॉक्स घ्यायला, बंदुका द्यायला, अत्याधुनिक शस्त्र देण्यासाठी पैसे नाहीत. आपल्या पोलिसांना प्रबळ करण्यासाठी पैसे नाहीत अशी रडकथा आपण गातच असतो. प्रधान समितीच्या अहवालामध्ये हे सगळे आलेले आहे. ज्यांच्या हातामध्ये शासन आहे, ज्यांच्या हातामध्ये सामर्थ्य आहे, ज्यांच्या हातामध्ये कायद्याचा बडगा आहे त्याला हे शासन मजबूत करीत नाही आणि हे पैसे देऊन हे सुरक्षा रक्षक कशासाठी निर्माण करण्यात येत आहेत. आपल्या पोलिसांना वंचित ठेवून शासन काय मिळविणार आहे? हे सगळे प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात येत आहेत. या विषयी बोलावयाचे म्हटले तर किती बोलणार.? प्रत्येक कलमावर बोलण्याची वेळ या शासनाने आणलेली आहे. हे पर्यायी पोलीसदल निर्माण का करण्यात येत आहे? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, खूप सांगण्यासारखे आहे पण त्यावर न बोलता मी पुढे जातो. व्यवस्थापकीय संचालकांचे कार्य. यामध्ये काय म्हटले आहे. कोणाच्या डोक्यातून हा खंड काढण्यात आलेला आहे. 26/11 चा हल्ला झाल्यानंतर आमचे गुप्तचर खाते हे सबळ नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली, अशा प्रकारच्या उणिवा बाहेर आल्या. हा विषय गंभीर आहे खंड 13 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "तो गुप्तवार्ता संदेश मिळविण्यासाठी" सभापती महोदय, मी या ठिकाणी खंड 13 वाचतो माननीय मंत्रिमहोदयांनी ते ऐकावे. "सुरक्षा मंडळाचा व्यवस्थापकीय संचालक प्रमुख." आता अनामी रॉय सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांची सोय करण्यात येत आहे की काय मला माहीत नाही. तीच व्यवस्था मला या ठिकाणी दिसते.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत मत / शुद्धीपत्रक नाही

श्री. दिवाकर रावते .....

ते लाडके बाळ आहे, त्यांना तुम्हाला सांभाळले पाहिजे. काहीही झाले, कोर्टाने सांगितले तरी त्यांना धक्का लागू नये. अनामी रॉय यांना एवढे काय काय म्हणून लाडावून ठेवले आहे हे कळत नाही. कोणाला कमरेवर बसवावयाचे, कोणाला मांडीवर बसवावयाचे, कोणाला खांद्यावर बसवावयाचे, कोणाला डोक्यावर बसवावयाचे हा शासनाचा विषय आहे. या विधेयकात म्हटल्या प्रमाणे तो व्यवस्थापकीय संचालक मंडळाला माहिती देईल. या विधेयकाच्या खंड 13 (2) मध्ये असे म्हटले आहे की, "तो, गुप्तवार्ता संदेश मिळण्यासाठी महासंचालक व महानिरीक्षक आणि आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई आणि दुय्यम बहुविध अभिकरण समितीच्या सतत संपर्कात असेल.." He has got access to all? या ठिकाणी आताच पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होता कामा नये असे माननीय मंत्रिमहोदय श्री. आर. आर. पाटील म्हणाले. पोलिसांचे आत काहीही भांडण असले तरी पोलिसांचे मनोधैर्य खच्ची होऊ नये म्हणून अशी चर्चा आपण करु नये असे म्हणाले. हे सगळे उच्चपदस्थ अधिकारी आहेत, आय.जी., डी.जी, डी.आय.जी. ॲडिशनल डी.आय.जी, पोलीस कमिशनर या सगळ्यांना तो ॲक्सेसेबल आहे. त्याने त्यांच्याकडून गुप्तवार्तेची माहिती घ्यावयाची काय ? यामध्ये 'गुप्तवार्ता मिळविण्यासाठी' असा शब्द वापरलेला आहे. ही काय भानगड आहे ? The top rank and file of the State should be accessible to him. हा क्लॉज आपण कसा काय फ्रेम केला ? पुढे असे म्हटले आहे की, " त्यामुळे, इतर अनेक गोष्टींबरोबर महामंडळाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन करता येईल." ही काय भानगड आहे. हा संचालक कोणत्या पध्दतीचा असेल, कोणत्या ताकदीचा असेल ? त्याची अर्हता काय असेल ? ते अनामी रॉय असतील. आपण हे वाचावे. हा गंभीर भाग आहे. म्हणून मी माननीय सभापतींना सांगत होतो की, हे विधेयक थांबवावे आणि या विधेयकावरील चर्चा मार्चमध्ये घ्यावी. आम्हाला याबाबत अभ्यास करावा लागेल. या ठिकाणी सांगतात की, विधानसभेत विधेयक पास झाले आहे. विधानसभेमध्ये विधेयक पास झाले असले तरी या सभागृहाची सुध्दा एक वेगळी ओळख आहे. विधानसभेत मंजूर होऊन आलेली किती तरी विधेयके या ठिकाणी चर्चा झाल्यानंतर मागे घेतली गेली आहेत. सभापती महोदय, हे फार गंभीर वाटते. हा एकच क्लॉज असा आहे की, तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KTG/ SBT/ KGS

श्री. दिवाकर रावते .....

वाचल्यानंतर अंगावर शहारे उभे राहतात. यामध्ये 'गुप्तवार्ता संदेश मिळण्यासाठी' अशा पध्दतीचा उल्लेख केलेला आहे. त्यांना सगळी गुप्तवार्ता का द्यावयाची ? पोलीस खात्याची जी सिक्रसी आहे, गुप्तहेर खात्याने मिळविलेली जी माहिती आहे ती पोलिसांच्या कारवाईकरिता असते. पोलिसांना गुप्तवार्ता मिळाली तर त्यांनी त्याप्रमाणे त्यांचे दल सिध्द करावयाचे आहे. रोज जाता-येता रस्त्यामध्ये कठडे लावतात ते गंमत म्हणून लावत नाहीत. त्यामुळे ट्राफीक जॅम होते. काही तरी त्यांच्या डोक्यात असते. त्यांची नजर पक्की बसलेली असते. त्यातून त्यांना काय निर्माण करावयाचे ते करीत असतात. वाटेल त्या ठिकाणी वेड लागल्यासारखे कठडे लावत नाहीत. कोठे तरी त्यांना टिप मिळालेली असते. ती फुकट जाईलही, परंतु सावधगिरी म्हणून पोलीस हे सगळे करीत असतात. अशा प्रकारचे गुप्तवार्ता संदेश मिळविण्यासाठी हा सर्वांना भेटणार. हा कायदा पास झाल्यावर ती वार्ता त्यांना देण्याचे बंधन आता त्यांच्यावर आले. हे वाचल्यानंतर तसा आमचा समज झाला आहे. माझ्याकडे या बिलाची इंग्रजी प्रत आली नाही. इंग्रजीमध्ये नक्की काय शब्दरचना केली आहे ते वाचले पाहिजे. हे कलमच मला गंभीर वाटते.

सभापती महोदय, या बिलामध्ये पृष्ठ क्रमांक 7 वर खंड (18) (2) मध्ये असे म्हटले आहे की, "सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्यास, त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडे सोपवलेली शस्त्रास्त्रे वापरण्याचा अधिकार असेल." ही काय भानगड आहे. ? म्हणजे आपण हे सशस्त्र दल निर्माण करीत आहात. मी म्हणालो त्याप्रमाणे आपल्या पोलीस खात्याच्या नाकर्तेपणाची आपणच या ठिकाणी कबुली देत आहात. आपले पोलीस दल विकलांग झाले आहे काय ? सुरक्षा दलामध्ये भरती झालेला प्रत्येक सदस्य सशस्त्र असेल. आपल्या पोलिसांना शस्त्रे देण्याकरिता आपल्याकडे पैसे नाहीत आणि यांना आपण सशस्त्र बनवावयास निघाला आहात. ही काय भानगड आहे ? विधेयकावर चर्चा करावयाची की नाही हा विषय जेव्हा येतो त्यावेळी हे सर्व वाचल्यानंतर अंगावर शहारे निर्माण होत आहेत. आपण काय करणार आहात ?

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, लोकसभेमध्ये तत्कालीन गृहमंत्री श्री.शिवराज पाटील-चाकूरकर यांना असा प्रश्न विचारला होता की, या देशात किती बांगलादेशी नागरिक घुसले आहेत. त्यावेळी त्यांनी देशात 3.5 कोटी बांगलादेशी नागरिक घुसले आहेत आणि त्यापैकी 75 टक्के नागरिक मुंबई, ठाणे व नवी मुंबईमध्ये आहेत असे लोकसभेत उत्तर दिले आहे, जे रेकॉर्डवर आहे. त्या नागरिकांना आता 15 ते 20 वर्षे झाली आहेत. ते नागरिक या सुरक्षा रक्षक मंडळात घुसतील. या विधेयकात असे नमूद केले आहे की, "सुरक्षा दलाच्या प्रत्येक सदस्याला, त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यांच्याकडे सोपविलेली शस्त्रात्रे वापरण्याचा अधिकार असेल" म्हणजे ही कॅन फायर, ही कॅन कील, सभापती महोदय, पोलिसांनी सुध्दा कारण नसताना शस्त्र वापरले तर त्याची चौकशी केली जाते, चौकशी आयोग नेमला जातो. एखाद्या प्रसंगी पोलिसांनी गोळीबार केला, लाठीमार केला तर त्या कृतीविरुध्द दबाव निर्माण होतो, पक्ष उभे राहतात, त्या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली जाते. म्हणजे पोलिसांना सुध्दा शस्त्र वापरताना विचार करावा लागतो....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कृपया खाली बसावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री.अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नाशिक विभागातील पदवीधर मतदार संघातर्फे निर्वाचित डॉ.सुधीर भास्कर तांबे यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

डॉ.सुधीर भास्कर तांबे यांनी शपथ घेतली.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

पृ.शी.: विदर्भ विकास कार्यक्रम

मु.शी.: विदर्भ विकास कार्यक्रमासंबंधी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

सभापती महोदय, आपण मला निवेदन करण्यासाठी अनुमती दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, नागपूरमध्ये होत असलेल्या हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भातील एकूण विकासाच्या कामासंबंधी विधानसभेत व विधानपरिषदेत चर्चा झाली. या चर्चेच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी आपल्या माध्यमातून विदर्भाच्या विकासाच्या कामासंबंधी ज्या अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत त्याची पूर्तता करण्यासंबंधी शासनाची भूमिका सकारात्मक राहिली आहे. या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या किंवा अन्य आयुधांच्या माध्यमातून जे प्रश्न उपस्थित केले गेले त्या सर्व प्रश्नांसंबंधी मंत्रिमहोदयांच्या मार्फत किंवा मी माझ्यावतीने न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अशोक चव्हाण पुढे सुरु....)

पण आज या अधिवेशनाचा समारोप होत असताना विदर्भाच्या विकासाच्या बाबतीत काही महत्वाचे निर्णय सभागृहाला अवगत करावयाचे आहेत. या निर्णयामुळे विदर्भातील विविध विकासाच्या कामांना चालना मिळेल. म्हणून त्यांसदर्भातील माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भातील विकासाच्या कामाबाबत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत दिरंगाई होत असल्यामुळे कामे लवकर होत नाहीत असे निदर्शनास आले आहे. प्रामुख्याने विदर्भातील विविध विभागातील पदे रिक्त असल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. राज्यामध्ये सर्वच ठिकाणी पदे रिक्त आहेत. त्यामध्ये विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त आहेत. विदर्भानंतर मराठवाडयाचा नंबर लागतो, त्यानंतर कोकणचा नंबर लागतो, त्यानंतर मुंबई आणि पुण्याचा नंबर लागतो. जे लोक नियुक्त होतात ते कालांतराने आपापल्या गावी परत जातात. जागा रिक्त राहिल्यामुळे त्या भागातील विकास कामांना न्याय मिळत नाही. म्हणून राज्यामध्ये एमपीएससी मार्फत वर्ग अ आणि वर्ग ब अधिका-यांची नियुक्ती करताना ती आय.ए.एस. आणि आय.पी.एस. केडर प्रमाणे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आय.ए.एस. आणि आय.पी.एस. ह्या केन्द्र शासनाने केलेल्या केडर्स आहेत. एकदा केडर दिल्यानंतर ती बदलता येत नाही. त्याच पध्दतीने राज्यामध्ये एमपीएससीच्या माध्यमातून यापुढे भरती होईल. अ आणि ब वर्गातील अधिका-यांची रिजनल केडर निर्माण केली जाईल. एखाद्या अधिका-याची एका विभागामध्ये नियुक्ती झाल्यानंतर एक विशिष्ट कालावधीकरिता त्या अधिका-याला तेथे काम करावे लागेल. तो कालावधी पूर्ण झाल्या शिवाय त्याला अन्य विभागात काम करण्याची संधी दिली जाणार नाही.अशा प्रकारची रिजनल कॅडर एमपीएससीच्या माध्यमातून करण्याचा निर्णय आम्ही घेत आहोत. त्यासाठी नियमामध्ये आवश्यक ते बदल केले जातील. मला खात्री आहे की, नव्याने घेतलेल्या निर्णयामुळे अविकसित भागातील रिक्त जागा भरण्यास मदत होणार आहे. विदर्भाच्या विकासाच्या अनुषंगाने आम्ही जे निर्णय घेत आहोत किंवा घेतलेले आहेत त्यांच्या अंमलबजावणीमध्ये सातत्य राहावे, संनियत्रण रहावे म्हणून राज्याचे मुख्य सचिव त्या कामी लक्ष देतील आणि राज्याचा मुख्य म्हणून मी देखील त्या कामाचा आढावा घेत राहीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अशोक चव्हाण....

सभापती महोदय, या ठिकाणी आणखी एका निर्णयाचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. दोन्ही सभागृहामध्ये सिंचनाच्या बाबतीत विस्तृत चर्चा झाली. सिंचन प्रकल्पासाठी मुबलक निधी उपलब्ध व्हावा, अपुरी कामे वेगाने पुढे जावीत अशा प्रकारची मागणी करण्यात आली. राज्यातील सर्वात मोठ्या अशा गोशीखुर्द प्रकल्पाच्या संदर्भात काल मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. या प्रकल्पासाठी ज्या लोकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत, ज्यांच्या जमिनीचे निवाडे घोषित केल्यानंतर प्रत्यक्षात निधीचे वाटप होण्यामध्ये दिरंगाई झालेली आहे त्याबाबतीत त्या रकमेवर व्याज द्यावे लागणार आहे. निवाडा घोषित झाल्यानंतर पैसे उपलब्ध करुन दिले जातात. परंतु गोशीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प असून त्यातील 90 टक्के हिस्सा हा केन्द्राचा आणि 10 टक्के हिस्सा हा राज्य शासनाचा आहे. साडेसात हजार कोटीच्या या प्रकल्पामुळे विदर्भातील सिंचनामध्ये वाढ होणार आहे. या प्रकल्पाच्या बाबतीत निवाडा जाहीर झाल्यानंतर वेळेवर पैसे न दिल्यामुळे त्या पैशावर आता व्याज देण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्याच बरोबर प्रकल्पग्रस्तांसाठी गावठाणामध्ये व्यापारी संकुल बांधण्याचा विषय असो, पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षण देण्याचा विषय असो, प्रकल्पग्रस्त कुटुंबाना इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलांचा लाभ देण्याचा विषय असो या सर्व बाबतीत एक विशेष बाब म्हणून 150 कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

या नवीन धोरणात्मक निर्णयानुसार अपेक्षा एवढीच आहे की प्रकल्प रखडू नयेत त्यातील पुनर्वसनाची कामे मार्गी लागावी अशा प्रकारे प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची शासनाची भूमिका राहणार आहे. त्याचबरोबर निम्न पैनगंगा प्रकल्पाचा बाबतीत चालू वर्षात 60 कोटी रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. वन प्रकल्पाच्या बाबतीत एनपीबी साठी 170 कोटी रुपये शासन देणार आहे. गोंदिया जिल्ह्यातील रझेगांव-काटी व तेडवा-शिवनी उपसा जलसिंचन योजनेसाठी सन 2010-11 या आर्थिक वर्षात भरीव निधी देण्याचा शासनाचा विचार आहे. तसेच विदर्भात सध्या जी कामे सुरु आहेत त्यात 240 प्रकल्प प्रत्यक्षात सुरु आहेत ती कामे पूर्ण व्हावीत म्हणून यावर्षी 3115 कोटी एवढा निधी उपलब्ध असून त्यातून 20 प्रकल्प पूर्ण होण्याचे आपले उद्दिष्ट आहे. निश्चितच या आर्थिक वर्षाअखेर ही 20 प्रकल्पांची कामे या निधीतून पूर्ण केली जाती. त्यात मोठा 1 प्रकल्प, मध्यम 3 प्रकल्प आणि 16 लघुसिंचन प्रकल्प अंतर्भुत आहेत. असे हे 20 प्रकल्प आहेत. हे काम पूर्ण झाल्यानंतर साधारणत: 57577 हेक्टर एवढे सिंचनक्षमतेचे उद्दिष्ट आपण गाठू शकू. हे सर्व करीत असताना प्रामुख्याने अनेक जिल्ह्यांतील विविध प्रश्नही सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित केले त्यासंदर्भात मी थोडक्यात उल्लेख करणार आहे. कारण आमदार व लोकप्रतिनिधींमार्फत अशा मागण्या आल्या आहेत. त्या अनुषंगाने हा निर्णय शासन आज घेत आहे.

राज्यात पर्यटन हा एकमेव जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करुन देण्याचे पोटेन्शियल असलेला विषय आहे. याचा विचार करुन शासनाने बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराचा विकास करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी एक कोटी एवढी रक्कम देऊन छोटीसी सुरुवात केली आहे. आवश्यकतेनुसार निधीची गरज पडेल तेव्हा पुन्हा निधी देता येईल. चंद्रपूर जिल्ह्यातील माणिकगड किल्यातील विष्णू मंदिर परिसराचा विकास करण्यासाठी 1 कोटी रुपये निधी देण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचबरोबर लखोजी जाधव वाडा, मौ. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा येथील संरक्षित स्मारकाचे जतन व दुरुस्ती यासाठी शासनाने 50 लाख रुपयांचा निधी देण्याचे ठरविले आहे. त्यानंतर नागपूर येथील वस्तू संग्रहालयाचेही जतन व दुरुस्ती यासाठी 50 लाख रुपये देण्याचे ठरविले आहे. या निमित्ताने आदिवासींची कला आणि संस्कृती जोपासण्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

बाबतीत एक वेगळे दालन आपण या वस्तू संग्रहालयाच्या माध्यमातून निर्माण करीत आहोत व या अनुषंगाने अशा अनेक गोष्टी त्यात जनत ठेवल्या जातील. सुरुवात जरी छोटी असली तरी चालना देण्याच्या दृष्टीने ती पुरेशी आहे. त्याचप्रमाणे शासनाने "ॲडॉप्शन" ही एक नवीन योजना जाहीर केली असून जे खाजगी लोक या क्षेत्रात येऊ इच्छितात, गुंतवणूक करु इच्छितात किंवा स्मारकांचे जतन करण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांनाही प्रोत्साहन देण्यासंबधीचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला व त्या माध्यमातून सुध्दा या कामाला गती देता येईल.

सभापती महोदय, आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत आदिवासी भागात एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा आम्ही सुरु करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार सन 2009-10 मध्ये 10 निवासी शाळा, सन 2010-11 मध्ये 10 निवासी शाळा तसेच सन 2011-12 मध्ये 5 निवासी शाळा अशा प्रकारे एकूण 25 निवासी शाळा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना गडचिरोली चंद्रपूर, यवतमाळ, अमरावती, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये लागू करण्याचे ठरविले आहे. आजपर्यंत फक्त नागपूर जिल्ह्यातच ही योजना लागू केली होती. वन क्षेत्राच्या माध्यमातून आदिवासी लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी बांबू लागवड, अगरबत्ती आणि मधनिर्मिती जी करण्याचे ठरविले आहे त्याबाबत सुध्दा या योजनेअंतर्गत पुढील तीन वर्षात प्रत्येक वर्षी 10 हजार प्रमाणे 30 हजार लाभार्थ्यांना या योजनेचा थेट रोजगार मिळणार आहे. अशी भूमिका शासनाने घेतली आहे. त्यात लाभार्थ्यांचे सिलेक्शन करणे वगैरे कामे असतील. वन्य प्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्याची योजनाही शासनाने आखली असून सोलार कुंपन घालण्याचे ठरविले असून सन 2009-10 मध्ये 10 हजार आणि सन 2010-11 मध्ये 15 हजार शेतकऱ्यांचे उद्दिष्ट आपण ठरविले आहे. अशा प्रकारे दोन वर्षात विदर्भात वसतिगृहांची जी सध्याची क्षमता 5 हजार आहे त्यात वाढ करणार असून सन 2010-11 आणि 2011-12 मध्ये ही क्षमता वाढ आपण करणार आहोत. तसेच गडचिरोली आणि अमरावती या दोन जिल्ह्यांमध्ये भरती पूर्व वनसंरक्षक प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. जेणेकरुन जे वन खात्यात नोकरी करु इच्छितात त्यांच्या दृष्टीने हे काम शासन हाती घेणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

त्यामुळे स्थानिक उमेदवाराला वनरक्षक सेवेत घेण्यासाठी फार मोठी मदत होणार आहे. विदर्भातील आदिवासी जनतेकरिता प्रत्येक जिल्हयात एमपीएससी, युपीएससी तसेच तत्सम कॉम्पीटेटीव्ह एक्झ ाम आहेत या एक्झाममध्ये या तरुणांना उत्तीर्ण करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्यामध्ये 500 विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह सुरु करणार आहोत, या क्षेत्रातील तरुणांना त्यामुळे परीक्षांमध्ये यशस्वी होण्यामध्ये मदत होईल.

सभापती महोदय, विदर्भातील गुंतवणूक वाढावी अशी अपेक्षा असतांना उद्योग काढण्यासाठी जवळ जवळ 47 परवान्यांची आवश्यकता असते. या परवान्यांसाठी अनेक ठिकाणी जावे लागते, पाठपुरावा करावा लागतो त्यामुळे मोठया प्रमाणात विलंब होतो तसेच त्रासही होतो. हे टाळण्यासाठी वन विंडो क्लिअरन्सची लोकांची अपेक्षा होती. एकाच ठिकाणी, एकाच जागेवर सर्व परवाने आणि परवानग्या मिळाल्या पाहिजेत अशी जनतेची मागणी होती. त्यामुळे सुरुवात म्हणून "उद्योग सेतुची" सुरुवात प्रथम नागपूर व अमरावती येथे करण्यात येणार आहे. त्यामुळे तातडीने उद्योग हाती घेता येतील.

सभापती महोदय, कृषी औद्योगिक धोरणाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा झाली आहे. राज्यातील कृषी मालाच्या आधारावर राज्यात उद्योग आणता आले पाहिजे, विशेषत: विदर्भाच्या अविकसीत भागामध्ये कृषी मालावर प्रक्रिया करणा-या उद्योगाची अपेक्षा आहे. त्यामुळे राज्याचे कृषी औद्योगिक धोरण जानेवारी महिन्याच्या शेवटपर्यंत आणले जाईल. या धोरणामुळे ॲग्रो प्रोसेसिंगला मोठया प्रमाणात फायदा होऊ शकेल. संत्रा, कापूस, सोयाबीन, धान या मालासाठी नवीन धोरणाचा निश्चितपणे फायदा होईल. सामुहीक योजना 2007 जी आहे त्यामध्ये वेगळी सुधारणा करुन क्लस्टर डेव्हलपमेंट निर्माण करुन विदर्भातील लहानातल्या लहान लोकांना सामावून घेण्यात येईल व या लहानातल्या लहान लोकांना यामुळे फायदा होईल.

सभापती महोदय, रेडीमेड गार्मेंटच्या संदर्भात असो, चंद्रपूरच्या फ्लाय ॲशच्या बाबतीत असो जे लहान लहान स्वरुपाचे घटक आहेत त्यांना समुह विकास घटक योजनेत घेऊ. लहान लहान क्लस्टरची विदर्भात ज्या ठिकाणी क्षमता आहे त्या ठिकाणी निर्माण करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

सभापती महोदय, शालेय शिक्षणात पायाभूत सुविधा मोठया प्रमाणात निर्माण व्हाव्यात यासंबंधी सगळीकडेच मागणी होत आहे. सन 2010-11 मध्ये 1374 व सन 2011-12 मध्ये 1305 शाळा खोल्या बांधण्यात येणार आहेत. विदर्भात शाळा खोल्याची जी कमतरता आहे ती आपल्याला यामुळे दूर करता येईल. उच्च प्राथमिक शाळामध्ये 297 संगणक प्रयोगशाळा प्रतीवर्षी निर्माण करण्याचे प्रस्थावित केलेले आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या निधीच्या माध्यमातून संगणकाचे प्रशिक्षण तसेच नवीन संगणक घेण्याच्या बाबतीत यामुळे निश्चित फायदा होईल.

सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून अमरावती विभागातील पाच जिल्हे व नागपूर विभागातील सहा जिल्हयांमधील शाळांमध्ये वाचनालय सुरु करण्याच्या बाबतीत सुध्दा शासनाने निर्णय घेतला असून त्यासंदर्भातील अंमलबजावणी तातडीने सुरु करण्यात येईल.

सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील इयत्ता आठवीमध्ये शिकणा-या मुलींना लेडीज सायकल वाटप करण्याच्या संदर्भात धोरण आहे. या धोरणाची व्याप्ती अधिक वाढविता येईल. विदर्भातील 11 जिल्हयातील 21130 विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याबाबत योजना आहे त्यामध्ये राज्यातील 833 शाळापैकी विदर्भातील प्रत्येक जिल्हयामधून 76 शाळा प्रत्येकवर्षी निवडण्यात येतील. तसेच त्यांना त्या ठिकाणी संगणक प्रशिक्षण प्रयोगशाळा देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत चंद्रपूर व वाशिम येथे 100 खाटांचे स्त्री रुग्णालय व नवजात अर्भक केंद्र निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असून त्याकरिता आवश्यक तो निधी संबंधित विभागाकडून उपलब्ध करुन दिला जाईल हे मला या ठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, विदर्भातील कापूस उत्पादक भागामध्ये कॉटन प्रोसेसिंगच्या बाबतीत तसेच जिनिंग व प्रेसिंगच्या बाबतीतही अनेक ठिकाणी मागणी आलेली आहे त्यामुळे ही बाब लक्षात घेता विदर्भातील बंद पडलेल्या सहकारी जिनींग व प्रेसिंग मिल करिता खाजगी व यशस्वी जिनिंग व प्रेसिंग मिलच्या सहकार्याने खाजगीकरण व संस्थांच्या विलिनिकरणाच्या माध्यमातून पुनर्जिवित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

करण्याचा एक व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात येईल. ज्या मिल बंद पडलेल्या आहेत त्या सुध्दा यामुळे कामाला येतील तसेच बँका आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून या उद्योगाला चालना देण्याच्या बाबतीत शासन निर्णय घेत आहे.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनच्या बाबतीत विदर्भातील 11 जिल्हयांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कामे मंजूर झालेले आहेत. गोंदिया येथील काम पूर्ण झाले असून अन्य ठिकाणचे काम प्रगतीपथावर आहे. ही कामे पूर्ण करण्याकरिता जो काही निधी आवश्यक आहे तो निश्चितपणे दिला जाईल. या वर्षभरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाची कामे पूर्ण होतील व त्यामुळे जनतेला निश्चितपणे फायदा होणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण..

सभापती महोदय, विदर्भामध्ये 100 विद्यार्थी क्षमतेचे मुला मुलींचे 31 वसतिगृहे आणि 38 निवासी शाळा बांधण्याचे काम सुरु आहे .त्यालासुध्दा आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देऊन ही कामे आगामी वर्षात निश्चित पूर्ण होतील अशा प्रकारचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्या लक्षात घेता कृषी विभागाच्या बाबतीत शासनाने काही निर्णय घेतले आहे. त्याचबरोबर बी बियाण्यांच्या बाबतीत काही निर्णय घेतले आहेत. माननीय पंतप्रधानांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजेसच्या माध्यमातून उत्कृष्ट आणि चांगल्या प्रकारचे सुधारित व संकरित बियाणे शेतक-यांना उपलब्ध व्हावे अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला होता त्या पैकेजची मुदत आता संपत आली असून ही मुदत आम्ही आता वाढवत आहोत. त्या अनुषंगाने सुधारित आणि संकरित बियाणे शेतक-यांना उपलब्ध होईल. हा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.त्याचबरोबर ठिबक आणि तुषार सिंचनाच्या बाबतीत शासनाने आत्महत्याग्रस्त भागामध्ये एक लाख हेक्टर्स एवढे लक्ष्य निर्धारित केले होते ते लक्ष्य आतापर्यंत पूर्ण झालेले आहे. त्यामध्ये 50 हजार हेक्टर्सने वाढ करण्यात येणार असून हे लक्ष्य एक लाख हेक्टर्सवरुन दीड लाख हेक्टर्स करण्यात येणार असून अडचणीत आलेल्या शेतक-यांना त्याचा लाभ निश्चितपणे होणार आहे.

सभापती महोदय, पीक विमा योजनेच्या अंतर्गत विदर्भातील सहा जिल्हयात प्रमुख पीकसाठी विमा हप्त्यात सवलत देऊन विमा घेणा-या शेतक-यांना प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावित आहे व ही योजना पुढे चालू राहणार असून या योजनेअंतर्गत शेती पूरक योजनेसाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम 1 एप्रिल 2010 पासून सुरु करण्यात येणार आहे. संत्रा क्षेत्रात पाण्याचा निचरा होण्यासाठी नाला सरळीकरण योजना आम्ही हाती घेत आहोत. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी यासबंधीचा एक चांगला प्रयोग समोर आणला असून त्यातून निश्चितपणे फायदा होत आहे.त्याची अंमलबलावणी विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये करण्यासाठी आदेश काढत आहोत व त्याचा फायदा निश्चितपणे शेतक-यांना होणार आहे

सभापती महोदय, समूह शेती योजनेअंतर्गत शेतक-यांचे बचतगट तयार करुन त्यांची बॅन्केशी जोडणी करण्यात येणार आहे त्यामुळे शेतकऱ्याना कर्ज मिळविणे अधिक सुकर व अधिक सोयीचे होईल अशी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण ...

सभापती महोदय, कृत्रिम रेतन वाढविण्याच्या बाबतीत शासन काही कार्यक्रम हाती घेत आहे.वैरण विकासाचा कार्यक्रमसुध्दा हाती घेण्यात आलेला आहे.कालवड संगोपन योजनासुध्दा शासन हाती घेत आहे. त्याचबरोबर पशुवैद्यक दवाखान्याना मुलभूत सुविधा देणे आणि त्यांचे मजबुतीकरण करणे इत्यादी योजना आत्महत्याग्रस्त भागात सुरु करण्यात येणार आहेत.आत्महत्याग्रस्त भागातील शेतक-यांची आर्थिक अवस्था पाहिल्यानंतर या भागातील शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारावी आणि या भागात दुधाचे उत्पादन वाढावे त्याचबरोबर शेतक-यांना पूरक धंदा मिळावा याकरता या सगळया योजना हाती घेण्यात येत असल्यामुळे त्याचा फायदा त्या भागातील शेतक-यांना मिळेल अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षणाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, विदर्भातील एकूण 137 शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केन्द्रे सुरु असून त्यांची प्रवेश क्षमता 26 हजार 564 एवढी आहे. ही क्षमता वाढविण्याच्या बाबतीत आम्ही निर्णय घेत असून दुसरी आणि तिसरी पाळी सुरु करीत आहोत. त्यामुळे दहा हजार अधिक विद्यार्थ्यांना सामावून घेता येईल. 26 हजार अधिक 10 हजार अशा प्रकारे एकूण 36,564 पयर्त ही क्षमता वाढणार आहे.औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बांधकामाचा अनुशेष आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सहा प्रशासकीय इमारती व कार्यशाळेचे बांधकाम सुरु आहे व एका संस्थेचे बांधकाम अजूनही सुरु झालेले नाही. त्याचबरोबर 2 वसतिगृहाची बांधकामे चालू आहेत या कामासाठी 20 कोटी रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे .2010- 11 मध्ये अनुशेषाच्या अंतर्गत जो निधी मिळणार आहे त्यातून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची कामे मार्गी लागतील.

सभापती महोदय, स्थानिक उद्योगावर आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याच्या बाबतीतसुध्दा काही शैक्षणिक उपक्रमात बदल करण्याची अपेक्षा आहे. ॲग्रो प्रोसोसिंग युनिट असो, जीनिंग ॲन्ड प्रेसिंग युनिट असो, माईनिंग असो, फूड प्रोसेसिंग युनिट असो, पॅकेजिंगचे युनिट असो या सागळयासाठी एक मॉडयुलर एम्लॉयबल स्कील प्रोसेसिंग उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थानिक उद्योगावर आधारित अभ्यासक्रम सुरु करण्याच्या संदर्भात काही सूचना आहेत त्या सूचना शासनाने मान्य केल्या असून त्याबाबतीत नव्याने आदेश निर्गमित केले जातील या भागात उद्योग उभारण्यासाठी ज्यांना शिक्षण किंवा प्रशिक्षण धेण्याची आवश्यकता आहे त्यांना याचा फायदा निश्चित होणार आहे.

सभापती महोदय,अमरावतीमध्ये कला महाविद्यालय स्थापन करण्याच्या बाबतीत शासन निर्णय घेत आहे. सध्या राज्यात मुंबई येथे दोन कला महाविद्यालय व नागपूर आणि औरंगाबाद येथे प्रत्येकी एक कला महाविद्यालय आहे. राज्यात कला शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने सर्वसामान्य विद्यार्थ्यांना कला शिक्षणाचा लाभ व्हावा यासाठी अमरावती येथे एक नवीन कला महाविद्यालय सुरु करण्यात येईल.विदर्भातील शासकीय तंत्र निकेतनासाठी दुसरी शिफ्ट आम्ही सुरु करीत आहोत .....

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ...

ज्यामुळे आपल्याला तेथील पॉलिटेक्निकची क्षमता देखील वाढविता येईल., अशा प्रकारचा आमचा विचार आहे. विभागातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेच्याबाबतीतील काही विषय होता. तेव्हा त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की,इंजिनिअरींग कॉलेजांची प्रवेश क्षमता देखील आम्ही वाढवित आहोत की ज्यामुळे इंजिनिअरींग कॉलेजांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांना आपल्याला अधिक क्षमतेने त्यात प्रवेश देता येईल.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या काही महत्त्वाच्या योजना आहेत. एक तर नागपूर मंडळास साधारणपणे आम्ही कायद्यांतर्गत मंजूर केलेल्या 24 हेक्टर जमिनीचा ताबा दिलेला आहे. पण अजून जागेची गरज लक्षात घेता, कारण नागपूर आणि अमरावतीमध्ये वाढणारे नागरीकरण याचा विचार करून जो अल्प उत्पन्न गट आहे, ज्याला अफोर्डेबल हौसिंगची आवश्यकता आहे, कमी उत्पन्नातील घर आपल्याला मिळावे अशी ज्याची अपेक्षा आहे, अशा मंडळींना देखील आपल्या स्वत:च्या मालकीची घरे देता यावीत म्हणून शासनाकडून 552 हेक्टर जमिन दोन महिन्यांच्या कालावधीत गृहनिर्माण मंडळाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल. विदर्भातील नागपूर व अमरावती या दोन शहरांमध्ये सध्या 1.2 इतका एफएसआय आहे, ते वाढवून अडीच करण्याचा निरर्णय आम्ही घेत आहोत. ज्यामुळे अमरावतीमध्ये सध्या जी 10 हजार घरे आहेत ती वाढवून 15 हजार पर्यंत आम्हाला देता येतील म्हणजे पहिली 10 हजार अधिक ही वाढवून दिलेली 15 हजार अशी एकंदर 25 हजार घरे ही अमरावतीत उपलब्ध होतील आणि नागपूरमध्ये साधारणत: 40 हजार घरे आपण बांधलेली आहेत त्याबरोबरच आता अडीच एफएसआय केल्यामुळे नव्याने 40 हजार घरे नागपूरमध्ये उपलब्ध होतील अशा प्रकारे एकूण 80 हजार घरे नागपूरमध्ये उपलब्ध होणार आहेत. सभापती महोदय, एम्प्रेस मिलच्या नं.5 च्या जागेतील जी जागा म्हाडाला घरे बांधण्यासाठी म्हणून देण्यात आली आहे, त्या ठिकाणी म्हाडा सिटी योजना उभी राहणार आहे. त्यासाठी म्हाडाच्या नागपूर मंडळाने 2003 मध्ये महाराष्ट्र वस्त्रोद्योग विकास महामंडळाकडून विकत घेतलेल्या जमिनीवर 2 व 3 बेडरूम-किचनचे 320 उच्च उत्पन्न गटाच्या सदनिका बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच वाणिज्यिक वापरासाठी 24078 चौ.मीटर जागा निविंदांद्वारा भाडेपट्ट्याने देण्याचाही आपण निर्णय घेतलेला आहे. नागपूर शहरातील उच्च उत्पन्न गटासाठीची ही जी कामे आहेत ती देखील पुढील दोन वर्षात उपलब्ध होतील आणि त्यासाठी आवश्यक तो

.... 3पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ...

निधी हा निश्चितपणे दिला जाईल. सभापती महोदय, एनआयटीच्या मार्फत गुंठेवारीमध्ये देखील बीएसयुपीच्या योजना राबविण्याच्या बाबतीत काही कल्पना पुढे आलेल्या आहेत. त्यामुळे जो पैसा एनरआयटीकडे उपलब्ध नाहीए अशा हिश्श्याची 35 टक्के रक्कम म्हणजे जवळपास 36 कोटी रूपये ही शासनाच्या माध्यमातून आम्ही एनआयटीला देणार आहोत. की ज्या माध्यमातून गुंठेवारीच्या क्षेत्रामध्येदेखील बीएसयुपीच्या अंतर्गत आपल्याला हे काम सुरू करता येईल. त्यामुळे नागपूर मधील बीएसयुपीची कामे वा नागपूर विभागातील आयएसडीपीची कामे असोत, किंवा अमरावती विभागातील घरकुलांची कामे असोत, साधारणपणे 60 हजार घरे आपण 2012 पर्यंत आपण उपलब्ध करून देणार आहोत. असा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आपण हाती घेतलेला आहे आणि त्यासाठी आवश्यक तो निधी निश्चितपणे दिला जाईल आणि 2012 पर्यंत हे काम पूर्ण केले जाईल.

सभापती महोदय, एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम अमरावती मंडळामार्फत एकूण 21 महानगरपालिका व नगरपरिषदांचे 22 हजार 322 घरकुले मंजूर आहेत. त्या महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी 492 घरकुलांची कामे पूर्ण केली आहेत व उर्वरित कामेदेखील पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मदत ही निश्चितपणे केली जाईल.

सभापती महोदय, चंद्रपूरला देखील अशा प्रकारे म्हाडाच्या माध्यमातून नवी टाऊनशीप करण्याच्यादृष्टीने प्रस्ताव आहे. त्याही कामासाठी ज्या पायाभूत सुविधा निर्माण करावयाच्या आहेत त्यासाठी 27 कोटी रूपये शासनाच्या माध्यमातून निश्चितपणे दिले जातील. सभापती महोदय, धडक विहिरीच्या कार्यक्रमामध्ये कालच मी आढावा घेतला. आत्महत्याग्रस्त भागामध्ये ज्या काही आत्महत्या घडत आहेत त्या मागील जी काही कारणे शोधण्यात आली त्यात सिंचनाचा प्रश्न तर आहेच. सिंचनाचे प्रकल्प हे लवकर मार्गी लागले पाहिजेत. त्यासाठी निधी वेळेवर मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना जोडधंद्याचाही देखील फायदा झाला पाहिजे. तसेच आपण त्यांना आता विहिरी देखील उपलब्ध करून देत आहोत. त्याचाही जो एक धडक कार्यक्रम अपेक्षित होता त्यालाही गती देण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात आज जी निवड करण्याची प्रक्रिया आहे, आमदार, पालक मंत्री वगैरे मार्फत नेहमीप्रमाणे आपण ते करतो. पण त्याही पद्धतीला फार विलंब लागतो अशाही तक्रारी आहेत. म्हणून विशेषत: या सहा जिल्ह्यांकरिता, सभागृहाला मला विश्वासात यासाठी घ्यायचे आहे

..... 3पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ...

की, याबाबतीत आजची जी प्रचलित पद्धत आहे त्याबाबतीत किमान या सहा जिल्ह्यांसाठी तरी काही वेगळा निर्णय घेण्याची गरज आहे. जेणे करून या विहिरी देण्यातील विलंब टाळता येईल. आणि खऱ्या गरजू शेतकऱ्याची निवड यासाठी करता येईल. अशा प्रकारची अपेक्षा निश्चित आहे.

सभापती महोदय, बांबूच्याबाबतीत बांबू वापर वाढविण्याच्या बाबतीत काही विषय अपेक्षित आहेत. विदर्भात मोठ्या प्रमाणात बांबूचे उत्पादन आहे. एकूण उत्पादनापैकी 40हजार मे.टन बांबू विदर्भातीलच कुटीरोद्योगांसाठी वापरण्याचा शासनाचा निर्धार आहे आणि बुरूड कुटुंबांना स्वतःचे अत्यल्प स्वामित्व शुल्क देऊन त्यांना सवलतीच्या दरात बांबू उपलब्ध व्हावा अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... 3क्यू 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

त्यासबंधीचे आदेश लवकरच निर्गमित करण्यात येतील. सभापती महोदय, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे काम अधिक सक्षम करण्याच्या बाबतीत काही ठराविक कालावधीसाठी बांबू व बांबूपासून तयार करण्यात आलेल्या वस्तूंवर जकात असो, वॅट असो, किंवा इतर करामध्ये सुध्दा सवलत देण्याची गरज असेल तर त्याही बाबतीत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल. बांबू लागवडीच्या बाबतीत एमआरईजीएसमार्फत असो किंवा राज्य शासनाच्या ईजीएसमार्फत असो त्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील. ज्यामुळे बांबू उत्पादनावर जो विपरीत परिणाम झालेला आपणास पहावयास मिळतो, तो एमआरईजीएसच्या माध्यमातून नवीन लागवड झाल्यानंतर फायदा होणार आहे. कमी किंमतीच्या घरकुलामध्ये सुध्दा किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बांधकामामध्ये सुध्दा बांबूचा वापर अधिक वाढावा यासाठी प्रयत्न केला जाईल. सभापती महोदय, बांबूच्या लागवडीकरिता व वहातूकीकरिता परवाना देण्याची गरज पडते. त्या परवान्यामध्ये सूट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अशाप्रकारे याठिकाणी महत्वाचे निर्णय सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून काही महत्वाच्या योजना सभागृहासमोर सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर कामठी रोड ,नागपूर या सेवाभावी संस्थेस अनुदान देण्याचा विषय आहे. नागपूर शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. नागपूर शहरामध्ये दीक्षा भूमिव्यतिरिक्त कोणतेही व्यासपीठ नाही. त्यामुळे विदेशातून नागपूरमध्ये मोठया प्रमाणात युवक येतात. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी लाल गोडाऊनजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र उभारुन त्या परिसराचा सर्व सोयींनी युक्त विकास करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. त्याकरिता आम्ही 10 कोटी रुपये देणार आहोत. त्या माध्यमातून या करमेंशन सेंटरचा विकास केला जाईल.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी स्वर्गीय श्री. वामनराव गोडबोले यांच्याकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ वस्तू, कोट-टाय, चश्मा व त्यांनी दैनंदिन स्वरुपामध्ये ज्या वस्तू वापरल्या त्याचा संग्रह आहे. त्यांचा गाऊन आहे, टाईपरायटर इत्यादी बऱ्याचशा गोष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वापरल्या त्या वस्तूंचे जतन करण्यासाठी वेगळे संग्रहालय करण्याची मागणी समोर आली आहे. हे लक्षात घेता ट्रस्टच्या ताब्यात असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. अशोक चव्हाण...

14 एकर जमिनीच्या परिसरामध्ये अंतर्गत रस्ते सुशोभित करुन एक चांगले संग्रहालय उभे केले जाईल. त्यासाठी शासनाच्या माध्यमातून 5 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले जातील.

सभापती महोदय, त्याचबरोबर 200 वर्षापूर्वीचा भोसले कालीन फुटाळा तलाव आहे, तो सुमारे 125 एकरामध्ये उभारलेला आहे. सन 2003 पर्यंत हा सर्व परिसर गलिच्छ होता. यासाठी नगरविकास विभाग व नागपूर सुधार प्रन्यास यांनी साडे तीन कोटी रुपये खर्च करुन त्यापैकी काही भाग सुशोभित करण्यात आला आहे. याठिकाणी शहरातील नागरीक व पर्यटक मोठया प्रमाणावर पर्यटनासाठी येतात. हे लक्षात घेता या स्थळावर बुध्दिष्ट थीम पार्क उभारुन सर्व नागरी सुविधा उपलब्ध करण्याचा शासनाचा मनोदय आहे.त्याकरिता 10 कोटी रुपये शासनाच्या माध्यमातून दिले जातील. त्यामुळे तो भाग सुशोभित होईल व त्याठिकाणी लोकांना येणे सोयीचे होईल. सभापती महोदय, राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या विकासाकरिता विविध योजना व कार्यक्रम आखून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भातील विविध अप्रकाशित झालेले साहित्य प्रकाशित करण्याच्या बाबतीत त्याची माहिती घेऊन ते जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यासाठी फाऊंडेशन निर्माण करीत आहोत. या फाऊंडेशन निर्मितीकरिता व अन्य कामाकरिता 2 कोटी रुपये उपलब्ध करुन देत आहोत.

सभापती महोदय, यामध्ये अनेक विषय महत्वाचे आहेत. नगर विकास विभागाच्या बाबतीत अनेक योजना समोर आल्या आहेत. नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विकास आराखडयामध्ये रिंग रेल्वेसाठी जी जागा आरक्षित आहे, ते आरक्षण काढण्याच्या बाबतीत दोन्ही सभागृहामध्ये मागणी करण्यात आली आहे. त्याठिकाणी आज बऱ्याच प्रमाणात डेव्हलपमेंट झाले आहे. हे लक्षात घेता नागपूरच्या रिंग रेल्वेसाठी अनेक वर्षापासून आरक्षण होते ते आता कामाचे राहिले नाही अशी मागणी दोन्ही सभागृहामधून करण्यात आली आहे. हे लक्षात घेता रिंग रेल्वेचे विकास आरक्षण रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सभापती महोदय, सभागृहाला मला अवगत करावयाचे आहे की, येणाऱ्या भविष्य काळामध्ये नागपूर शहरामध्ये ट्रान्सपोर्टेशनच्या व ट्रॅफिकच्या अडचणी निर्माण होणार आहेत हे लक्षात घेऊन काही पर्यायी व्यवस्था निश्चितपणे करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनाकडून निश्चितपणे सर्व्हे केला जाईल. त्याकरिता जे काही अन्य करणे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

आवश्यक आहे ते निश्चितपणे केले जाईल. सभापती महोदय, महानगरपालिका हद्दीबाहेरील 10 किलोमीटर अंतरापर्यंतच्या प्रादेशिक योजना क्षेत्रासाठी डी.सी. रुल्स आहेत,विकास यंत्रणा नियमावली आहे...

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण आता अशी स्थिती आहे की, नागपूर शहराच्या अवती-भोवती आणि महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेर सुध्दा मोठया प्रमाणात विकास होऊ लागलेला आहे. हे लक्षात घेता आजचे डी.सी. रुल्स् तेथे लागू झाले पाहिजेत अशा प्रकारची अपेक्षा आहे. जेणेकरुन बांधकामांवर नियंत्रण येईल आणि नियोजनबध्द पध्दतीने विकास करता येईल. म्हणून 10 कि.मी. अंतरापर्यंत या डी.सी.रुल्स्ची व्याप्ती वाढविण्यात येईल आणि भविष्यामध्ये ही सर्व कामे अत्यंत नियोजनबध्द पध्दतीने राबविण्याकरता आपण एन.आय.टी.ची स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून नियुक्ती करीत आहोत. ज्याअनुषंगाने या भागातील विकास चांगल्या पध्दतीने निश्चित करणे सोयीचे होईल. त्याचबरोबर शासनाने मंजूर केलेल्या आराखड्यातील "ना-विकास हरितपट्टा" या मध्ये सन 2001 पूर्वी झालेला जो गुंठेवारी विकास आहे, तो गुंठेवारी अधिनियमामध्ये नियमित करण्यास शासनातर्फे मंजुरी देण्याचा निर्णय आम्ही घेत आहोत. ज्यामुळे एनडीझेड मध्ये असलेले आणि गुंठेवारीशी संबंधित असलेले 99 ले-आऊटस् मधील साधारण 6683 प्लॉटस् आम्ही नियमित करीत आहोत की, ज्यामुळे गुंठेवारीचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागेल आणि त्या भागातील प्रश्न, तेथील लोकांच्या मागण्या देखील या निमित्ताने मार्गी लागतील.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये अग्निसुरक्षा अभियानाच्या बाबतीत ज्या अपेक्षा आहेत, त्याबाबतीत सांगावयाचे तर आपण राज्यामध्ये पहातो की, ज्या लहान नगरपरिषदा आहेत, त्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असताना त्यांना या सगळया योजनांवर पैसा खर्च करणे अडचणीचे आहे. म्हणून अग्नीशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी, विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे आणि या निर्णयाच्या अंतर्गत अग्नीशमन सेवेशी निगडित पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे, अग्नीशमन सेवेतील कार्यरत मनुष्यबळाचे सक्षमीकरण करणे आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 च्या तरतुदीविषयक व आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांच्या संदर्भात जनशिक्षण व जनजागृती निर्माण करण्याच्या बाबतीत जे काही काम करणे आवश्यक आहे आणि अग्नीशमन वाहन उपलब्ध करुन देणे हे सर्वात महत्वाचे काम आहे. कारण आपल्याकडे बऱ्याच ठिकाणी फायर ब्रिगेडची व्यवस्था देखील नाही, हे लक्षात घेता या नगरपरिषदांना, 4 "ब"वर्ग नगरपालिका व 27 "क" नगरपरिषदा अशा एकूण 31 नगरपरिषदांमध्ये

. .. .3 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अग्नीशमन वाहन उपलब्ध करुन देण्याकरता 25 कोटी रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.त्यामध्ये विदर्भातील 31 नगरपरिषदा यात आहेत, त्यांना या गोष्टीचा निश्चित फायदा होणार आहे.

सभापती महोदय, आपल्याला ही कल्पना आहे की, जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन म्हणजेच जेएनएनयुआरएम आहे, या योजनेअंतर्गत राज्यातील जी मोठी शहरे आहेत, त्याच्या उत्थानाकरता मोठया प्रमाणात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी फार मोठा निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्याच धर्तीवर राज्य शासन नव्याने निर्णय घेत आहे की, ज्याचे नाव आम्ही "महाराष्ट्र नगर उत्थान महाअभियान" असे ठेवले असून, त्याअंतर्गत विदर्भातील प्रमुख शहरांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय अंतर्भूत आहे. या सगळया कामाकरता, आपण दरवर्षी पहातो की, सन्माननीय सदस्यांचे अर्ज येतात की, नगरपालिकेला निधी उपलब्ध करुन द्यावा, विशेष अनुदान उपलब्ध करुन द्यावे, रस्त्यांसाठी अनुदान द्यावे अशा प्रकारचे अनेक अर्ज दरवेळेस येत असतात आणि त्यातून काही जुजबी आणि लहान प्रकारची कामे करता येतात. परंतु सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, प्रत्येक शहराचा नियोजनबध्द पध्दतीने विकास झाला पाहिजे, त्यासाठी चांगल्या प्रकारे निधी देता आला पाहिजे आणि हे जर करावयाचे असेल तर मग त्यासाठी काही डेव्हल्पमेंट प्लॅनही तयार करावयास पाहिजे, ज्याला आपण डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट किंवा डीपीआर म्हणू, तर तो डीपीआर आपल्याला चांगल्या पध्दतीने करता आला पाहिजे. मग घनकचरा व्यवस्थापन असो,नागरी दळणवळण साधनांचा विकास असो, नागरी तीर्थक्षेत्रांचा विकास असो, सार्वजनिक पुरातन वस्तुंचे जतन करणे इ.ज्या-ज्या गोष्टी नगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये आहेत आणि ज्याकरता एक डीपीआर तयार करणे आवश्यक आहे, त्या सगळया कामांसाठी पैसा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत शासनाची भूमिका आहे. त्याकरिता निश्चितपणे भरीव निधी उपलब्ध होईल. त्यासाठी आमच्यासमोर तीन पर्याय आहेत. एक म्हणजे पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप आहे. ते जर सोयीचे नसेल, तर व्हायबिलीटी गॅप फंडींग आम्ही उपलब्ध करुन देऊ. ते जर सक्षम होत नसेल तर व्हायबिलीटी गॅप भरुन देण्याकरता निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे आणि तिसरे म्हणजे सार्वजनिक, खासगी सहभागाव्दारे राबविण्याच्या ज्या गोष्टी आहेत, त्यांना अनुदान व सवलतीचे कर्ज, नगरपरिषदांना अनुदान देणे किंवा सवलतीने कर्ज देणे या तीन

. . . .3आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपायांपेक्षा कोणता उपाय सोयीचा आहे हे पाहून या महाराष्ट्र नगर उत्थान अभियानाच्या अंतर्गत विदर्भातील 16 नगर परिषदेच्या बाबतीत आम्ही निर्णय घेत आहोत. त्या नगरपरिषदेमध्ये हा कार्यक्रम राबविला जाईल. या नगरपरिषदांची यादी मी पटलावर ठेवेन. पण प्रामुख्याने अमरावती, अकोला, शेगाव,

बुलढाणा,यवतमाळ,आकोट, वाशिम, अचलपूर, चिखलदरा गिरीस्थान, रामटेक, सावनेर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, या सगळया भागामध्ये हे अभियान राबविले जाईल. ज्याचा फायदा या भागांना निश्चितपणे होणार आहे.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण....

सभापती महोदय, गडचिरोलीच्या बाबतीत या सभागृहात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. विशेषत: गडचिरोलीमधील नक्षलवाद लक्षात घेता त्याठिकाणी काही नव्याने निर्णय घेण्याची गरज आहे. गृहविभागाच्या सक्षमीकरणाच्या बाबतीतील निर्णय शासन घेत आहे. पण त्याचबरोबर तेथे असलेली जे गरीब लोक आहेत, नक्षलग्रस्त भागातील अडचणीत सापडलेला तेथील जो समाज आहे, ते लक्षात घेता नक्षलग्रस्त भागातील 30,000 कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्याची योजना शासन हाती घेत आहे.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयातील नक्षलग्रस्त भागात शेतकरी कुटुंबाना शेती किंवा पूरक व्यवसायासाठी व बिगरशेतकी कुटुंबाना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी असे एकूण 30,000 कुटुंबाना पुढील 3 वर्षात थेट आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत व त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे त्याचे सुध्दा वेगळयाने आदेश निर्गमित करण्यात येतील.

सभापती महोदय, संयुक्त वनव्यवस्थापन योजनेंतर्गत लाख उत्पादन, बांबूचा वापर करुन उदबत्तीसाठी काडी बनविणे, फर्निचर व इतर वस्तू मध, डिंक, वनऔषधी इ. बाबींचा समावेश करुन नक्षलग्रस्त भागामध्ये रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन देण्यासाठी सुध्दा जाणीवपूर्वक प्रयत्न शासनाने सुरु केलेले आहेत आणि त्याकरिता निश्चितपणे मदत केली जाईल.

सभापती महोदय, मायनर फॉरेस्टच्या व्याख्येमध्ये बांबूचा समावेश करुन बांबूवर आदिवासींना मालकी हक्क देऊन त्याचा वापर व विल्हेवाट करण्यासाठी अधिकार देण्यात येईल, जेणेकरुन आदिवासी कुटुंबांना आर्थिक मदत हाईल व जंगल संरक्षणाकरिता त्यांची मदत निश्चितपणे होणार आहे.

सभापती महोदय, प्राथमिक शिक्षकांसाठी भरतीपूर्व डी.एड ची अट शिथील करण्याचा शासन निर्णय घेत आहे. आदिवासी मुलांना सेवेत सामावून घेऊन सेवांतर्गत डी.एड. ची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीतील ही भुमिका आहे. डी.एड. ची अट शिथिल करुन त्याभागात राहणाऱ्या 12 वी पास किंवा त्यापेक्षा उच्च शिक्षित बेरोजगारांना गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदी सामावून घेण्यात येईल. अशा अप्रशिक्षित शिक्षकांना सेवेत घेण्यापूर्वी शासनाने विहित केलेल्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण. . .

डी.एड. कॉलेजमध्ये विहित कालावधीत डी.एड. ची परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असेल. याकरिता डी.एड. प्रशिक्षणाचा खर्च, राहणे व जवेणाचा खर्च शासनामार्फत केला जाईल. याद्वारे नक्षलग्रस्त भागामध्ये असलेली प्राथमिक शिक्षकांची कमतरता दूर होण्यास मदत होणार आहे.

सभापती महोदय, वनहक्क कायद्यातंर्गत जमिनीचे पट्टे देण्याकरिता गडचिरोली जिल्हयात 50,000 पेक्षा अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. वरील प्रकरणे लवकर मार्गी लावावयाची असतील तर त्याबाबतीत नवीन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सूचना आलेल्या प्रत्येक तालुक्यामध्ये एक उप विभागीय अधिकारी, एस.डी.ओ.चे कार्यालय स्थापन करण्यात येणार असून ही स्थापना तात्पुरत्या स्वरुपात राहणार आहे. वनपट्टे देण्याच्या बाबतीतील मागण्या आहेत त्या एस.डी.ओ. मार्फत निकाली काढण्याकरिता नव्याने पद निर्माण केले जाईल.

सभापती महोदय, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी कायद्यातंर्गत जिल्हास्तरावर उपविभागीय स्तरावर समितीकडून प्राप्त झालेले दावे निकाली काढण्यासाठी जिल्हास्तरीय समिती आहे. या समितीमध्ये सध्या अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे ऐवजी आता अपर जिल्हाधिकारी किंवा उप जिल्हाधिकारी यांना सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात येईल. यामुळे यामध्ये होणारा विलंब टाळता येईल. संबंधित उप जिल्हाधिकाऱ्याच्या माध्यमातून हे दावे तातडीने निकाली काढला येतील.

सभापती महोदय, आदिवासी विकास महामंडळातर्फे राबविल्या जाणाऱ्या एकाधिकार योजनेस किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंमध्ये परावर्तीत करण्यात येईल. त्यामुळे आदिवासींना त्यांच्या शेतीमालासाठी चांगली किंमत मिळण्यासाठी याचा नक्की फायदा होणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांनी झाडाची विक्री करणे हा जो अधिनियम आहे त्या अधिनियमात असलेल्या तरतुदीत दुरुस्ती करुन कार्यप्रणाली सुलभ करुन आदिवासींना त्यांच्या खाजगी जमिनीवर असलेले सागवान खुल्या बाजारात माफक दरावर व वेळेवर विक्री करण्यासाठी सोय उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासन घेत आहे. ज्यामुळे त्याला खुल्या बाजारातून अधिक पैसा उपलब्ध करुन देता येईल, अशा प्रकारची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागातील प्रत्येक तालुक्यात 10 शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण व संगणकाद्वारे शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याद्वारे नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख होण्यास मदत होणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, अहेरी येथील अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्याचे पद निर्माण करण्याच्या बाबतीमध्ये एक तर कुरखेडा, चामोर्शी आणि एटापल्ली या तीन ठिकाणी नवीन महसुली उपविभागीय अधिकारी कार्यालय निर्माण करण्यात येत आहे तसेच अहेरी येथे एक नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. यामुळे महसूल प्रशासनामध्ये ते सबळ होईल आणि जिल्हयातील लोकांची अधिक सक्षमतेने प्रशासकीय सुधारणा करण्याकरिता त्याची मदत होईल, अशा प्रकारची अपेक्षा आहे. गडचिरोली जिल्हयामधील पाच तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या बाबतीमध्ये नायब तहसीलदार देणे अपेक्षित आहे. बऱ्याच ठिकाणच्या जागा रिक्त आहेत त्याही जागा तातडीने भरण्याविषयीचे आदेश निर्गमित करण्यात येतील. राज्य परिवहन महामंडळाचे गडचिरोली जिल्हयामध्ये आतापर्यंत विभागीय कार्यालय नाही ते कार्यालय तातडीने सुरु करण्याच्या बाबतीत शासन आदेश निर्गमित करेल.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये आजपर्यंतच विक्रमी निवेदन करीत असल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा देतो. आपण आपले निवेदन चालू ठेवावे.

श्री. अशोक चव्हाण : आपण माझी या ठिकाणी स्तुती केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. सभापती महोदय, रस्त्यांच्या एकंदरीत कामाविषयी जी काही अपेक्षा आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सध्याची जी काही चौपदरीकरणाची कामे सुरु आहेत त्यामध्ये सध्या पाच ठिकाणी ही कामे सुरु आहेत. त्यामध्ये खामगाव बाह्य वळणाचे चौपदरीकरण हा विषय आहे. सावनेर रस्त्याच्या कामाचा विषय आहे. वरोरा-चंद्रपूर बाह्य रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम आहे. बेरला-चिखली-खामगाव रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम आहे तसेच जालना-देऊळगाव रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम आहे. ही सगळी कामे 222 किलोमीटरची आहेत. ही कामे सध्या सुरु आहेत आणि याच वर्षामध्ये ती कामे पूर्ण केली जातील. या कामाकरिता 617 कोटी रुपये अपेक्षित असून या वर्षी ती पूर्ण केली जातील. त्याचप्रमाणे 467 किलोमीटर लांबीची 2262 कोटीची नवीन कामे सुध्दा यंदाच्या वर्षी आम्ही सुरु करीत आहोत. त्यामध्ये जांब-वरोरा रस्त्याचे चौपदरीकरण, अकोला - पातूर - हिंगोली - वारंगा रस्त्याचे चौपदरीकरण, नागपूर - बोरी - तुळजापूर रस्त्याचे चौपदरीकरण आणि कारंजा-वणी-धुग्गुस-चंद्रपूर रस्त्याचे चौपदरीकरण ही कामे सध्या निविदेच्या स्तरावर आहेत आणि ही सव्वादोन हजार कोटीची कामे या वर्षी आम्ही सुरु करीत आहोत.

सभापती महोदय, राज्यामध्ये असलेले रेल्वेचे जे विविध प्रकल्प आहेत त्या रेल्वे प्रकल्पांच्या बाबतीत सुध्दा आपल्याकडे या अर्थसंकल्पामध्ये चांगली तरतूद व्हावी अशा प्रकारची अपेक्षा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची आहे. म्हणून परवा मी रेल्वेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि त्या बैठकीच्या माध्यमातून या सगळ्या महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी तरतूद व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. रेल्वे मंत्र्यांची मी स्वत: भेट घेणार आहे. महाराष्ट्रातील आणि विशेषत: विदर्भातील, मराठवाड्यातील अविकसित भागामध्ये ज्या प्रकल्पाकरिता 50 टक्के निधी शासन देणार आहे आणि अन्य प्रकल्पासाठी सुध्दा भरीव तरतूद होईल अशी अपेक्षा आहे. परंतु हा निर्णय घेत असताना चंद्रपूर जिल्ह्यातील काही लोकांनी नवीन मागणी केलेली आहे आणि ती महत्वाची आहे. माणिकगड रेल्वे स्टेशन पासून गडचांदूर ते आदिलाबाद या सेक्शनमध्ये जे काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

50 किलोमीटरचे अंतर आहे ते अद्यापही रेल्वेने जोडलेले नाही. ते जर जोडण्यात आले तर विदर्भ आणि मराठवाडा त्याचबरोबर दिल्ली आणि थेट चेन्नईपर्यंतचा भाग जोडण्याचे काम यातून होणार आहे. या 50 किलोमीटरच्या रेल्वे मार्गासाठी 300 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या कामाकरिता सुध्दा आम्ही रेल्वे मंत्र्यांकडे विनंती करुन तो प्रयत्न करु आणि गरज पडली तर यातील 50 टक्के वाटा सुध्दा राज्य शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याची आमची तयारी आहे, हे मला मुद्दाम सांगितले पाहिजे. गडचिरोलीमध्ये विमानतळाचे काम हाती घेण्यात आलेले आहे. मागे सांगितल्याप्रमाणे आता 250 हेक्टर जमीन ताब्यात आलेली आहे. त्याचे काम आम्ही एमएडीसीच्या मार्फत पूर्ण करणार आहोत. त्याचबरोबर ग्रामविकास विभागाच्या ज्या अनेक योजना आहेत त्या योजनेच्या अंतर्गत विदर्भातील 11 जिल्ह्यांकरिता 50 हजार घरे बांधण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. आणि त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा 210 कोटीचा राहणार आहे. सन 2009-10 आणि 2010-11 या दोन वर्षामध्ये हा कार्यक्रम पूर्ण होईल अशा पध्दतीचे नियोजनही करण्यात आले आहे. त्याकरिता पूर्ण निधी देण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत गडचिरोली,भंडारा या नक्षलग्रस्त भागासाठी 189 कोटी रुपयांचा कार्यक्रम या शासनाने मंजूर केलेला आहे. मागासक्षेत्र अनुदान निधी असा विशेष कार्यक्रम राज्यातील मागासलेल्या 12 जिल्ह्यांसाठी केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी गोंदिया, यवतमाळ, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती हे सहा जिल्हे अंतर्भूत असून त्याकरिता 150 कोटी रुपयांचा निधी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचबरोबर 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या 1700 कोटी रुपयांपैकी 525 कोटी रुपयांचा निधी सुध्दा विदर्भासाठी देण्यात आलेला आहे. म्हणून ही सगळी भरीव तरतूद विदर्भाच्या या सगळ्या कामांकरिता करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर विदर्भातील सहकार व पणन विभागाच्या मार्फत सुध्दा अनेक योजना राबविण्याच्या बाबतीत मग त्यामध्ये विदर्भात कृषी पणन व निर्यात केंद्राच्या बाबतीत असो, विदर्भातील माल तारण योजनेच्या बाबतीत असो किंवा विदर्भातील विविध कार्यकारी संस्थांच्या गोदामाच्या पुनरुज्जीवनाच्या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. अशोक चव्हाण ....

असो किंवा संयुक्त राष्ट्राच्या आयएफडीए या संस्थेमार्फत सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात 120 प्रकल्पांच्या उभारण्याच्या बाबतीत असो हे सगळे कार्यक्रम हाती घेतलेले आहेत आणि त्या अनुषंगाने शासनाची ही कामे पूर्ण करण्याची भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, निवेदन लांबले आहे. ते मी मान्य करतो. निवेदन जरी लांबले असले तरी विदर्भातील महत्वाच्या कार्यक्रमाच्या संदर्भामध्ये हे निवेदन होणे महत्वाचे होते. जास्त वेळ गेला तरी हरकत नाही. पण मला असे वाटते की, या माध्यमातून साधारणत: तीन वर्षामध्ये 10 हजार कोटी रुपयांचा खर्च करण्याचा हा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासाला चालना मिळावी ही अपेक्षा व्यक्त करुन मी आपली रजा घेतो.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आता नियम 46 अन्वये निवेदन केले आहे. नियमानुसार माननीय सभापतींनी त्याला मान्यता दिली आहे. या नियम 46 मध्ये असे म्हटले आहे की, "मंत्र्यांना सभापतींची परवानगी घेऊन सार्वजनिक हिताच्यादृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बाबीवर निवेदन करता येईल." त्याप्रमाणे त्यांनी ते केले आहे. आम्ही आतापर्यंत 2-3 मिनिटांचे निवेदन ऐकले होते. परंतु त्यांनी मॅरेथॉन पध्दतीने केलेले हे निवेदन आम्ही ऐकले आहे, आम्हाला चांगली सवय लागेल. पुढे असे म्हटले आहे की, "अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करण्याला परवानगी देता येणार नाही" म्हणजे आम्हाला चर्चा करता येणार नाही "परंतु, उक्त निवेदनाच्यासंबंधात आणखी माहिती काढण्याच्या प्रयोजनासाठी प्रश्न विचारण्याची सदस्यांना परवानगी देता येईल." असे यामध्ये म्हटले आहे. एक छोटेसे निवेदन असले तर सदस्यांना 2-4 प्रश्न विचारता येतात. आता त्यांनी काय म्हटले ते सत्ताधारी पक्षातील सदस्यांना कळले नाही आणि आम्हालाही कळले नाही. मला वाटले की, टाळया वाजवून वाजवून सदस्यांचे हात सुजतील.(अडथळा) निवेदन होत असताना सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून एकही टाळी वाजली नाही. निवेदनामधील शेवटचा 10 हजाराचा आकडा कळल्यावर टाळया वाजविल्या गेल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्यावर सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी टाळी वाजविली आहे. मी देखील मागास भागाचे प्रतिनिधीत्व करणारा लोकप्रतिनिधी आहे. विदर्भाला, मागास भागाला मी काही तरी देऊ इच्छितो या भावनेतून त्यांनी निवेदन केले आहे. ते मिळेल की नाही हे माहीत नाही, कारण 3 वर्षाचा हा कार्यक्रम जाहीर केला आहे. म्हणजे विदर्भात पुढील 2 वर्षे अधिवेशने घेतली नाही तरी चालतील. कारण शासनाने विदर्भाला भरभरुन 3 वर्षांकरिता दिलेले असल्यामुळे विदर्भात 2 वर्षे अधिवेशने घेण्याची गरज नाही. आमच्या हातामध्ये निवेदनाची प्रत नाही, त्यामुळे त्यांनी काय सांगितले ते कळले नाही. त्यांच्या निवेदनामध्ये 5-6 वेळा बांबूचा उल्लेख आला आहे. तेही समजले नाही.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करीत असताना अनेक नवीन गोष्टींबाबत घोषणा केल्या आहेत. त्यामध्ये विशेषत: चंद्रपूर व गडचिरोलीबाबत मी सांगेन की, जिजाऊंचे माहेर असलेला सरदार जाधवरावांचा वाडा आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार...

आंतरराष्ट्रीय केंद्र आहे, विष्णूपुरी मंदिर आहे. या भागातच रुक्मिणीचे माहेर घर कौंडिण्यपूर आहे, त्यासंबंधी मी आपल्यामार्फत सभागृहात विशेष उल्लेख मांडला होता. माझी शासनाला विनंती राहील की, रुक्मिणीचे माहेर घर असलेले कौंडिण्यपूर आहे त्याच्याही विकासाची योजना हाती घेऊन ती साकार करण्याच्या दृष्टीने या निवेदनात त्याचा समावेश केला तर मी आपला आभारी राहीन.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचा पूर्ण आदर राखून मी बोलतो की, या सदनामध्ये माननीय मंत्र्यांना नियमाने निवेदन करता येते. परंतु अशाप्रकारे पाऊण तास चालणारे निवेदन आम्ही पहिल्यांदाच अनुभवले. हे निवेदन होते की, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी विदर्भातील अनुशेषाची चर्चा उपस्थित केली होती त्या चर्चेचे उत्तर होते ते समजले नाही. कारण त्या चर्चेवर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे ऑन लेग आहेत. विदर्भाच्या दोन चर्चा या सदनात आल्या. त्यापैकी एक शेतकऱ्यांसंबंधी आणि दुसरी विदर्भातील सिंचनासंबंधीची आली. माननीय मुख्यमंत्री निवेदन करीत असताना आम्ही एवढयासाठीच शांत राहिलो की, काही का असेना विदर्भाच्या पदरात पडत आहे. परंतु हे कामकाजाला धरुन चालले आहे असे मात्र वाटले नाही. कारण मुळामध्ये कधीही निवेदन एखाद्या पानाचे असते, त्यावर 1-2 प्रश्न विचारले जातात. सभागृहाने या प्रथा, परंपरा, संकेत पाळलेल्या आहेत. परंतु आज एखाद्या चर्चेला उत्तर द्यावे तसे पाऊण तास निवेदन करण्यात आले आहे. त्यापैकी पहिली पंधरा मिनिटे काय चालले आहे ते समजले नाही. हे बरोबर वाटले नाही, अशाप्रकारची पध्दत रुढ होऊ नये याबाबत आपण दक्षता घ्यावी एवढीच मी विनंती करतो.

सभापती : नियम 46 अन्वये सन्माननीय मुख्यमंत्र्यांना किंवा सन्माननीय मंत्र्यांना निवेदन करता येते हे आपणही सांगितले आहे. ही वस्तुस्थिती आहे. पण संपूर्ण विदर्भाच्या दृष्टीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या काही योजना केल्या आहेत ते सांगण्यासाठी त्यांनी निवेदन केलेले आहे. त्याला काही वेळ जरुर लागला आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी या निवेदनासंबंधी आपले मत व्यक्त केले आहे. खरे तर हे निवेदन आणखी वाढले असते तर विदर्भाला भरपूर मिळाले असते आणि ही अपेक्षा आपलीही असावयास पाहिजे होती. परंतु...

श्री.अरविंद सावंत : निवेदन करण्याची पध्दत बरोबर नाही, नियमानुसार निवेदन केले आहे असे वाटले नाही असे आमचे म्हणणे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही निवेदनाची अवहेलना केलेली नाही. त्यामुळे सन्माननीय राज्यमंत्री महोदय हा विषय कशाला वाढवित आहेत ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्या विरोधात बोलत नाही.

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी कृपया खाली बसावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना एकच विनंती आहे की, आपण पाऊण तास निवेदन वाचत होता आणि आम्ही ऐकत होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनाची प्रत पटलावर ठेवली आणि ती सर्व सदस्यांना वितरित केली तर या निवेदनाची कल्पना येऊ शकते.

यानंतर श्री.शिगम

अशुध्दीरित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, मैं माननीय मुख्यमंत्री जी का विदर्भ की जनता की ओर से अभिनंदन करना चाहता हूँ कि उन्होंने 3 साल में 10 हजार करोड़ रुपए का एलोकेशन किया है. मैं सिर्फ यह कहना चाहता हूँ कि सरकार की विश्वसनीयता खराब है, जो घोषणाएं होती हैं, वे समय पर लागू नहीं होती हैं. आज जो घोषणाएं की गईं हैं, अगर ब्यूरोक्रेसी इन घोषणओं को समयबद्ध लागू नहीं करती है तो इनके ऊपर भी जिम्मेदारी फिक्स होनी चाहिए और माननीय मुख्यमंत्री जी की घोषणाएं 3 साल के अन्दर लागू होनी चाहिए.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एक चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. नक्षलवाद्यांनी शिवसेनेच्या तालुका प्रमुखाची गडचिरोलीमध्ये मान कापून हत्या केली होती. मी त्याच्या घरी भेटायला गेलो होतो. त्याची पत्नी श्रीमती मंगला कुन्नलवार ही अंगणवाडी सेविका होती. मी सर्व घटना येथे सांगत नाही. पण याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती की, ते कुटुंब सुरक्षित राहील अशा ठिकाणी त्याच्या पत्नीची अंगणवाडी सेविका म्हणून बदली करावी. माननीय मंत्री महोदयांनी मला आज कळविलेले आहे की, वेडमपल्ली येथील अंगणवाडी सेविकेस आता आहेरी येथील वॉर्ड क्रमांक 3 अंगणवाडी येथे नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. एका उद्ध्वस्त महिलेच्या कुटुंबाचा सरकारने मान राखल्या बद्दल मी मनापासून माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. अशाच प्रकारे त्या नक्षलग्रस्त भागामध्ये उद्ध्वस्त कुटुंबाना आपण आधार दिला तर नक्षलवाद गोळी शिवाय संपण्याची आशा निर्माण होईल. लोकांमध्ये धीर निर्माण होईल. मी माननीय मंत्री महोदयांना पुनश्च धन्यवाद देतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2009 चे वि.स.वि क्र. 21 - महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळ विधेयकासंबंधी

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे या विधेयकावरील भाषण अपूर्ण राहिलेले आहे. सन्माननीय सदस्यांना आपले भाषण पुढे सुरु करावयाचे आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावरील माझे भाषण अपूर्ण आहे. हे विधेयक पुढील अधिवेशनामध्ये चर्चेला घ्यावे.

सभापती : ठीक आहे. या विधेयकावरील सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण अपूर्ण आहे. ते ऑन लेग आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाची स्वतंत्र समिती गठित करण्याबाबत

मु.शी.: नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाची स्वतंत्र समिती गठित करण्याबाबत संसदीय कार्य मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विधिमंडळाची स्वतंत्र समिती गठित करण्याबाबत या सदनामध्ये वारंवार चर्चा झाली होती. म्हणून सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संसदीय कार्य विभागाच्या वतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत व महानगरपालिका या स्वायत्त संस्थांचे वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा परीक्षण अहवालाची तपासणी करण्यासाठी पंचायती राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठित करण्यात यावी. सदर समितीत एकूण सदस्य संख्या 25 असावी. या समितीवर विधानसभेतील 20 सदस्य असतील व विधानपरिषदेतील 5 सदस्य असतील. समितीची कार्यकक्षा व नियम ठरविण्याची बाब विधानसभेच्या नियम समितीकडे सुपूर्द करण्यात यावी "

सभापती महोदय, ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदा यांच्या लेखा परीक्षण अहवाल व प्रशासन अहवालाची तपासणी करण्यासाठी आपण पंचायती राज समिती गठित केली आहे. आपण अनेक वेळा नगरपालिका आणि महानगरपालिकांना महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून निधी देत असतो. म्हणून पंचायती राज्य समितीच्या धर्तीवर विधिमंडळाची एक समिती असावी असा आपण निर्णय घेतलेला आहे. यापूर्वी देखील अल्पसंख्यांकांच्या बाबतीत एक समिती गठित केलेली आहे. तेव्हा ही समिती गठित करण्याकरिता सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री. पी. खर्चे...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

या सत्रकाळातील कामकाजासंबंधीची सांख्यिकिय माहिती

हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 10 एकूण काम - 74 तास 30 मिनिटे

वाया गेलेला वेळ - 2 तास 30 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 72 तास

रोजचे सरासरी कामकाज 7 तास

(विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 5 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 14 दिवसांचे (जवळ-जवळ तीन आठवडे) काम केले आहे.)

तारांकित प्रश्न

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 2524

कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न इ 1655 स्वीकृत प्रश्न 660

सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न 68

उत्तरीत झालेले अल्पसूचना प्रश्न - दोन

नियम 93 सूचना --

एकूण प्राप्त झालेल्या सूचना - 169

स्वीकृत सूचनांची संख्या- 100

चर्चा झालेल्या सूचना - 28

प्राप्त झालेल्या सूचना - 698

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

<u>लक्षवेधी सूचना --</u>

मान्य झालेल्या सूचना 200

चर्चा झालेल्या सूचना - 35

विशेष उल्लेखाच्या 65 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 46 अन्वये मंत्र्यांनी केलेले निवेदन - एक

नियम 47 अन्वये मंत्र्यांनी केलेले निवेदन - एक

शासकीय विधेयके संमत- (परिषद 7 - सभा 4)

नियम 260 अन्वये पाच प्रस्तावावर चर्चा झाली.

अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 79, मान्य झाल्या 55, चर्चा झाली 10

.....

यानंतर श्री. जुन्नरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:पुढील अधिवेशनासंबधी घोषणा.

सभापती : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन गुरुवार, दिनांक 18 मार्च, 2010 पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांना आदेश वाचून दाखवितो.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी एस.सी. जमीर, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे.

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल असे मी घोषित करतो.

यानंतर राष्ट्रगीत झाले.

(सायंकाळी 4 वाजून 56 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही